सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ७ मे २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १५८ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
हीं आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जगातील बहुतेक सर्व देशांत मोठ्या प्रमाणावर भारतीय लोक राहतात. हे सगळे भारतीय आपल्या मातृभूमीपासून, रूढी-परंपरांपासून तुटलेले होते. संघ स्वयंसेवकांनी या क्षेत्रातही जागरण, संघटन, सेवा, संस्कार यांची मुहूर्तमेढ तिथे रोवली आहे.

**- स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# बंगालमध्ये उफाळला हिंसाचार

## हत्या, तोडफोड, जाळपोळ, गोळीबाराच्या घटना, भाजपा आमदाराच्या भावासह पाच ठार

◆ **कोलकाता, ६ मे**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काही तासांतच पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी हिंसाचार उफाळून आला. पराभव जिव्हारी लागल्याने तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी धुडगूस घालत जाळपोळ, तोडफोड केली. यामुळे परिस्थिती हिंसक बनली. याला प्रत्युत्तर म्हणून जमावाने तृणमूलची कार्यालयात तोडफोड केली. २४, परगणा जिल्ह्यात तैनात बीएसएफ जवानांवर गोळीबार करण्यात आला. यात अनेक जवान जखमी झाले.

भाजपाचे नवनिर्वाचित आमदार पीयूष कनोडिया यांच्या भावाची कोलकातामधील न्यू टाऊन भागात तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी हत्या केली. दुसरीकडे जमावाने केलेल्या हल्ल्यात तृणमूलच्या एक नेता ठार झाला. एकूणच निकालाच्या २४ तासात झालेल्या हिंसाचारात राज्यात पाच जणांचा मृत्यू झाला. भावाच्या हत्येवर शोक व्यक्त करताना कनोडिया म्हणाले, मी आमदार बनून चार तासही उलटले नाहीत आणि मला माझ्या भावाचा मृतदेह बघावा लागत आहे. घटनेसाठी जबाबदार असलेल्यांना मी सोडणार नाही, प्रत्येक हत्येचा सूड घेतला जाईल आणि कोणत्याही कार्यकर्त्याचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. अनेक ठिकाणी तृणमूल काँग्रेस आणि भाजपाचे कार्यकर्ते यांच्यात हाणामारी झाली. बीरभूम जिल्ह्यातील नानूरमध्येही एका तृणमूलच्या कार्यकर्त्यांचा वादात मृत्यू झाला.



कोलकाता येथे उद्ध्वस्त करण्यात आलेले तृणमूलचे कार्यालय

### संदेशखालीमध्ये पोलिसांवर गोळीबार

**उत्तर २४, परगणा जिल्ह्यातील संदेशखालीमध्ये समाजकंटकांनी थेट पोलिस आणि सुरक्षा जवानांनाच लक्ष्य केले. गस्त घालत असलेल्या सुरक्षा जवानांच्या पथकावर गोळीबार करण्यात आला. यात पाच जवान जखमी झाले. पोलिसांनी कारवाई करीत हातबॉम्ब आणि इतर शस्त्रास्त्रे जप्त केली. दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगाने हिंसाचार भडकवणाऱ्या आणि जाळपोळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले.**

**तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनेत भाजपाचा कोणताही कार्यकर्ता सहभागी नव्हता. तृणमूलमधील अंतर्गत गटबाजी आणि निवडणुकीच्या निकालांमुळे आलेल्या निराशेचा परिणाम आहे.**

**- राहुल सिन्हा,** भाजपा नेते

**राज्यात हिंसाचार करणाऱ्यांविरुद्ध शून्य सहनशीलतेचे धोरण लागू करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर, मग ती कोणत्याही राजकीय पक्षाची असो, कोणताही भेदभाव न करता कठोर कारवाई केली जाईल.**

**- सिद्धार्थ नाथ गुप्ता**
पोलिस महासंचालक

**पाच कार्यालयांवर काँग्रेसचा ताबा**

संतप्त जमावाने लेनिनच्या पुतळ्याची तोडफोड केली आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी तृणमूल पक्षाची पाच कार्यालये ताब्यात घेतली. राज्यभरातील अनेक ठिकाणी तृणमूलच्या कार्यालयांना लक्ष्य करून आग लावण्यात आली. (वृत्तसंस्था)

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर



**सुधारित पेन्शन योजनेची कार्यपद्धती जाहीर**
शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतन मिळणार
**सेवानिवृत्तीनंतर सुरक्षित भविष्याची ग्वाही**
कुटुंब निवृत्तिवेतन आणि महागाई वाढीचाही लाभ
**३१ डिसेंबर २०२६ पर्यंत 'विकल्प' सादर करण्याची संधी**

◆ **मुंबई, ६ मे**

महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (एनपीएस) लागू असलेल्या लाखो शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना' कशा प्रकारे राबवली जाईल, याची सविस्तर कार्यपद्धती वित्त विभागाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना आता निवृत्तीनंतर निश्चित अशा पेन्शनचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शासनाच्या नवीन नियमावलीनुसार, ज्या कर्मचाऱ्यांनी सुधारित योजनेचा विकल्प स्वीकारला आहे आणि ज्यांची सेवा २० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन आणि त्यावरील महागाई वाढ लागू होईल. १० ते २० वर्षांच्या दरम्यान सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्यांच्या सेवेच्या प्रमाणानुसार निवृत्तिवेतन निश्चित केले जाईल. विशेष म्हणजे, किमान १० वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान ७ हजार ५०० रुपये निवृत्तिवेतन मिळेल.

**अंमलबजावणीची महत्त्वाची अट**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना त्यांच्या पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण कडील संचित निधीपैकी ६० टक्के परताव्याची रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल. उर्वरित ४० टक्के निधीतून मिळणाऱ्या वार्षिकीचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. शासन या वार्षिकीची रक्कम एकूण देय निवृत्तिवेतनातून वजा करून उर्वरित रक्कम पेन्शन म्हणून देणार आहे. तसेच, ज्या कर्मचाऱ्यांनी संचित निधीतून यापूर्वी अंशतः रक्कम काढली असेल, त्यांना ती १० टक्के व्याजासह परत भरावी लागेल, अन्यथा त्यांच्या पेन्शनमध्ये त्या प्रमाणात कपात होईल. (तभा वृत्तसेवा)

### कोणाकोणाला मिळणार लाभ?

**हा सुधारित पेन्शनचा निर्णय केवळ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित नाही. जिल्हा परिषद कर्मचारी, अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी आणि बिगर-कृषी विद्यापीठे, संलग्न महाविद्यालयांमधील कर्मचारी, जे राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीचे सदस्य आहेत, त्यांनाही हा निर्णय लागू करण्यात आला आहे. पात्र कर्मचाऱ्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत आपल्या कार्यालय प्रमुखांकडे लेखी विकल्प सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे.**

### कुटुंब निवृत्तिवेतन आणि आर्थिक सुरक्षा

**कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी कुटुंब निवृत्तिवेतनाची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये मूळ निवृत्तिवेतनाच्या ६० टक्के रक्कम आणि त्यावरील महागाई वाढ कुटुंबाला लागू राहील. तसेच, या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदानाचे लाभही पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.**

## महत्त्वाचे

### सुनेत्रा पवार यांचा खासदारकीचा राजीनामा

**पुणे** : उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.



त्यांनी उपराष्ट्रपती तसेच राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन् यांची भेट घेत अधिकृतरीत्या राजीनामा सादर केला असल्याचे वृत्त आहे. उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांच्या खासदारकीच्या राजीनाम्यावर चर्चा सुरू झाली होती. मात्र, बारामती विधानसभा निवडणुकीत त्यांनी विक्रमी मतांनी विजय मिळवला. नियमांनुसार, संसद आणि विधानसभा अशा दोन सभागृहांत निवडून आलेल्या व्यक्तीने १४ दिवसांच्या आत एका पदाचा राजीनामा देणे आवश्यक असते. या पृष्ठभूमीवर निवडणुकीचा निकाल जाहीर होताच त्यांनी राज्यसभेतील पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे राज्यसभेतील एक जागा रिक्त झाली असून लवकरच त्या जागेसाठी पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे.

## आता शहरी भागातील ७/१२ इतिहासजमा

**मुंबई** : राज्यातील नागरीकरणाचा वेग विचारात घेता, महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांसाठी राज्य सरकारने एक क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. या क्षेत्रातील जुने ७/१२ उतारे आता कायमचे बंद होणार असून, त्याऐवजी रहिवाशांना अधिकृत प्रॉपर्टी कार्ड (मालमत्ता पत्रक) प्रदान करण्यात येणार आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत यासंदर्भातील स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले आहेत. जेव्हा एखाद्या ग्रामीण भागाचा समावेश महापालिका किंवा नगरपालिकेच्या हद्दीत होतो, तेव्हा त्या जमिनीचे मूळ स्वरूप शेतीकडून अकृषक (एनए) कडे वळते. नियमानुसार, नागरी वस्तीत ७/१२ उताऱ्यापेक्षा प्रॉपर्टी कार्ड असणे कायदेशीरदृष्ट्या अधिक संयुक्तिक ठरते. मात्र, अनेक ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे ७/१२ सुरूच राहिल्याने नागरिकांना प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत होता. ही विसंगती दूर करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे.

# दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ

## पालक, विद्यार्थ्यांमध्ये नाराजी

**पुणे, ६ मे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात जुलै- ऑगस्ट २०२६ पासून वाढ करण्याचा निर्णय राज्य मंडळातर्फे घेण्यात आला आहे.

त्यामुळे दहावी-बारावीची परीक्षा उत्तीर्ण होणे सुध्दा आता महाग होणार आहे. इयत्ता दहावी परीक्षेचे वाढीव शुल्क परीक्षा शुल्क ५७० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रमाणपत्र शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क शास्त्र विषय १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क तंत्र प्रति विषय शंभर रुपये, खाजगी विद्यार्थी नोंदणी शुल्क एक हजार ११० रुपये, खाजगी विद्यार्थी प्रक्रिया शुल्क १०० रुपये. इयत्ता बारावी परीक्षेचे वाढीव शुल्क परीक्षा शुल्क ५९० रुपये, प्रशासकीय शुल्क २० रुपये, गुणपत्रिका शुल्क २० रुपये, प्रमाणपत्र शुल्क २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा प्रती विषय १५ रुपये, एमसीव्हीसी प्रात्यक्षिक परीक्षा प्रति विषय ३० रुपये, माहिती तंत्रज्ञान विषयक शुल्क प्रति विषय २०० रुपये, खाजगी विद्यार्थी नोंदणी शुल्क एक हजार ११० रुपये, खाजगी विद्यार्थी प्रक्रिया शुल्क १०० रुपये असेल.

# 'वंदे मातरम्'ला कायदेशीर संरक्षण

## केंद्र सरकारचा निर्णय, अवमान केल्यास तीन वर्षांचा कारावास

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत वंदे मातरम् गीताला कायदेशीर संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकार कायद्यात ऐतिहासिक बदल करून राष्ट्रगीताप्रमाणेच वंदे मातरम्ला कायदेशीर संरक्षण मिळणार आहे. राष्ट्रगीताचा अवमान झाल्यास तीन वर्षापर्यंतच्या कारावासाची तरतूद असेल.

या प्रस्तावाचा उद्देश वंदे मातरमला राष्ट्रगीत जन गण मनच्या बरोबरीचा दर्जा देणे हा आहे. सध्या, हा कायदा राष्ट्रध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताचा अपमान किंवा त्यात व्यत्यय आणल्यास शिक्षेची तरतूद करतो. या दुरुस्तीनंतर, वंदे मातरम्चाही या यादीत समावेश केला जाईल, ज्यामुळे त्याच्या तरतुदींचे पालन न करणे हा शिक्षेस पात्र गुन्हा ठरेल. एखाद्या व्यक्तीने हेतुपुरस्सर राष्ट्रगीत गाण्यास अडथळा आणला किंवा प्रतिबंध केला, तर त्याला किंवा तिला तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. नव्या निर्णयानुसार सरकार 'राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंधक कायदा' यामध्ये सुधारणा करणार आहे. या दुरुस्तीमुळे 'वंदे मातरम्'ला देखील त्याच कायदेशीर चौकटीत आणले जाईल, ज्यामध्ये राष्ट्रगीत संरक्षित आहे. (वृत्तसंस्था)



### निर्णयाचे महत्त्व आणि पृष्ठभूमी

**बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे गीत भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. या गीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय प्रतिकात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.**

## जलदगती न्यायालय स्थापन करण्यास सुरुवात

**पुणे** : नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार व हत्या प्रकरणाचा तातडीने निकाल लावण्यासाठी राज्य सरकारच्या निर्देशानुसार आणि उच्च न्यायालयाच्या परवानगीने जलदगती न्यायालय स्थापन करण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये विशेष तज्ज्ञांची नेमणूक करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. दरम्यान, आरोपीला फाशीची शिक्षा सुनिश्चित करण्यासाठी आमचे प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले. जिल्हाधिकारी डुडी म्हणाले, भोर तालुक्यातील नसरापूर येथील चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याची घटना अत्यंत संतापजनक आहे.

# प. बंगाल भाजपा विधिमंडळाची उद्या बैठक

## शनिवारी भाजपाच्या नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

पश्चिम बंगालचा नवा मुख्यमंत्री निवडण्यासाठी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक ८ मेला सायंकाळी कोलकाता येथे होणार आहे. या बैठकीला उपस्थित राहण्याचे निर्देश सर्व आमदारांना देण्यात आले आहे.

शुक्रवारी विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड झाल्यानंतर शनिवार ९ मेला सकाळी १० वाजता ब्रिगेड परेड मैदानावर आयोजित समारंभात भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहे, पश्चिम बंगाल भाजपाचे अध्यक्ष शमिक भट्टाचार्य यांनी याबाबतचे संकेत दिले.

९ मे ला गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती आहे. या शपथविधी समारंभाची जोरदार तयारी सुरु करण्यात आली आहे. पश्चिम बंगालमध्ये प्रथमच भाजपाला बहुमत मिळाले असून भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहे, त्यामुळे हा सोहळा भव्यदिव्य करण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह भाजपाचे सर्व ज्येष्ठ नेते या शपथविधी समारंभाला उपस्थित राहणार आहेत. भाजपाच्या तसेच रालोआच्याही मुख्यमंत्र्यांना या शपथविधी समारंभासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या शपथविधी समारंभाच्या निमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शन करण्याची भाजपाची योजना आहे.

भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेता निवडीच्या बैठकीसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भाजपाने केंद्रीय निरीक्षक बनवले असून ओडिशाचे मुख्यमंत्री मोहनचरण मांझी हे सहनिरीक्षक राहणार आहेत.

पश्चिम बंगालमध्ये भाजपाच्या मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेत अनेक दावेदार असले तरी मावळत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना एकदा नाही तर दोनदा विधानसभा निवडणुकीत पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी यांचे नाव आघाडीवर आहे. अधिकारी मावळत्या विधानसभेतील विरोधी पक्षनेतेही आहेत. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत प्रदेश अध्यक्ष शमिक भट्टाचार्य, माजी प्रदेश भाजपा अध्यक्ष दिलीप घोष, उत्पल महाराज, रुपा गांगुली आणि अग्निमित्रा पॉल यांचीही नावे आहेत. (तभा वृत्तसेवा)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### केंद्र सरकारचा महाराष्ट्रातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना विशेष दिलासा

**नवी दिल्ली** : महाराष्ट्रातील हरभरा (चना) उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये चना खरेदीची कमाल मर्यादा वाढवून ८.१९ लाख मेट्रिक टन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सुमारे ४,८१६.८० कोटी रुपयांची किमान आधारभूत किंमत सुरक्षा आता शेतकऱ्यांना मिळणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य व हमीभाव मिळावा यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. याबरोबरच खरेदीची अंतिम मुदत वाढवून २९ मे २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे जे शेतकरी वेळेत आपला माल विकू शकले नाहीत, त्यांनाही आता या आधारभूत किंमतीचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातील हरभरा उत्पादकांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून, हजारो शेतकऱ्यांना थेट आर्थिक दिलासा मिळणार आहे.



सत्ता बदलानंतर पश्चिम बंगालमधील सामाजिक वातावरणाने मुक्त श्वास घेतला. भगवा ध्वज घेऊन फिरताना कोलकाता शहरातील चिमुकला

### टेक्सासमध्ये बेछूट गोळीबार; दोन ठार

**वॉशिंग्टन** : अमेरिकेतील टेक्सासमध्ये एका शॉपिंग मॉलजवळ झालेल्या गोळीबारात दोन जण ठार आणि तीन जण जखमी झाले. पोलिसांनी हल्लेखोराला अटक केली आहे. प्राथमिक तपासात हा हल्ला वैयक्तिक वैमनस्यातून झाल्याचे समोर आले. अमेरिकेतील टेक्सास राज्यातील डॅलसच्या उत्तरेकडील कॅरोलटन शहरात मंगळवारी रात्री हल्लेखोराने पाच जणांवर गोळीबार केला. या हिंसक घटनेत दोन जण ठार आणि इतर तीन जण जखमी आहे. पोलिसांनी कारवाई करून हल्लेखोराला अटक केली. कॅरोलटनचे पोलिस प्रमुख रॉबर्टो अरेडोंडो यांनी सांगितले की, हल्लेखोर आणि पीडित एकमेकांना ओळखत होते. त्यांचे व्यावसायिक संबंध होते आणि ते एका बैठकीसाठी भेटले होते. तथापि, त्या बैठकीमागील हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, एफबीआय आणि एका केंद्रीय संस्थेने घटनेचा तपास सुरू केला आहे.

### नेपाळमध्ये हजारो अधिकारी बरखास्त

**काठमांडू** : नेपाळच्या नवीन सरकारने २६ मार्चपूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या दीड हजार अधिकाऱ्यांना सरकारी सेवेतून बरखास्त केले. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी अध्यादेश जारी करून सर्व नियुक्त्या रद्द करण्याचे आदेश दिले. या निर्णयांतर्गत १५९४ पदांवर असलेल्या अधिकाऱ्यांना हटविण्यात आले आहे. सरकारने यांना 'राजकीय नियुक्त्या' संबोधत रद्द केले आहे. हटवण्यात आलेल्यांमध्ये नेपाळ इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी, त्रिभुवन युनिव्हर्सिटी, बीपी कोईराला इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस आणि नेपाळ एअरलाइन्स यांसारख्या प्रमुख संस्थांमधील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सरकारने यासंदर्भात जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, हे पाऊल पारदर्शकता आणि जबाबदारी वाढवण्यासाठी आवश्यक होते. मात्र, नवीन नियुक्त्यांबाबत कोणतीही स्पष्ट योजना अद्याप समोर आलेली नाही.

# काँग्रेसची 'द्रमुक'ला सोडचिठ्ठी

## • जातीयवादी पक्षांना बाहेर ठेवण्यासाठी 'विजय'ला साथ
## • सशर्त पाठिंब्यावरून काँग्रेसने स्पष्ट केली भूमिका

**नवी दिल्ली, ६ मे**

तमिळनाडूमध्ये सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला असून काँग्रेसने विजय जोसेफच्या 'तमिळगा वेत्री कळघम' अर्थात टीव्हीके पक्षाला सशर्त जाहीर पाठिंबा दिला आहे. तत्पूर्वी त्यांनी द्रमुक पक्षाबरोबर असलेली पाच दशकांपासूनची आघाडी मोडली असल्याची घोषणा केली. काँग्रेस पक्षाने एक प्रसिद्धीपत्रक काढले असून यात आघाडी का मोडत आहे? याची कारणे दिली. संविधानाला न मानणाऱ्या जातीयवादी पक्षांना टीव्हीके दूर ठेवेल, या अटीवर आपण पाठिंबा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

निकालात विजय जोसेफच्या पक्षाला सर्वाधिक १०८ जागा मिळाल्या. मात्र बहुमतासाठी लागणाऱ्या ११८ जागांचा टप्पा गाठण्यासाठी त्यांना १० आमदारांची आवश्यकता होती. कांग्रेसचे ५ आमदार निवडून आले आहेत. तसेच सीपीआय आणि सीपीआयएम या डाव्या पक्षांचे चार आमदार निवडून आले आहेत. याशिवाय इतर लहान पक्षांना बरोबर घेऊन टीव्हीकेने सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू केल्या.

या पृष्ठभूमीवर काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले, टीव्हीके पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय यांनी सत्तास्थापनेसाठी अधिकृतरित्या प्रस्ताव दिला. तमिळनाडूमधील जनतेने आणि विशेषतः तरूणांनी धर्मनिरपेक्ष, प्रगतीशील आणि घटनात्मक तत्त्वावर विश्वास असलेल्या पक्षाला साथ दिली आहे. सरकारला पाठिंबा देण्यासाठी काही अटी ठेवल्या. संविधानावर ज्यांचा विश्वास नाही अशा जातीयवादी पक्षांना या आघाडीत घेऊ नका, अशी प्रमुख अट त्यात आहे. (वृत्तसंस्था)

### काँग्रेसने पाठीत खंजीर खुपसला

काँग्रेसने टीव्हीकेला दिलेल्या पाठिंब्यामुळे द्रमुक पक्ष संतप्त झाला आहे. द्रमुकचे प्रवक्ते सरवणन अण्णादुराई यांनी म्हटले की, काँग्रेसने टीव्हीकेला पाठिंबा देऊन राज्यातील जनतेच्या पाठीत खंजीर खुपसला. दोन मंत्रिपदांच्या लोभापायी टीव्हीकेला पाठिंबा देऊन काँग्रेस आत्मघातकी पाऊल उचलत आहे. आमचे नेते एम. के. स्टॅलिन यांनीच सर्वप्रथम काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून प्रस्तावित केले होते. असे असूनही, काँग्रेसने इतक्या उघडपणे विश्वासघात केला आहे.



# टीव्हीकेचा सरकार स्थापनेचा दावा

**चेन्नई, ६ मे**

तामिळनाडू वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाचे प्रमुख थलपती विजय यांनी बुधवारी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याचा दावा केला. त्यांनी राज्यपालांना पक्षाच्या आमदारांचे पाठिंब्याचे पत्र देखील सादर केले. यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे आमदार आणि प्रमुख नेते उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत विजय यांचा पक्ष सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. त्यांच्या पक्षाचे १०८ आमदार असून, सरकार स्थापनेसाठी दहा आमदारांची आवश्यकता आहे. काँग्रेस, पीएमके आणि आययूएमएलने त्यांना पाठिंबा जाहीर केल्यामुळे बहुमताचा आकडा गाठणे शक्य होणार असल्याचे टीव्हीकेच्या एका आमदाराने सांगितले.

२३४ सदस्यांच्या तामिळनाडू विधानसभेत सरकार स्थापन करण्यासाठी ११८ जागांची आवश्यकता आहे. काँग्रेसचे पाच आमदार, पीएमके चार, आययूएमएलचे दोन आमदार टीव्हीकेसोबत सरकारमध्ये असेल. पक्षाच्या सूत्रांनुसार, विजय ७ मे रोजी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी शपथ घेण्याची शक्यता आहे.

पक्षाच्या वतीने अद्याप यासंदर्भात अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. दरम्यान काँग्रेसने पाठिंबा दिल्याने टीव्हीकेने एआयएडीएमकेचा युतीचा प्रस्ताव सध्यापुरता स्थगित केला आहे. (वृत्तसंस्था)

# केरळ काँग्रेस विधिमंडळ पक्षाची आज बैठक

**नवी दिल्ली, ६ मे**

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचा नवा मुख्यमंत्री निवडण्यासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. गुरुवार ७ मेला काँग्रेसने विधिमंडळ पक्षाचा नेता निवडण्यासाठी नवनिर्वाचित बैठक आयोजित केली आहे.

विधानसभा निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीचा पराभव करत काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीने बहुमत मिळावले आहे. गुरुवारी ७ मेला सकाळी काँग्रेसने नवनिर्वाचित आमदारांची बैठक बोलावली आहे. नेता निवडीच्या बैठकीसाठी काँग्रेसने ज्येष्ठ नेते अजय माकन आणि मुकुल वासनिक यांना केंद्रीय निरीक्षक म्हणून केरळला पाठवले आहे. केरळला जाण्यापूर्वी माकन आणि वासनिक यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांची भेट घेतली.

केरळच्या मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेत के.सी. वेणुगोपाल, रमेश चेन्नीथला, सनी जोसेफ, शशी थरुर आणि व्ही. डी. सतीश आदी नेते आहेत. त्यामुळे काँग्रेसला केरळच्या नव्या मुख्यमंत्र्यांची निवड करतांना मोठी कसरत करावी लागणार आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आपले वजन ज्या नेत्याच्या पारड्यात टाकतील, तो नेता केरळचा मुख्यमंत्री होणार आहे. के.सी. वेणुगोपाल हे राहुल गांधी यांचे निकटवर्ती म्हणून ओळखले जातात, त्यामुळे त्यांचे पारडे जड मानले जात आहे. (वृत्तसंस्था)

### आर. बी. चौधरी यांचा अपघाती मृत्यू

**उदयपूर** : दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ निर्माते आर. बी. चौधरी यांचा उदयपूर येथे झालेल्या अपघातात मृत्यू झाला. ते प्रवास करत असताना हा अपघात झाला. या घटनेनंतर चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली असून अनेकांनी त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली. दक्षिणेकडील चित्रपटसृष्टीत चौधरी यांचे मोठे योगदान आहे. तमिळ, तेलुगू आणि मल्याळम भाषांमध्ये शंभराहून अधिक चित्रपटांची निर्मिती करून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली होती. ते तमिळ चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता जीवा यांचे वडील होते. त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात १९८८ मध्ये झाली होती.

### निवासी इमारतीला आग; तिघांचा मृत्यू

**भुवनेश्वर, ६ मे**

ओडिशाची राजधानी भुवनेश्वरमधील लक्ष्मीसागर परिसरातील बसंती व्हिला अपार्टमेंटमध्ये बुधवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत १० वर्षांच्या मुलीसह तिघांचा मृत्यू झाला. पहाटे ४ वाजताच्या सुमारास तळमजल्यावर लागलेली आग चौथ्या माळ्यापर्यंत पोहोचली. अग्निशमन दलाची अनेक वाहने घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवून ३० जणांना सुखरूप बाहेर काढले. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले, आग आणि धूर इमारतीत वेगाने पसरल्याने अनेक लोक आत अडकले. या घटनेत एका मुलीसह तिघांचा होरपळून मृत्यू झाला. अग्निशमन दलाचे अधिकारी रमेश चंद्र सेठी यांनी सांगितले की, आगीच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे. (वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्र्यांच्या दोन सल्लागारांचा राजीनामा

**कोलकाता, ६ मे**

राज्यातील सत्तांतरानंतर पश्चिम बंगालच्या निवर्तमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे मुख्य सल्लागार असलेले दोन माजी मुख्य सचिव आलापन बंडोपाध्याय आणि एच. के. द्विवेदी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे, असे एका अधिकाऱ्याने बुधवारी सांगितले.

या दोन निवृत्त आयएएस अधिकाऱ्यांनी मंगळवारी राजीनामे सादर केले. प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ अभिरूप सरकार यांनीही पश्चिम बंगाल औद्योगिक विकास महामंडळ आणि पश्चिम बंगाल लघु उद्योग विकास महामंडळ या दोन्ही संस्थांच्या अध्यक्षपदावरून पायउतार झाले आहेत, असे राज्य सचिवालयातील अधिकाऱ्याने सांगितले. या राजीनाम्यांनंतर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. २०२१ मध्ये बदलीच्या आदेशावरून राज्य आणि केंद्र सरकार यांच्यात निर्माण झालेल्या तणावाच्या केंद्रस्थानी बंडोपाध्याय होते.

यानंतर, त्यांच्या निवृत्तीनंतर मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यापूर्वी राज्याचे महाधिवक्ता किशोर दत्ता यांनी राज्यपाल आर. एन. रवी यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला होता. २९४ सदस्यांच्या विधानसभेत भाजपाने २०७ जागा मिळवून पश्चिम बंगालमधील टीएमसीच्या १५ वर्षांच्या अखंड राजवटीचा अंत केला. (वृत्तसंस्था)

# दोन स्फोटांमुळे पंजाब हादरले

## जालंधर, अमृतसरमधील घटना • एनआयएकडे तपासाची सूत्रे

**चंदीगड, ६ मे**

पंजाबमध्ये एका पाठोपाठ झालेल्या दोन स्फोटांमुळे पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांची काळजी वाढीली आहे. जालंधर आणि अमृतसरमधील बीएसएफ आणि लष्कराशी संबंधित परिसरात झालेल्या या स्फोटामुळे येथे दहशतवादाचे मोठे मॉड्युल सक्रिय झाल्याची भीती आहे. स्फोटामागे आयएसआयचा कट आणि खलिस्तानी संबंध प्राथमिक तपासात आढळला आहे. या प्रकरणाचा तपास एनआयएकडे सोपवण्यात आला.

हा स्थानिक पातळीवर घडवलेला घातपात आहे किंवा यामागे मोठे नेटवर्क काम करीत आहे, याचा तपास केला जात आहे. अशा प्रकारची पंजाबमध्ये घडलेली ही पहिलीच घटना नाही. मागील काही वर्षांत या राज्यात अशा घटना समोर आल्या आहेत.

पहिला स्फोट जालंधर येथील बीएसएफ मुख्यालयाबाहेर झाला. यामुळे संपूर्ण परिसरात दहशत निर्माण झाली. हा स्फोट मंगळवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास झाला. याचा आवाज दूरपर्यंत ऐकू गेला. स्फोटानंतर एका स्कुटीला आग लागली.

त्या स्कुटीत स्फोट झाल्याचा संशय सुरुवातीला होता. मात्र, स्फोटाच्या तडाख्यात ती स्कुटी सापडल्याचे नंतर स्पष्ट झाले. घटनेनंतर पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संपूर्ण परिसर सील केला. जालंधरमधील स्फोटानंतर काही तासांनी अमृतसहमधील खासा परिसरात एक स्फोट झाला.

लष्कराच्या छावणीबाहेरील भिंतीजवळ हा स्फोट झाला. यामुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. खासा लष्करी छावणी अटारी-वाघा या आंतरराष्ट्रीय सीमेपासून १५ किमी अंतरावर आहे. त्यामुळे हे प्रकरण अतिशय संवेदनशील मानले जात आहे. हा एक कट असल्याचे संकेत मिळत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

खासा लष्करी छावणीच्या द्वार क्रमांक ६ आणि ७ दरम्यान हा स्फोट झाल्याचे पोलिसांनी सांगितले. (वृत्तसंस्था)




घटनास्थळाची पाहणी करताना फॉरेन्सिक विभागाचा अधिकारी

### 'ऑपरेशन सिंदूर' वर्षपूर्तीच्या विरोधासाठी स्फोट

अमृतसरच्या खासा येथील लष्करी छावणीजवळ झालेला स्फोट कमी तीव्रतेचा होता, अशी माहिती पंजाबचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी बुधवारी दिली. या स्फोटाची जबाबदारी कोणत्याही गटाने स्वीकारलेली नाही. मात्र, यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे दिसून येत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ची वर्षपूर्ती असल्याने पंजाबमध्ये अशांतता निर्माण करण्यासाठी आयएसआयच्या कारस्थानांचा हा एक भाग असल्याचा अंदाज आहे, असे यादव यांनी सांगितले.

# ताज आणि ट्रायडंट हॉटेल उडवून देण्याची धमकी

## २६/११ सारख्या हल्ल्याचा दिला होता इशारा

**मुंबई, ६ मे**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला पुन्हा एकदा दहशतवादी हल्याने हादरवून सोडण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली. मुंबईतील नामांकित हॉटेल ताज पॅलेस आणि हॉटेल ट्रायडंट ही दोन ठिकाणे बॉम्बने उडवून देण्याचा धमकीचा फोन आल्यानंतर मुंबई पोलिसांनी तातडीने चक्र फिरवली आणि या प्रकरणी एका संशयित आरोपीला अटक करण्यात यश आले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे.

मुंबई पोलिस नियंत्रण कक्षाला एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला होता. या फोनवरून त्याने हॉटेल ताज आणि हॉटेल ट्रायडंट येथे २६/११ सारखा मोठा दहशतवादी हल्ला करण्याची आणि ही हॉटेल्स बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली होती. धमकीचा फोन येताच मुंबई पोलिस, गुन्हे शाखा आणि महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक सक्रिय झाले. ज्या क्रमांकावरून फोन आला होता, त्याच्या तांत्रिक बाबी तपासण्यात आल्या. तपासाची सुत्रे वेगाने हलवत पोलिसांनी या फोनचा मागमूस काढला, ज्याचे धागेदोरे सायन परिसरात सापडले. पोलिसांनी या भागातून एका संशयिताला ताब्यात घेतले असून, त्याची चौकशी केली जात आहे. (तभा वृत्तसेवा)



### तृणमूलचा लोकशाहीवर नव्हे, बंदुकीवर विश्वास

**नवी दिल्ली, ६ मे**

पश्चिम बंगालमधील लोकशाहीची अवस्था खूपच वाईट आहे आणि निवडणुकीचे निकाल स्वीकारण्यास त्यांचा नकार हे सत्य उघड करतो. तृणमूलचा विश्वास लोकशाहीवर नव्हे, तर बंदुकीवर आहे, त्यामुळेच जनादेश स्वीकारण्यास ममता बॅनर्जी नकार देत असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केला.

पराभूत होऊनदेखील ममता यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला, यावर टीका करताना प्रधान म्हणाले, पश्चिम बंगालमधील लोकशाही व्यवस्था बंदुकीच्या धाकावर आहे आणि त्यामुळेच त्यांनी निवडणुकीचे निकाल स्वीकारण्यास नकार दिला. जनादेश स्वीकारण्यास नकार देणे लोकशाहीला विरोध करण्यासारखेच आहे.

तृणमूल काँग्रेसचे नेतृत्व जबाबदारी टाळत आहे आणि सत्ता टिकवण्यासाठी निवडणूक आयोग व सुरक्षा दलांसारख्या संस्थांची विश्वासार्हता कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. (वृत्तसंस्था)

# महिलांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी मोहीम

### रिलायन्स फाऊंडेशचा उपक्रम

**मुंबई, ६ मे**

रिलायन्स फाऊंडेशन आणि गेट्स फाऊंडेशन यांनी महिलांचा डिजिटल सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने 'शीकनेक्ट्स डिजिटल ॲक्सेलरेटर' या उपक्रमाची घोषणा केली आहे. २०० कोटींच्या या उपक्रमाद्वारे भारत आणि उप-सहारा आफ्रिका भागातील महिला व मुलींना डिजिटल तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

पुढील तीन वर्षांत हा कार्यक्रम स्थानिक पातळीवर प्रभावी ठरलेल्या डिजिटल उपायांची ओळख करून त्यांना व्यापक स्तरावर पोहोचविण्याचे काम करणार आहे. ते महिलांच्या जीवनमान आणि उपजीविकेत सकारात्मक बदल घडवू शकतील. रिलायन्स फाऊंडेशन भारतात या उपक्रमांतर्गत आधीच प्रभावी ठरलेल्या डिजिटल उपायांना पुढे नेणार असून, गेट्स फाऊंडेशनच्या सहकार्याने भारत आणि उप-सहारा आफ्रिका यांच्यात अनुभव व ज्ञानाची देवाणघेवाण करण्यावरही भर दिला जाईल. महिलांना डिजिटल जगात पूर्ण सहभागासाठी आवश्यक साधने आणि आत्मविश्वास प्रदान करणे अत्यंत गरजेचे आहे, असे या प्रसंगी रिलायन्स फाऊंडेशनच्या प्रमुख महिला सक्षमीकरण, एन. दीप्ती रेड्डी यांनी सांगितले. त्यांच्या मते, हा उपक्रम महिलांची डिजिटल पोहोच वाढवून त्यांना अधिक सक्षम बनविण्यास मदत करेल. ग्लोबल साउथमधील अनेक देशांमध्ये महिलांना अजूनही डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेत विविध अडचणींचा सामना करावा लागतो. हा उपक्रम स्थानिक गरजांनुसार तयार केलेल्या उपायांना चालना देईल, असे गेट्स फाऊंडेशनच्या उपसंचालक-जेंडर इक्वॅलिटी, सांची भल्ला यांनी सांगितले.

रिलायन्स फाऊंडेशनच्या माहितीनुसार, मागील तीन वर्षांत त्यांनी भारतात सहा लाखांहून अधिक महिलांपर्यंत डिजिटल तंत्रज्ञानाशी संबंधित उपक्रम पोहोचवले आहेत. तसेच, २०३० पर्यंत 'डिजिटल जेंडर' अंतर निम्मे करण्याच्या जागतिक उद्दिष्टपूर्तीतही हा उपक्रम महत्त्वपूर्ण योगदान देणार आहे. (वृत्तसंस्था)




# ठाकरेंची मशाल विझण्याच्या बेतात?

## कोकणात चाणक्याची साथ सुटली • परभणीत ८२ पदाधिकाऱ्यांचे सामूहिक बंड!

**मुंबई, ६ मे**

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर शिवसेना ठाकरे गटाची पडझड पुन्हा सुरू झाली आहे. कोकण आणि मराठवाडा या दोन्ही बालेकिल्ल्यांमध्ये एकाच वेळी जबरदस्त धक्के बसले आहेत. कोकणातील शिवसेनेचे रणनीतीकार संदेश पारकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवत भगव्याला साथ दिली आहे, तर दुसरीकडे परभणीत पक्षांतर्गत यादवीने टोक गाठले असून तब्बल ८२ पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनाम्याचे अस्त्र उपसले आहे.



संदेश पारकर

कणकवलीचे नगराध्यक्ष आणि कोकणातील राजकीय चाणक्य मानले जाणारे संदेश पारकर आता सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. आपल्या आगळ्यावेगळ्या कणकवली पॅटर्नमुळे चर्चेत राहिलेल्या पारकर यांनी स्वतः या पक्षबदलाच्या वृत्ताला दुजोरा दिल्याने सिंधुदुर्गात ठाकरे गटाच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गतिमान कार्यपद्धतीला साथ देण्यासाठी आपण हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पारकर यांच्यासारखा मोठा जनसंपर्क असलेला नेता गळाला लागल्याने आगामी निवडणुकांमध्ये कोकणात ठाकरेंची उरलीसुरली समीकरणेही विस्कळीत होणार आहेत. (तभा वृत्तसेवा)




### ठाकरे गटाची तटबंदी खिळखिळी

एका बाजूला कोकणातील अनुभवी नेतृत्वाची गळती आणि दुसऱ्या बाजूला मराठवाड्यातील निष्ठावान कार्यकर्त्यांचे सामूहिक बंड, अशा कात्रीत ठाकरे गट अडकला आहे. एकामागून एक बसणाऱ्या या हादऱ्यांमुळे पक्षाची तटबंदी पूर्णपणे खिळखिळी झाली असून, आता मातोश्रीवरून या गळतीला रोखण्यासाठी कोणते डॅमेज कंट्रोल केले जाते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. परंतु, सध्याची परिस्थिती पाहता ठाकरेंच्या मशालीचा प्रकाश धूसर होत असल्याचेच चित्र दिसत आहे.

### परभणीत निष्ठावंतांचा उठाव; ८२ पदाधिकाऱ्यांचा रामराम!

कोकणात नेत्याने पाठ फिरवलेली असताना, मराठवाड्यातील परभणीत मात्र कार्यकर्त्यांनीच बंडाचे निशाण फडकवले आहे. माजी जिल्हाप्रमुख गंगाप्रसाद आनेराव यांना पदावरून हटवल्याच्या निषेधार्थ तब्बल ८२ निष्ठावान पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचे सामूहिक राजीनामे दिले आहेत. शिवसेना भवन येथील बैठकीला गैरहजर राहिल्याचा तांत्रिक ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली होती. मात्र, यामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. खासदार संजय जाधव यांचे निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या आनेराव यांच्यावरील कारवाई मागे न घेतल्यास पक्षाचे प्राथमिक सदस्यत्वही सोडण्याचा इशारा या संतप्त गटाने दिला आहे.



आमचा हिंदी भाषेला विरोध नाही, पण राज्याची पहिली भाषा ही मराठी आहे. हिंदी, इंग्रजी या भाषा राष्ट्रीय स्तरावर काम करण्यासाठी गरजेच्या आहेत.
**- संजय राऊत,** खासदार

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

जो जो पक्ष काँग्रेसच्या नादी लागला त्यांचे अस्तित्व संपवण्याचे काम काँग्रेसने केले आहे. काँग्रेस आपल्या सहकाऱ्यांना गिळत मोठे होण्याचा प्रयत्न करणारा अजगर आहे.
**- नवनाथ बन,** भाजपा प्रवक्ते





# ‘प्रोजेक्ट फ्रीडम’ मोहीम गुंडाळली

## डोनाल्ड ट्रम्प यांची माहिती



**◆ वॉशिंग्टन, ६ मे**

**होर्मुजच्या सामुद्रधुनीतून जहाजे सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सुरू केलेली ‘प्रोजेक्ट फ्रीडम’ मोहीम बंद करण्याची घोषणा अमेरिकेने केली आहे. सुरक्षेची हमी दिल्यानंतरही या जलमार्गातून जहाजांची वाहतूक बंदच असून दोन दिवसात केवळ तीन जहाजांनी प्रवास केला. शिवाय इराणने वाटाघाटी करण्याची तयारी दर्शविल्याने ही मोहीम बंद करण्यात येत असल्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.**

- **इराणची वाटाघाटी करण्याची तयारी**
- **दोन दिवसांत केवळ तीन जहाजांचे प्रस्थान**



अमेरिकेने सोमवारी सकाळी होर्मुजच्या सामुद्रधुनीतून जहाजे सुरक्षित बाहेर काढण्यासाठी ही मोहीम सुरू केली होती. ट्रम्प म्हणाले, पाकिस्तानकडून ही मोहीम थांबविण्याची विनंती करण्यात आली होती. इराणसोबतच्या कराराबाबत चर्चा पुढे सरकली आहे, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. अमेरिकेने या मोहिमेंतर्गत सोमवारी दोन आणि मंगळवारी फक्त एक जहाज सुरक्षित बाहेर काढले. ही मोहीम सुरू झाल्यानंतर इराण संतापला होता. त्याने इशारा दिला होता की, त्याच्या परवानगीशिवाय कोणतेही जहाज या मार्गातून गेल्यास हल्ला चढविला जाईल. हल्ल्याच्या भीतीने जहाजांची वाहतूक बंद झाली होती. इराणने होर्मुजमध्ये दक्षिण कोरियाच्या एका जहाजावर हल्ला केला. तसेच, यूएईमध्ये क्षेपणास्त्र हल्ले चढवले होते. पर्यायाने केवळ दोन दिवसातच अमेरिकेला होर्मुझ जलमार्गातील ‘प्रोजेक्ट फ्रीडम’ मोहीम गुंडाळावी लागली. दुसरीकडे इराणच्या सरकारी माध्यमांनी याला आपला विजय म्हटले. त्यांचे म्हणणे आहे की, ट्रम्प यांना माघार घ्यावी लागली. कारण ते हा मार्ग खुला करण्यात अयशस्वी ठरले. ◂(वृत्तसंस्था)

### इराण झुकणार नाही : पेझेश्कियन



**»» इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियन यांनी म्हटले की, इराण आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत चर्चेसाठी तयार आहे, परंतु कोणत्याही दबावापुढे झुकणार नाही. एकतर्फी मागण्यांपुढे शरणागती पत्करावी, अशी अमेरिकेची इच्छा आहे. पण हे अशक्य आहे. इराण युद्ध आणि असुरक्षिततेला व्यवहार्य पर्याय मानत नाही. अवाजवी मागण्या करून ते अतिरिक्त दबाव आणत आहे. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार आणि जागतिक देखरेखीखाली अणुसंबंधित उपक्रमांचे शांततापूर्ण स्वरूप सुनिश्चित करण्यासाठी जे काही आवश्यक असेल ते देण्यास इराण पूर्णपणे तयार आहे.** ■

### होर्मुझ नाकेबंदीवर ट्रम्प एकाकी

**»» एकीकडे अमेरिका लष्करी पर्यायाद्वारे होर्मुझ जलमार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न करीत आहे तर दुसरीकडे फ्रान्स आणि युरोप वाटाघाटीतून तोडगा काढण्यावर आग्रही आहेत. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी म्हटले की, युरोप स्वतःची स्वतंत्र सुरक्षा चौकट विकसित करीत आहे आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील कोणत्याही अस्पष्ट लष्करी कारवाईचा भाग होणार नाही. ट्रम्प यांनी सुरू केलेल्या प्रोजेक्ट फ्रीडममध्ये सामील होण्यास त्यांनी स्पष्टपणे नकार दिला.** ■

### काय होता ‘प्रोजेक्ट फ्रीडम?’

**»» होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे अडकलेली जहाजे सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी ट्रम्प यांनी गेल्या सोमवारी प्रोजेक्ट फ्रीडम सुरू करण्याची घोषणा केली होती. अमेरिकेने मार्गदर्शित क्षेपणास्त्रे, १०० हून अधिक विमाने, ड्रोन प्लॅटफॉर्म आणि १५,००० हून अधिक सैनिक तैनात करण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, इराणने याविरोधात कडक इशारा दिला.** ■





प्रयागराज येथील कॅम्पमध्ये बुलेटप्रूफ जॅकेटची पाहणी करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

# उत्तर प्रदेशात संरक्षण कॉरिडॉरमध्ये होणार ३५ हजार कोटींची गुंतवणूक

## तोफगोळे, ड्रोन, बुलेटप्रूफ जॅकेटची होणार निर्मिती

**◆ प्रयागराज, ६ मे**

लखनौ, कानपूर, झाशी, आग्रा, अलीगढ आणि चित्रकूट येथे असलेल्या राज्यातील सहा संरक्षण औद्योगिक कॉरिडॉरमध्ये ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे गुंतवणुकीचे प्रस्ताव प्रत्यक्षात आकार घेत असल्याचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी सांगितले.

राज्य सरकारने एक मोठा भूसाठा (लँड बँक) देखील तयार केला आहे. संरक्षण आणि एरोस्पेस धोरणाच्या माध्यमातून, गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या गुंतवणूकदारांना प्रोत्साहन दिले जात आहे, असे येथील न्यू कँट येथे आयोजित तीन दिवसीय नॉर्थटेक सिम्पोझियमच्या समारोप समारंभात त्यांनी सांगितले. अलीगढ हे लहान शस्त्रे, संरक्षण उपकरणे आणि लष्करी पुरवठ्याचे केंद्र म्हणून उदयास आले आहे, तर पूर्वेचे मँचेस्टर म्हणून पारंपरिकरित्या ओळखले जाणारे कानपूर हे दारुगोळा, क्षेपणास्त्रे, संरक्षण वस्त्रे आणि संरक्षक साधनांचे केंद्र बनत आहे. लखनौने ब्रह्मोस क्षेपणास्त्रे आणि अवजड संरक्षण उत्पादनावर लक्ष केंद्रित केले आहे. चित्रकूट आणि आग्रा हे एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रातील अचूक अभियांत्रिकीसाठी विकसित केले जात आहेत.

सशस्त्र दलांची क्षमता वाढवण्यासाठी संरक्षण कॉरिडॉरमध्ये तोफगोळे, ड्रोन, बुलेटप्रूफ जॅकेट आणि प्रगत दळणवळण प्रणाली यांचे उत्पादन केले जात आहे. कॉरिडॉरसाठी आवश्यक असलेली परिसंस्था उत्तर प्रदेशात अस्तित्वात आहे. राज्यात ५६ टक्के कुशल मनुष्यबळ आहे. येथे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा एक मजबूत पाया आहे. यात हार्डवेअरपासून चामड्याच्या वस्तू आणि वस्त्रोद्योगापर्यंतच्या विविध क्षेत्रांमध्ये ९६ लाख युनिट्स आधीच कार्यरत आहेत. ड्रोनसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स विकसित करण्याकरिता सरकार इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूरसोबत काम करत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### सुरक्षा निश्चित झाल्याने गुंतवणुकीला चालना

**»» २०१७ मध्ये जेव्हा त्यांच्या सरकारने पदभार स्वीकारला, तेव्हा सुशासन सुनिश्चित करणे आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे हे प्राधान्य होते. राज्याला त्याच्या अस्मितेच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी, आम्हाला गुन्हे आणि गुन्हेगारांविरुद्ध शून्य-सहिष्णुता धोरण कठोरपणे लागू करावे लागले. सुरक्षेला प्राधान्य दिल्यामुळे प्रमुख गुंतवणूकदारांनी उत्तर प्रदेशात रस दाखवला आहे, असे प्रशासकीय सुधारणांचा संदर्भ देताना आदित्यनाथ म्हणाले.** ■

## नारायण साईचा जामीन अर्ज फेटाळला

**◆ सुरत, ६ मे**

सुरत येथे घडलेल्या अत्याचार प्रकरणात दोषी ठरलेल्या नारायण साईला गुजरात उच्च न्यायालयाकडून कोणताही दिलासा मिळालेला नाही. शिक्षेला स्थगिती द्यावी आणि जामीन मंजूर करावा, या मागणीसाठी त्याने न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने त्याच्या सर्व मागण्या फेटाळून लावल्या. ◂(वृत्तसंस्था)

# पेशावरमधील अमेरिकन दूतावास बंद

## सुरक्षेच्या कारणांमुळे घेतला निर्णय

**◆ इस्लामाबाद, ६ मे**

पाकिस्तानमध्ये सुरक्षेच्या पृष्ठभूमीवर अमेरिकेने महत्त्वाचा निर्णय घेत पेशावरमधील आपले वाणिज्य दूतावास टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली. अफगाण सीमेलगत असलेल्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात वाढत्या अस्थिरतेमुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

दूतावासाशी संबंधित सर्व कामकाज आता इस्लामाबादमधील अमेरिकेच्या मुख्य दूतावासाकडे सोपवण्यात येणार आहे. या भागात अतिरेकी हालचाली वाढल्यामुळे राजनैतिक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली होती. विशेषतः तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेचा प्रभाव वाढत असल्याने परिस्थिती अधिकच धोकादायक झाली. या पृष्ठभूमीवर अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने अधिकाऱ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन हा निर्णय घेतला. पेशावरमधील दूतावास बंद करण्यात येत असला तरी पाकिस्तानबरोबरचे व्यापक संबंध कायम राहतील, असे अधिकृत निवेदनात सांगण्यात आले. व्यापार, प्रादेशिक स्थैर्य आणि सामरिक हितसंबंध यांसाठी अमेरिका आपला सहभाग पुढेही ठेवणार असल्याचे नमूद करण्यात आले. इस्लामाबाद, कराची आणि लाहोर येथील उर्वरित राजनैतिक केंद्रांद्वारे कामकाज सुरू राहील. हा निर्णय केवळ सुरक्षेपुरता मर्यादित नसून खर्च नियंत्रणाशीही संबंधित आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘हॉन्टेड ३डी’चा टीझर प्रदर्शित





**मुंबई :** दिग्दर्शक विक्रम भट्ट यांचा चित्रपट ‘हॉन्टेड ३डी’चा टीजर जारी झाला आहे. २०११ मध्ये ‘हॉरर हॉन्टेड ३’ नंतर दुसरा भाग ‘हॉन्टेड ३डी : घोस्ट ऑफ द पास्ट’ येत असून चित्रपटामध्ये पुन्हा एकदा मिमोह चक्रवर्ती मुख्य भूमिकेत दिसेल. सोबत चेतना पांडे, प्रणीत भट्ट, हेमंत पांडे, श्रुती प्रकाश, गौरव वाजपेयी आदी स्टार्स दिसणार आहेत. आनंद पंडित आणि राकेश जुनेजा द्वारा निर्मित चित्रपटाची निर्मिती प्रोमोएज मीडिया प्रायव्हेट लिमिटेड द्वारा करण्यात आले आहे. चित्रपटात ३डी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हा चित्रपट १२ जून रोजी चित्रपटगृहात हिंदी, तमिळ, तेलुगु भाषेत प्रदर्शित होणार आहे. ■

### ईशा अंबानीचा ‘मेट गाला’ लूक व्हायरल

**मुंबई :** ईशा अंबानीने तिच्या मेट गाला २०२६ च्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिने गौरव गुप्ता याने डिझाईन केलेली एक खास साडी नेसली होती. यावर हाताने रंगवलेली ‘पिछवाई’ शैलीतील नक्षी आणि खास शैलीतील आकर्षक ‘केप’ आहे. तिने नेसलेली साडी ही रिलायन्स रिटेलने सुरू केलेल्या ब्रँड स्वदेशच्या कारागिरांनी शुद्ध सोन्याच्या धाग्यांनी विणली आहे. ही साडी ५० हून अधिक कारागिरांनी १२०० तासांहून अधिक वेळात तयार केली आहे. या साडीचा ब्लाऊज खऱ्या हिऱ्यांनी जडवला असून पाठीमागे निजामांच्या संग्रहातील एक ऐतिहासिक दागिना आहे. ब्लाऊजच्या पाठीमागे निजामांच्या दागिन्यांच्या संग्रहातील एक मौल्यवान ऐतिहासिक दागिना लावला आहे. हा सुंदर ब्लाऊज माझ्या आईच्या दागिन्यांनी सजवला असल्याचे ईशाने सांगितले. ■



### चित्रपटात होणार चौथ्या इडियटचा प्रवेश



**मुंबई :** २००९ मध्ये प्रदर्शित झालेला ‘३ इडियट्स’ हा चित्रपट जबरदस्त हिट झाला. आता या चित्रपटाचा सिक्वेल लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येत असून यात आणखी एका कलाकाराची एन्ट्री होणार आहे. १७ वर्षांनंतर आमिर खानच्या ‘३ इडियट्स’ या चित्रपटाच्या सिक्वेलची घोषणा करण्यात आली आहे. अभिनेता विकी कौशल या चित्रपटात चौथ्या इडियटची भूमिका साकारणार आहे. १० वर्षांच्या कालावधीनंतर या चित्रपटाला एक नवीन वळण मिळणार आहे. आमिर खानसोबत अभिनेता विकी कौशल स्क्रीन शेअर करणार आहेत. चित्रपटाच्या सिक्वेलबाबतीत आमिरने मोठी हिंट दिली होती. यामुळे हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे, हे निश्चित आहे. ■

# हिमंता बिस्व सरमा यांचा राजीनामा

## शपथविधी १२ मे रोजी होण्याची शक्यता



**◆ गुवाहाटी, ६ मे**

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी बुधवारी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसह राजीनामा दिला. यामुळे भाजपाच्या नेतृत्वाखालील नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

१२६ सदस्यसंख्या असलेल्या आसाम विधानसभेत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआचे १०२ उमेदवार निवडून आले आहेत. निवडणूक निकालांची ही अधिकृत घोषणा झाल्यानंतर आणि नवीन सरकारचा मार्ग मोकळा करण्यासाठी डॉ. हिमंता बिस्व सरमा यांनी आज लोक भवन येथे राज्यपाल लक्ष्मण आचार्य यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाचा तसेच मंत्रिमंडळाचा राजीनामा सुपूर्द केला, असे मुख्यमंत्री कार्यालयाने ‘एक्स’वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

राज्यपालांनी राजीनामा स्वीकारला असून नवीन सरकार सत्तेत येईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळणे सुरू ठेवावे, अशी विनंती त्यांनी सरमा यांना केली आहे. शपथविधी ११ मे नंतर होण्याची शक्यता आहे, असे नंतर लोक भवनबाहेर पत्रकारांशी बोलताना सरमा यांनी सांगितले.

आसाममध्ये ऐतिहासिक विजय मिळाला असून शपथविधीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण दिले आहे. मात्र, ते ११ मे पर्यंत व्यस्त असून त्या तारखेनंतर राज्यात येतील, असे पंतप्रधान कार्यालयाने सांगितले असल्याची महिती सरमा यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

# बलुचिस्तानातील गुंतवणुकीतून अमेरिकेचा काढता पाय

### ट्रम्प-शाहबाज यांच्या योजनांना खीळ

### हिंसाचाराचे कारण देत अनेक कंपन्यांची माघार



**◆ इस्लामाबाद, ६ मे**

बलुचिस्तानमधील वाढत्या हिंसाचारामुळे अमेरिकेतील गुंतवणूकदारांनी माघार घेत तेथे स्थापन करण्यात येणाऱ्या व्यवसायातून माघार घेतली आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलएच्या हल्ल्यांचा खाणकाम प्रकल्पांवर आणि परदेशी गुंतवणुकीवर परिणाम झाला आहे. बिघडत चाललेल्या सुरक्षा परिस्थितीमुळे अमेरिकन कंपन्यांनी गुंतवणूक आणि व्यवसाय गुंडाळण्यास सुरुवात केल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या योजनेला खीळ बसली आहे.

बलुचिस्तानमधील वाढत्या हिंसाचारामुळे अमेरिकेच्या प्रमुख आर्थिक योजनांना मोठा धक्का बसला आहे. गेल्या वर्षी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी ट्रम्प यांची भेट घेतली होती. यानंतर ट्रम्प यांनी बलुचिस्तानात खाण उद्योग आणि कच्च्या तेलाचे साठे उभारण्यासाठी गुंतवणूक करण्याचे जाहीर केले होते. मात्र बलुचिस्तानात सध्या हिंसाचाराची परिस्थिती कायम आहे. बीएलएच्या सातत्याने होणाऱ्या हल्ल्यामुळे आधी चीन आणि आता अमेरिकेने गुंतवणूक आणि व्यवसाय उभारण्याच्या योजनेतून माघार घेतली आहे. खनिज संपन्न प्रदेशात गुंतवणुकीची आशा होती, परंतु वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली असल्याचे तेथे अमेरिकन गुंतवणूकदार व्यवसाय सुरू करण्यास अनुत्सुक असल्याचे वॉशिंग्टन पोस्टच्या वृत्तात म्हटले आहे.

दरम्यान चीनशी स्पर्धा करण्यासाठी ट्रम्प प्रशासनाने पाकिस्तानच्या खाणकाम क्षेत्रात गुंतवणूक करण्याचा धोका पत्करला होता. सप्टेंबर २०२५ मध्ये, दोन्ही देशांमधील संबंध दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला, ज्यामुळे १.३ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला होता. परंतु बीएलएच्या हल्ल्यांमुळे या योजनांना खीळ बसली. जानेवारीपासून सुरू असलेल्या सततच्या हल्ल्यांमुळे, अमेरिका आता येथील गुंतवणुकीतून माघार घेत आहे. ◂(वृत्तसंस्था)



### खनिज मार्ग धोक्याचे केंद्र

**»» बलुचिस्तान हे सोने आणि तांब्याच्या मोठ्या साठ्यांसाठी ओळखले जाते. रेको दीकसारख्या भागांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वारंवार हल्ले होत आहेत. हा मार्ग आता असुरक्षित झाला असून, त्याचा थेट परिणाम खाणकाम प्रकल्पांवर होत आहे. अमेरिका आणि पाकिस्तानच्या आर्थिक योजना या प्रदेशावर केंद्रित होत्या, परंतु सुरक्षा संकटामुळे त्या कमकुवत झाल्या आहेत.** ■

## रस्ता अपघातात चार ठार; सहा जखमी

**◆ छपरा, ६ मे**

बिहारच्या सारण जिल्ह्यात बुधवारी सकाळी झालेल्या एका अपघातात दोन महिलांसह चार जणांचा जागीच मृत्यू झाला आणि सहा जण जखमी झाले, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली.

ही घटना जिल्ह्यातील भगवान बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ब्रह्मपूर-रेवेलगंज रस्त्यावर घडली. सकाळी सुमारे ५.४५ वाजता, ब्रह्मपूरहून उत्तर प्रदेशच्या दिशेने जाणाऱ्या एका पिकअप वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ते उलटले. या वाहनात १२ जण होते. यानंतर रस्त्यावर पडलेल्या दोन पुरुष आणि दोन महिलांसह चार जणांना एका अज्ञात ट्रकने चिरडले, असे पोलिस अधिकारी म्हणाले. मृत व्यक्ती वेगवेगळ्या भागांतील होत्या आणि पोलिस त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे पोलिसांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# केवळ पुरुषांचे आवाज ऐकू न येणारी ‘स्त्री’

- ‘रिव्हर्स स्लोप हिअरिंग लॉस’ नावाच्या दुर्मिळ आजाराने ग्रस्त
- कमी वारंवारतेच्या आवाज ऐकण्याच्या क्षमतेवर झाला परिणाम

**◆ बीजिंग, ६ मे**

जगात श्रवणशक्ती कमी असणारे आणि अजिबातच श्रवणशक्ती नसणारे असे लोक असल्याचे सगळ्यांना माहिती आहेत. चीनमधील झियामेन शहरात मात्र एक महिला अशी आहे, तिला केवळ पुरुषांचेच आवाज ऐकू येत नाहीत. ती एका सकाळी उठली, तेव्हा तिला प्रियकराचा आवाज ऐकू येत नसल्याचे लक्षात आले.

फोर्ब्सच्या वृत्तानुसार, याचे कारण नात्यातील समस्या नसून ‘रिव्हर्स स्लोप हिअरिंग लॉस’ नावाची एक दुर्मिळ वैद्यकीय स्थिती होती. या स्थितीमुळे व्यक्तीची कमी-वारंवारतेचे आवाज ऐकण्याची क्षमता प्रभावित होते आणि



ध्वनी वर्णपटावर बहुतेक पुरुषांचे आवाज नेमके याच श्रेणीत येतात. याचा अर्थ त्या महिलेला उच्च पट्टीतले आवाज आणि बोलणे अजूनही व्यवस्थित ऐकू येत होते, परंतु खालच्या पट्टीतले आवाज ऐकू येणे बंद झाले होते. हे नाव ‘ऑडिओग्राम’वर दिसणाऱ्या आकारावरून आले आहे. ‘ऑडिओग्राम’ म्हणजे एक तक्ता जो डॉक्टर रुग्णाच्या वेगवेगळ्या स्वरांमधील श्रवणशक्तीचे मोजमाप करण्यासाठी वापरतात.

बहुतेक श्रवणहानीचा आलेख या तक्त्यावर खाली उतरणारा असतो. तो उच्च वारंवारतांच्या श्रवणहानीला दर्शवतो. या प्रकरणात, हा उतार उलट दिशेने असतो. ही समस्या केवळ पुरुषांच्या आवाजापुरती मर्यादित नाही. खोल आवाज असलेल्या महिलांचा आवाजही ऐकू न येण्याच्या श्रेणीत येऊ शकतो, तर उच्च पट्टीत बोलणारे पुरुष स्पष्टपणे ऐकू येऊ शकतात, असे फोर्ब्सने नमूद केले आहे. कमी-वारंवारतेचे ध्वनी मानवी बोलण्याच्या पलीकडेही विस्तारलेले आहेत. यात ट्युबाच्या मंद आवाजापासून ते दूरच्या गडगडाटापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश होतो, हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे. या आजाराला विशेषतः गुंतागुंतीचे बनवणारी गोष्ट म्हणजे हे सहजपणे लक्षात येत नाही. खोल आवाजांच्या हळूहळू नाहीसे होण्यापेक्षा, तीक्ष्ण आणि भेदक आवाज नाहीसे होणे लोकांच्या अधिक लवकर लक्षात येते, याचा अर्थ पीडितांना निदान न होता अनेक वर्षे जाऊ शकतात. ◂(वृत्तसंस्था)

### श्रवणयंत्रांमुळे मिळू शकतो आराम

**डॉक्टरांच्या मते, मेनिअर्स रोग, विषाणूजन्य संसर्ग, मूत्रपिंड निकामी होणे आणि मेंदूच्या सभोवतालच्या दाबामधील बदल यांसारख्या अनेक कारणांमुळे ही स्थिती उद्भवू शकते. हे नुकसान कायमस्वरूपी असते. तिथे श्रवणयंत्रांमुळे लक्षणीय आराम मिळू शकतो.** ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# शठे शाठ्यं समाचरेत्...

महाराष्ट्र दिनाच्या मंगलप्रसंगी संपूर्ण राज्य महोत्सवाच्या तयारीत असताना, पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे मानवतेला काळिमा फासणारी एक अतिशय संतापजनक घटना घडली. अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेला पाशवी अत्याचार आणि निर्घृण हत्या ही तिच्या कुटुंबाला हादरवणारी आणि समाजाला सुन्न करून टाकणारी घटना होती. या अमानवी घटनेनंतर फक्त पुणे जिल्हा नव्हे, तर अवघा महाराष्ट्र अद्याप संतापाने धुमसत आहे. या घटनेच्या पृष्ठभूमीवर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेला आणि काळाची गरज असलेला कायदेशीर बदलाचा निर्णय, हा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक मानला पाहिजे आणि त्यामुळेच त्याचे स्वागत केले पाहिजे.

१ मे रोजी नसरापूरमध्ये जे घडले, ते ऐकून अंगावर काटा येतो. साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून, तिची दगडाने ठेचून हत्या करणे आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठवणे, ही क्रूरतेची परिसीमा. भीमराव कांबळे या नराधम आरोपीचा गुन्हेगारी इतिहास पाहिला तर नुसता संताप येतो. त्याच्यावर यापूर्वीही विनयभंग आणि 'पोक्सो'सारखे गुन्हे दाखल होते. तरीही कायद्यातील पळवाटांचा आधार घेत तो समाजात मोकाट हिंडत होता. आपल्या व्यवस्थेची अत्यंत घातक अशी त्रुटी हीच, जिचा लाभ घेऊन असे नराधम पुन्हा पुन्हा गुन्हे करण्यासाठी पुढे येतात. समाज नासवतात. अशांसाठी रान मोकळे असावे का, या प्रश्नाचे उत्तरच कायद्यातील बदलांच्या स्वरूपात शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

नराधमांना पॅरोल नकोच, या अर्थाने कायद्यात बदल करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले आहेत. पॅरोल म्हणजे काय, तर, कायदेशीर परिभाषेत एखाद्या कैद्याला त्याच्या चांगल्या वर्तणुकीसाठी किंवा कौटुंबिक आपत्कालीन परिस्थितीसाठी निश्चित कालावधीसाठी कारागृहातून दिलेली तात्पुरती सुटका. कैद्याला पुन्हा मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी, या हेतूने ही सवलत दिली जाते. पण लैंगिक शोषण आणि हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपी जेव्हा पॅरोलवर बाहेर येतात, तेव्हा ते केवळ पीडित कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी धोकादायक असतात, हेही येथे समजून घेतले पाहिजे. गुन्हेगारांनी 'पॅरोल' किंवा 'फर्लो'चा गैरवापर करून पुन्हा समाजात भीषण गुन्हे केल्याची अनेक उदाहरणे आहेत. मुंबईचे शक्ती मिल बलात्कार प्रकरण त्यातलेच. या प्रकरणातील आरोपी आधीच गुन्हेगारी प्रवृत्तीचे होते आणि त्यांनी जामिनावर असताना पुन्हा सामूहिक बलात्कार केला. मुंबईतीलच आणखी एक प्रकरण जे 'पॅरोल'च्या नियमांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आहे. एका तरुणीच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला सज्जाद मोगल २०१६ मध्ये पॅरोलवर बाहेर पडला आणि तेव्हापासून फरार झाला. बराच काळ तो सापडला नाही. अशा गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना मानवतावादी दृष्टीने केलेल्या तरतुदींचा वापर करून काही काळ बाहेर काढणे देखील घातक ठरू शकते, हे यापूर्वी वारंवार सिद्ध झालेले आहे. बलात्कार आणि हत्येच्या आरोपाखाली शिक्षा भोगत असलेल्या हरयाणातील गुरमित राम रहीमला वारंवार पॅरोल मिळत असल्यामुळे न्यायालय आणि सामाजिक संस्थांनी अनेकदा ताशेरे ओढले आहेत. तज्ज्ञांच्या मते, अशा पॅरोलमुळे पीडितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो'च्या आकडेवारीनुसार आणि विविध कायदेतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार, भारतात बलात्कार आणि खुनासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये शिक्षेची पुनरावृत्ती होण्याचे प्रमाण ५ ते ७ टक्के आहे. गुन्ह्याच्या पुनरावृत्तीला मर्यादा नसते. चिमुकल्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत ही भीती आणखी जास्त असते, कारण ती एक मानसिक विकृती मानली जाते. अनेकदा कारागृहातील गर्दी कमी करण्यासाठी किंवा गुन्हेगाराच्या चांगल्या वर्तणुकीचा आधार घेऊन पॅरोल दिला जातो. पण, वास्तव असे की, बहुतेकांची चांगली वर्तणूक ही तुरुंगापुरतीच मर्यादित असते. बाहेर आल्यावर त्यांची मूळ वृत्ती बदलत नाही, असे अनेक सर्वेक्षणांतून समोर आले आहे.

वारंवार गुन्हे करूनही पॅरोलवर सुटणाऱ्या गुन्हेगारांमुळे समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते, असे मत कायदेतज्ज्ञांनी वारंवार मांडले आहे. नसरापुरातील आरोपीच्या बाबतीतही हेच घडले. ज्याच्यावर आधीच गंभीर गुन्हे होते, तो समाजात उजळ माथ्याने वावरत होता. कारण कायद्याने त्याला तशी संधी दिली होती. अशी संधी आता कायद्यानेच हिरावून घेण्याची वेळ आली आहे, हे समजून घेतले पाहिजे. पॅरोलवर असा विचार करण्याचा निर्णय जाहीर होताच आता मानवाधिकाराच्या गप्पा करणाऱ्यांचे कान टवकारतील. तुरुंगात असलेल्या कैद्यांशी मानवीय दृष्टिकोनातून व्यवहार झाला पाहिजे, असा त्यांचा युक्तिवाद असतो. तो अजिबात चुकीचा नाही. परंतु, ज्या गुन्हेगारांच्या वर्तनात मानवतेचा लवशेष नाही, त्यांच्यासाठी कसला आला मानवाधिकार? भुरट्या चोराला आणि बलात्कारी किंवा खून करणाऱ्या गुन्हेगाराला एकाच तराजूत तोलणे, हा कायद्याचा पराभव नव्हे? चोराची आणि बलात्काऱ्याची शिक्षा वेगळी असेल, तर मग त्यांच्या पॅरोलचे नियमही वेगळे असायला हवेत. चोरी करणे हे सामाजिक परिस्थितीमुळे घडलेले कृत्य असू शकते. ती व्यक्ती सुधारण्याची शक्यताही असते. परंतु एखाद्या चिमुकलीवर अमानुष अत्याचार करून तिची हत्या करणे, ही केवळ आणि केवळ विकृतीच असते. अशा विकृत मानसिकतेच्या लोकांशी आपण कोणत्या न्यायाने मानवी व्यवहार करणार आहोत, हे ठरवले पाहिजे. ज्याने एका निरागस बालिकेचा जगण्याचा मूलभूत अधिकारच हिरावून घेतला, त्याला मानवाधिकाराचे कवच बहाल करणे हा तिच्या कुटुंबावर झालेला दुसरा अत्याचार ठरेल. समाजाला काय वाटते ते तर बोलायलाच नको.

कारागृहात गुन्हेगार सुधारल्याची उदाहरणे आहेत काय, असा प्रश्न केला तर त्याचे उत्तर होकारार्थी येईल. पण तशी उदाहरणे प्रामुख्याने आर्थिक गुन्हे किंवा रागाच्या भरात झालेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत आहेत. तिहार किंवा येरवडासारख्या जेलमध्ये राबवल्या जाणाऱ्या सुधारणावादी कार्यक्रमांमुळे काही कैदी बाहेर पडल्यावर सामान्य आयुष्य जगत आहेत हेही खरे आहे. एखाद्या चोराने चोरी सोडली किंवा रागाच्या भरात मारामारी करणाऱ्याने हिंसा सोडली, अशी उदाहरणे बरीच आढळतील. परंतु, चिमुकल्यांवर बलात्कार करणारे किंवा 'सायकोपॅथिक' खुनी यांचे सुधारण्याचे प्रमाण जागतिक स्तरावर पाहिले तरी नगण्यच. वैद्यकीय शास्त्रानुसार, अशा गुन्हेगारांना समाजात पुनर्स्थापित करणे कठीण असते, कारण त्यांची गुन्हेगारी ही त्यांच्या मानसिक रचनेचा भाग झालेली असते.

भारतीय संविधानाचे कलम २१ प्रत्येकाला जगण्याचा अधिकार देते. मात्र, नसरापूरसारख्या घटनेत 'दुर्मिळातील दुर्मिळ' या तत्त्वाखाली अशा नराधमांना फाशीची शिक्षा होणेच अपेक्षित असते. ज्याने दुसऱ्याच्या जगण्याचे स्वातंत्र्य आणि मानवाधिकार पायदळी तुडवले, त्याला मानवाधिकाराचे कवच मिळताच कामा नये. मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी दिलेले निर्देश अगदी स्पष्ट आहेत. लैंगिक शोषणातील गुन्हेगारांना भविष्यात कधीही मोकळा श्वास घेता येऊ नये यासाठी विधि व न्याय विभागाने तातडीने कायद्यात दुरुस्ती करावी आणि अशा नराधमांना कोणत्याही परिस्थितीत पॅरोल मिळू नये अशी व्यवस्था करावी, असे त्यांनी सांगितले आहे. हा निर्णय क्रांतिकारकच म्हटला पाहिजे. कारण, सामान्य नागरिक आणि लहान मुला-मुलींच्या सुरक्षेचा अधिकार एखाद्या गुन्हेगाराच्या पॅरोल मिळवण्याच्या अधिकारापेक्षा किती तरी मोठा आहे. हा प्रस्तावित बदल शिक्षेची तीव्रता वाढवणारा नसला तरी अशा गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा धाक निर्माण करणारा आहे. नसरापूरची घटना ही समाजासाठी एक सावधगिरीची घंटा आहे. कायदेशीर सुधारणा हा त्यावरचा पहिला आणि महत्त्वाचा उपाय आहे. आरोपी भीमराव कांबळे याला कठोर शिक्षा होणे, हे सरकारचे आणि पोलिस प्रशासनाचे कर्तव्य आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला निर्णय जर कायद्यात परिवर्तित झाला, तर तो महाराष्ट्राच्या न्यायिक इतिहासातील एक मैलाचा दगड ठरेल. भारतीय नीतिशास्त्रातले एक अत्यंत प्रभावी सूत्र आहे- 'शठे शाठ्यं समाचरेत्'. अर्थात, जो दुष्ट आहे, त्याच्याशी दुष्टतेनेच वागले पाहिजे.


## प्रासंगिक

### डॉ. अरुंधती वैद्य

# रवींद्रनाथ टागोर आणि जाहिरात...

शीर्षक वाचून नवल वाटले ना! रवींद्रनाथ टागोर यांचे नाव घेतले की प्रथम आठवतो तो नोबल पुरस्कार! नंतर त्यांची भाषणे, शिक्षणतज्ज्ञ, तत्त्वज्ञ, चित्रकार, कवी, संगीतकार अशा अनेक क्षेत्रांतला त्यांचा विक्रम आपल्या सगळ्यांना माहीत आहे. पण जाहिरातीतले रवींद्रनाथ... अविश्वासनीय वाटते ना! पण हे अगदी खरे आहे. विसाव्या शतकाची पहिली तीन दशके रवींद्रनाथांच्या जाहिरातींनी गाजवली होती. देखणे, उंच, रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे, समाजात मान आणि लोकप्रियता लाभलेले रवींद्रनाथ हे त्याकाळी भारतीय जाहिरातविश्वातले एक हुकमी एक्का होते. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी त्यांच्या फोटोचा जाहिरातदारांनी मुक्तपणे वापर केला. त्यांनी लिहिलेल्या अनेक जाहिरातींचा मजकूर फार आकर्षक, लालित्यपूर्ण, नेमक्या शब्दांत उत्पादनाबद्दल ग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण करणारा होता. स्वदेशी चळवळीला प्रोत्साहन म्हणून अनेक स्वदेशी कंपन्यांना त्यांनी जाहिरातीतून मनापासून मदत केली. परदेशी राजवटीत स्वदेशी कारखाने स्थापन व्हावेत, त्यांची भरभराट व्हावी ही त्यांची मनापासून इच्छा होती. शंभरहून अधिक भारतीय उत्पादनांच्या जाहिरातीसाठी त्यांनी अभिप्राय किंवा संदेश लिहून दिले होते. गंमत म्हणजे स्नो, डोक्याला लावायचे क्रीम आणि तेल यांची सुद्धा जाहिरात रवींद्रनाथ यांनी केली होती.

कुंतलिन या तेलाची जाहिरात, ''आम्ही ठाकूर कुटुंब गेले दोन महिने कुंतलिन हेयर ऑईल वापरत आहोत. माझ्या एका नातेवाईकाचे केस फार गळत होते पण आता कुंतलिन तेल वापरायला सुरुवात केल्यापासून त्याच्या डोक्यावर केस उगवायला लागले आहेत. हे तेल सुगंधी आहे आणि हा सुगंध बराच काळ टिकतो'' या शब्दांमध्ये केली होती.



७ मे हा रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिवस. त्यानिमित्त...

कलकत्त्यातल्या जलयोग मिष्ठान्न भांडारच्या मिठाया त्यांच्या आवडत्या होत्या. या दुकानाच्या जाहिरातीसाठी त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात मजकूर लिहून दिला होता आणि तो मजकूर दुकानदाराने फ्रेम करून दुकानात लावला होता. ''जलयोग मिष्ठान्न भांडारच्या मिठाया मी अनेक वर्षे चाखतो आहे. दरवेळी इथली मिठाई खाल्ल्यावर मी तृप्त होतो. या दुकानातल्या मिठाया अप्रतिम आहेतच, पण इथले दही सुद्धा फार चविष्ट आहे, म्हणून मला इथे यायला आवडते.''

त्याकाळी रेडियम लेबॉरटीने काही सौंदर्य प्रसाधने बाजारात आणली होती. या कंपनीच्या संचालकांनी रवींद्रनाथांना गळ घातली आणि रवींद्रनाथांना त्यांना नकार देणे शक्य झाले नाही म्हणून त्यांनी त्यांना जाहिरात लिहून दिली. ''स्नो आणि क्रीम आणि ओ-द- कोलॉईन वापरण्याची सवय असणाऱ्यांना रेडियम लेबॉरटीची उत्पादने अत्यंत आवडतील. या स्वदेशी उपक्रमास पाठिंबा देणे हे मी माझे कर्तव्य समजतो.'' त्यांच्या सगळ्या जाहिरातींमध्ये त्यांचे देशप्रेम दिसून येते. तरी पण १९३७ साली बोर्नव्हिटासारख्या परदेशी कंपनीची जाहिरात रवींद्रनाथांनी केली होती. शांतिनिकेतनला नेहमीच आर्थिक चणचण होती. त्यासाठी त्यांनी ही जाहिरात केली असावी. या जाहिरातीत त्यांचा फोटो आणि खाली इंग्रजीत त्यांची सही, सहीखाली विख्यात कवी, नाटककार रवींद्रनाथ ठाकूर असे छापले होते. ही जाहिरात तेव्हाच्या आनंद बाजार पत्रिका आणि द स्टेट्समन या प्रसिद्ध वर्तमानपत्रात प्रकाशित झाली होती.

विशेष म्हणजे जाहिरातींसाठी त्यांनी इंग्रजी शब्दांना बंगाली प्रतिशब्द तयार केले होते. पेनसाठी झरनी किंवा झरनाकलम हे शब्द तयार केले होते. पुढे झरनी हा शब्द बंगालीत लोकप्रिय झाला. शाईसाठी त्यांनी आजन्म काली किंवा काजल काली अशी दोन गमतीदार नावे सुचवली होती.

दालमिया उद्योगाला प्रोत्साहन म्हणून अनेक जाहिराती त्यांनी लिहून दिल्या होत्या आणि फोटोदेखील दिले होते. स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन म्हणून जाहिराती लिहून देणारे रवींद्रनाथांचे पुढे अनेक व्याप वाढले. त्यांच्या व्यग्र आयुष्यात जाहिराती लिहून देणे त्यांना त्रासदायक वाटू लागले.

आपली ही व्यथा त्यांनी आपल्या विजयलाल चटोपाध्याय या मित्राजवळ पत्रातून व्यक्त केली होती- ''अभिप्राय लिहिणे, जाहिराती लिहिणे, पुस्तकांच्या प्रस्तावना लिहिणे हे सारे मला थकवणारे आहे... पण मला हे काम करायलाच हवे. लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. मी जर अभिप्राय लिहिले नाही तर या स्वदेशी उद्योगांना कोण पाठिंबा देईल?''

आजच्या केवळ पैशांसाठी जाहिराती करणाऱ्या युगात देशप्रेमासाठी थकवा येईपर्यंत जाहिरात लिहून देणाऱ्या रवींद्रनाथांचे त्यांच्या जन्मदिनी स्मरण करणे, या लेखाच्या निमित्ताने त्यांना पुन्हा समजून घेणे औचित्यपूर्ण ठरावे!

९४२०३९७५५९

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# फसव्या कॉल्सचा सापळा!

देशात सध्या आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यवहार सोपे झाले, पण त्याचबरोबर गुन्हेगारांनाही नवे मार्ग सापडले. कर्जमाफी, पॉलिसी मॅच्युअर, इन्व्हेस्टमेंट परतावा अशा आमिषांनी सामान्य माणसांना जाळ्यात ओढले जात आहे. अलिकडे तर लोकांच्या मोबाईलवर येणारे कॉल, मेसेज किंवा सोशल मीडियावरील जाहिराती यांच्यामार्फत फसवणूक करण्याचे प्रकार राजरोस सुरू आहेत. याबाबत केंद्रीय बँकेनेही वारंवार इशारा दिला असतानाही अनेक जण अजूनही या जाळ्यात अडकत आहेत. फसवणुकीचे प्रकार आणि फसवणूक करणारेही दिवसेंदिवस अधिक चतुर होत चालले आहेत. तुमच्या खात्यात चुकून पैसे जमा झाले आहेत असा खोटा मेसेज दाखवून लोकांकडून पैसे परत करून घेण्याचा प्रकार, पॉलिसी बंद होणार आहे म्हणून घाईघाईने हप्ते भरायला लावणे किंवा ऑनलाईन ऑर्डर अडकली आहे म्हणून अतिरिक्त रक्कम भरण्यास भाग पाडणे हे सगळे प्रकार केवळ लोकांच्या विश्वासावर चालतात. एका क्षणाचा निष्काळजीपणा आयुष्यभराची बचत गमावू शकतो, ही वस्तुस्थिती आता सर्वांनी समजून घ्यायला हवी.

विशेषतः कर्जमाफी या नावाखाली होणारी फसवणूक अधिक धोकादायक ठरत आहे. अनेक शेतकरी, लघुउद्योजक किंवा कर्जबाजारी नागरिकांना फोन करून तुमचे कर्ज माफ झाले आहे, फक्त प्रोसेसिंग फी भरा असे सांगितले जाते. काही वेळा बनावट कागदपत्रे, सरकारी शिक्के आणि बनावट वेबसाईट्स दाखवून विश्वास निर्माण केला जातो. प्रत्यक्षात कोणतीही सरकारी कर्जमाफी योजना ही अधिकृत घोषणांद्वारे आणि बँकांच्या माध्यमातूनच राबवली जाते, वैयक्तिक फोन किंवा मेसेजद्वारे नाही. त्यामुळे अशा कॉल्सवर विश्वास ठेवणे म्हणजे स्वतःहून फसवणुकीला आमंत्रण देण्यासारखे आहे. या पृष्ठभूमीवर नागरिकांनी काही मूलभूत पथ्ये पाळणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वप्रथम, कोणत्याही अनोळखी कॉल किंवा मेसेजवर विश्वास ठेवू नये. बँक, विमा कंपनी किंवा सरकारी संस्था कधीही फोनवरून ओटीपी, पासवर्ड किंवा खातेविषयक माहिती मागत नाहीत, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कोणतीही आर्थिक व्यवहाराची लिंक क्लिक करण्याआधी तिची खातरजमा करावी. जलद नफा किंवा मोठा फायदा अशा आमिषांना बळी पडणे टाळावे. व्यवहार करताना अधिकृत ॲप्स आणि सुरक्षित वेबसाईट्सचाच वापर करावा. ऑनलाईन खरेदी करताना देखील सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. अज्ञात वेबसाईट्सवरून खरेदी करणे टाळावे, तसेच 'ॲडव्हान्स पेमेंट' मागणाऱ्या संशयास्पद विक्रेत्यांपासून दूर राहावे. कुरिअर अडकल्याच्या नावाखाली पैसे मागितले गेले, तर प्रथम संबंधित अधिकृत कंपनीशी संपर्क साधून खात्री करावी. प्रत्येक व्यवहारानंतर बँकेचे एसएमएस किंवा ॲप नोटिफिकेशन नीट तपासणे आणि काही संशयास्पद दिसल्यास तत्काळ बँकेशी संपर्क साधणे ही सवय लावावी. रिझर्व्ह बँकेनेही नागरिकांसाठी काही स्पष्ट आणि कडक सूचना दिलेल्या आहेत. कोणत्याही प्रकारच्या कर्जमाफी, लॉटरी, इनाम किंवा गुंतवणूक दुप्पट अशा ऑफर्सवर विश्वास ठेवू नये, असे वारंवार सांगण्यात आले आहे. बँक कधीही ग्राहकांकडून ओटीपी, सीव्हीसी किंवा इंटरनेट बँकिंग पासवर्ड मागत नाही, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. याशिवाय, संशयास्पद कॉल्स किंवा व्यवहार तत्काळ अधिकृत हेल्पलाईनवर कळवणे, तसेच सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार नोंदवणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेने नो युअर कस्टमर (केवायसी) प्रक्रियेच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचाही इशारा दिला आहे. यासोबतच, डिजिटल व्यवहार करताना दोन-स्तरीय सुरक्षा वापरणे, मोबाईलमध्ये अनोळखी ॲप्स डाऊनलोड न करणे आणि सार्वजनिक वाय-फायवर आर्थिक व्यवहार टाळणे या बाबींचाही विशेष उल्लेख करण्यात आला आहे. फसवणूक झाल्यास घाबरून न जाता तत्काळ बँक खाते ब्लॉक करणे, कार्ड बंद करणे आणि अधिकृत तक्रार नोंदवणे हे नुकसान कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरते. फक्त नागरिकांनीच नव्हे, तर शासनानेही या समस्येकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके अधिक सक्षम करणे, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुलभ करणे आणि जलद कारवाई करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागात आणि लहान शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केल्यास लोकांमध्ये जागरूकता वाढेल. याशिवाय, फसवणूक करणाऱ्या कॉल सेंटर्सवर कठोर कारवाई करून त्यांची साखळी तोडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शेवटी एकच लक्षात ठेवले पाहिजे की, मोबाईलवरील प्रत्येक कॉल हा संधी नसतो, तो कधी कधी सापळाही असू शकतो. विचारपूर्वक घेतलेला निर्णयच तुमची आयुष्यभराची कमाई सुरक्षित ठेवू शकतो.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# विजय यांच्यासमोरचे आव्हान

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीत सर्वांत अनपेक्षित आणि धक्कादायक निकाल तामिळनाडूचा लागला. राज्यातील प्रस्थापित प्रादेशिक पक्षांना मागे टाकत लोकप्रिय चित्रपट अभिनेते जोसेफ विजय चंद्रशेखर यांच्या तमिळगा वैत्री कळघम (टीव्हीके) या पक्षाने सत्ता मिळविली. कोणत्याच एक्झिट पोलमधून तामिळनाडूत विजय यांच्या पक्षाला बहुमत मिळणार असल्याचे संकेत मिळाले नव्हते. दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या टीव्हीके पक्षाला बहुमतापासून १० जागा कमी मिळाल्या असल्या, तरी त्या पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे सरकार त्या पक्षाचेच बनणार हे नक्की आहे. विजय यांनी पहिल्याच झटक्यात विजयाची शिटी मारली; शिटी हे त्यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. विजय यांच्या शिटीमुळे द्रमुकचा राज्यातील सत्तेचा सूर्य मावळला. 'उगवता सूर्य' हे द्रमुकचे निवडणूक चिन्ह आहे.

टीव्हीकेच्या या एकहाती यशाचे शिल्पकार विजयच आहेत, यात शंका नाही. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी विजय यांच्या पक्षाला अन्य काही पक्षाचा पाठिंबा घ्यावा लागणार आहे. प्रचारसभातून विजय यांनी द्रमुक आणि भाजपावर जोरदार हल्ला चढवला होता; मात्र काँग्रेस आणि अण्णाद्रमुकवर त्यांनी फारशी टीका केली नव्हती. सरकार स्थापन करण्यासाठी विजय यांच्या पक्षाला काँग्रेसने पाठिंबा देऊ केला आहे.

तामिळनाडूत १९६७ पासून राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव संपला आणि द्रमुक आणि अण्णाद्रमुकचे युग सुरू झाले. त्यानंतर आजपर्यंत त्या राज्यात आलटून-पालटून द्रमुकचे वा अण्णाद्रमुकचे सरकार येत होते. काँग्रेस आणि नंतर भाजपालाही त्या राज्यात कधी द्रमुक आणि कधी अण्णाद्रमुकचे बोट पकडून आपले राजकारण करावे लागले, हा इतिहास आहे. राज्यातील जनतेने यावेळी दोनही प्रादेशिक पक्षांना झिडकारत तिसऱ्या पण नव्याकोऱ्या पर्यायाला आपली पसंती दिली आहे.

विजयाच्या लाटेत मावळते मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचाही पराभव झाला. मुख्यमंत्रिपदावर असताना पराभव पत्करावा लागणारे स्टॅलिन हे तिसरे मुख्यमंत्री आहेत. याआधी जयललिता आणि अण्णादुराई या दोन मुख्यमंत्र्यांचा पदावर असताना पराभव झाला होता. यावेळच्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीत तीन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा पराभव झाला आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन्, तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अशा तीन मुख्यमंत्र्यांचा पराभव झाला. फक्त भाजपाशासित राज्यांचे दोन मुख्यमंत्री या निवडणुकीत विजयी झाले. आसामचे हिमंता बिस्व सरमा आणि पुद्दुचेरीचे एन. रंगासामी हे ते भाग्यवान मुख्यमंत्री आहेत. भाजपा आपल्या ताब्यातील आसाम आणि पुद्दुचेरी या दोन राज्यांतील सत्ता कायम ठेवत पश्चिम बंगाल या तिसऱ्या राज्यातील सत्ता हिसकावून घेण्यात यशस्वी ठरली आहे.



तामिळनाडूच्या जनतेला चित्रपट क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्यांचे जबरदस्त वेड आहे. चित्रपट क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्यांनी काढलेल्या राजकीय पक्षांना राज्यातील जनतेचा भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आणि अभिनेत्री यांनी राज्यातील जनतेच्या मनावर अनेक वर्षे राज्य केले आहे. द्रमुकचे संस्थापक असलेले सी. एन. अण्णादुराईही तामिळ चित्रपटातील लोकप्रिय अभिनेते होते. राज्याचे मुख्यमंत्रिपद सर्वाधिक काळ भूषवलेले करुणानिधीही तामिळी चित्रपटातील लोकप्रिय नायक होते. त्यांच्या प्रतिस्पर्धी अण्णाद्रमुकचे एम. जी. रामचंद्रन नायक होते तर जयललिता तामिळ चित्रपटातील लोकप्रिय नायिका होत्या. या चौघांनीही तामिळनाडूचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. त्या मालिकेत आता विजय यांचा समावेश झाला आहे. तामिळनाडूच्या राजकारणातील बहुतांश नेते हे चित्रपट उद्योगाशी संबंधित होते. १९८० च्या दशकात स्टॅलिन यांनी तामिळी चित्रपटातून काम केले. १९९० च्या दशकात अनेक तामिळी मालिकातूनही त्यांनी अभिनय केला. द्राविडी विचारधारा आणि तामिळी राष्ट्रवाद यांचा संगम साधत विजय यांनी हा विजय मिळविला आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये विजय यांनी आपल्या नवीन राजकीय पक्षाची स्थापना केली. पण त्या आधीपासूनच विजय मक्कल इयक्कम या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राज्यात सक्रिय होते. पक्ष स्थापन केल्यानंतर दोन वर्षांत सत्ता मिळवत विजय यांच्या पक्षाने आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांच्या तेलगू देसम यांच्या पक्षाशी बरोबरी केली आहे. तेलगू देसमची स्थापना झाल्यानंतर दोन वर्षांतच रामाराव यांनी राज्यातील सत्ता हस्तगत केली होती.

राज्यात चित्रपट अभिनेत्यांनी राजकीय पक्षाची स्थापना करण्याची परंपरा राहिली आहे. मात्र यातील सर्वच अभिनेत्यांना यश मिळाले असे नाही. यावेळी स्टॅलिन यांच्या सरकारविरुद्ध असलेल्या असंतोषाचा विजय यांनी चांगला उपयोग करून घेत राज्यातील जनतेला आपल्या बाजूला वळवत उल्लेखनीय यश मिळविले आहे. राज्यातील तरुण आणि महिलांनी विजय यांच्या पक्षाच्या विजयात मोठा वाटा उचलला.

विजय यांच्या प्रचारसभांना राज्यातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. प्रचारसभांना होत असलेली गर्दी मतपेटीत परिवर्तित करण्यात विजय यांना यश आले. तामिळ चित्रपटसृष्टीत दंतकथा बनलेले लोकप्रिय नेते रजनीकांत यांनीही राजकीय पक्ष स्थापन करत २०२१ ची विधानसभा निवडणूक लढवण्याचा प्रयत्न केला. पण आपल्या अफाट लोकप्रियतेचा राजकीय फायदा करून घेण्यात ते अपयशी ठरले. राज्यातील आणखी एक लोकप्रिय अभिनेते कमल हसन यांनीही राजकारणात शिरण्याचा प्रयत्न केला. २०१८ मध्ये मदुराई येथे त्यांनी मक्कल निधी मय्यम या राजकीय पक्षाची स्थापना केली, पण त्यांच्या पक्षालाही निवडणुकीत अपेक्षित यश मिळू शकले नाही. विजय यांनी रजनीकांत आणि कमल हसन सारख्या लोकप्रिय अभिनेत्यांनी राजकारणात येताना केलेल्या चुकांचा आढावा घेत त्या दुरुस्त केल्या. राजकीय पक्षाची स्थापना करण्याआधी त्यांनी एका संघटनेच्या माध्यमातून समाजकारण करत लोकांचा विश्वास जिंकला. त्यामुळेच त्यांना हे यश मिळाले आहे.

एका प्रचारसभेत लोकांच्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी होत ४० जणांचा मृत्यूही झाला होता. या प्रकरणी आयोजकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणाची सीबीआय चौकशीही सुरू आहे. तरीसुद्धा विजय यांच्या नेतृत्वावरचा राज्यातील जनतेचा विश्वास कमी झाला नाही. लाडकी बहीण योजनेप्रमाणे विजय यांच्या पक्षाने महिलांना दिलेली आश्वासने त्यांच्या विजयाचा आधार ठरला. राज्यातील महिलांना आठ ग्राम सोने तसेच महिलांना दरमहा दोन हजार रुपये देण्याचे आश्वासन विजय यांच्या पक्षाने दिले आहे. राज्यातील महिलांनी त्यांच्या पक्षाला जी भरभरून मते दिली, त्याचे मूळ या आश्वासनात दडले आहे.

१९९४ पासून विजय यांनी 'इलया थलपती' ही पदवी वापरायला सुरुवात केली होती. इलया थलपती म्हणजे युवा सेनापती. थलपतीनंतर विजय यांचा प्रवास 'थलायवन'च्या दिशेने सुरू झाला होता. थलायवन म्हणजे नेता. थलायवननंतर विजय यांनी 'मुथलवार' म्हणजे मुख्यमंत्रिपदावर झेप घेतली. अनिल कपूर त्यांच्या एका गाजलेल्या हिंदी चित्रपटात एक दिवसाचे मुख्यमंत्री झाले होते. एक दिवसाचा मुख्यमंत्री होण्यापेक्षा पाच वर्षे मुख्यमंत्री होणे आणि मुख्यमंत्रिपद सांभाळणे किती कठीण असते,

याचा अनुभव आता विजय यांना येईल. विजय यांना चित्रपटात अभिनय करण्याचा अनुभव असला तरी सरकार चालविण्याचा अनुभव नाही. विजय आणि त्यांचे सर्वच सहकाऱ्यांची पाटी ही प्रशासकीय अनुभवाबाबतीत कोरी आहे. सरकार चालविणे हे वाटते तितके सोपे नसते. नोकरशाही ही नाठाळ घोड्यासारखी असते, तिच्यावर मांड ठोकून बसणे हे अतिशय आव्हानात्मक असते, याचा अनुभव आता विजय यांना येईल.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### डेक्कनमधील रेल्वे आरक्षण केंद्र बंद होऊ नये

काल रेल्वे आरक्षण करण्यासाठी डेक्कन जिमखान्यावरील रेल्वे आरक्षण केंद्रात पोहोचलो. तर त्या ठिकाणी ''तांत्रिक कारणामुळे, पुढील सूचना मिळेपर्यंत आरक्षण केंद्र बंद राहील'' असा फलक लावून केंद्र बंद ठेवण्यात आले होते. मग तेथे अधिक चौकशी केली असता समजले की, काही दिवसांपासून हा फलक येथे लावण्यात आला असून आरक्षण केंद्र बंद आहे. एक शंका मनात आली की, तांत्रिक कारण दुरुस्त व्हायला एवढा कालावधी का लागत आहे? की हे आरक्षण केंद्र बंद करण्याचा विचार रेल्वे खाते करीत आहे! अत्यंत मध्यवर्ती ठिकाणी असणारे व सर्व भागांतील नागरिकांना सोईचे असलेले हे डेक्कन जिमखाना येथील रेल्वे आरक्षण केंद्र कोणत्याही परिस्थितीत बंद होता कामा नये. रेल्वे प्रवासी संघटना व लोकप्रतिनिधी यांनीही हे आरक्षण केंद्र बंद होऊ नये म्हणून पाठपुरावा करावा ही विनंती.

**मोहन रानडे**/कोथरूड, पुणे

### फुटपाथ मोकळे करावे

नागपूर शहरातील सर्व फुटपाथ लहान व्यापाऱ्यांनी ताब्यात घेतले आहेत. त्यांच्याकडे येणारे ग्राहक आपले वाहन तिथेच उभे करतात, त्यामुळे पादचाऱ्यांना कुठून चालायचे कळत नाही. परिणामी अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रशासनाने आयटी पार्क लक्ष्मी नगर, बजाज नगर या भागाकडे लक्ष द्यावे. जेणेकरून पादचारी फुटपाथ चालण्यासाठी वापरू शकतील असे वाटते.

**विजय देशपांडे**/नागपूर

### अमली पदार्थांचा विषारी विळखा

जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी नुकतेच काश्मीर विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वुशू अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करताना खेळाडूंनी नशामुक्त अभियानाचे दूत म्हणून काम करावे व तरुणांना अमली पदार्थांपासून दूर राहून खेळाचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करावे असे आवाहन केले. त्यावरून देशातील तरुण पिढी ड्रग्स व तत्सम अमली पदार्थांच्या किती आहारी गेली आहे याचे गांभीर्य समजून येते. केवळ खेळाडूंनी असे अभियान चालविण्याबरोबरच राज्य सरकार व प्रशासन यांनी देखील तरुण पिढीच्या गळ्याभोवतीचा हा अमली पदार्थांचा विषारी विळखा नष्ट करण्यासाठी; सर्व संबंधित शहरात जिथे हे ड्रग्स निर्मितीचे कारखाने समाजकंटक चालवीत आहेत ते शोधून काढून नष्ट करणे आवश्यक आहे. तसेच अमली पदार्थांची तस्करी जिथून चालते त्याचा शोध घेऊन तेथील संबंधितांच्या मुसक्या आवळणे आवश्यक झाले आहे. सुशिक्षित व उच्चशिक्षित बेकारीच्या नैराश्यातून अमली पदार्थांचे सेवन करण्याच्या घातक सवयीला तरुण मुले-मुली बळी पडतात. त्यामुळे अशा नैराश्यात जगत असलेल्या तरुणांना त्यांच्या पालकांकडून, समाजसुधारकांकडून व शासन, प्रशासनाकडून त्यांच्या समस्येचे निराकरण, योग्य मार्गदर्शन व प्रबोधन आवश्यक आहे. अन्यथा अनेक प्रकारच्या समाज विघातक समस्येबरोबरच हा अमली पदार्थ सेवनाचा तरुणांच्या गळ्याभोवतीचा विषारी विळखा; राष्ट्राचे आधारस्तंभ असलेले तरुण, कुटुंबे व समाज व पर्यायाने राष्ट्राला घातक ठरेल याचे गांभीर्य समजावे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/७०५८९७५३७६

### सामाजिक जाणीव बदलायला हवी!

आज आपण २१ व्या शतकात प्रगतीची शिखरे पादाक्रांत करत असताना, दुसरीकडे चिमुकल्यांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या ऐकून माणुसकी मेली आहे का? असा काळजाला चिरणारा प्रश्न उभा राहतो. बाल अत्याचार ही केवळ गुन्हेगारी नसून ती एक मानसिक विकृती आहे, जिचा नायनाट करण्यासाठी केवळ कायद्याची भीती पुरेशी नाही, तर समाजाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल घडवणे ही काळाची गरज आहे. शाळांमधून मुलांना गुड टच-बॅड टच (चांगला आणि वाईट स्पर्श) यातील फरक शिकवणे हे एक महत्त्वाची सकारात्मक पाऊल आहे. मात्र, ही जबाबदारी केवळ शाळांची नाही. पालकांनी आपल्या मुलांशी मैत्रीचे नाते जपले पाहिजे. मुलांना शरीराच्या खाजगी अवयवांची शास्त्रीय माहिती देऊन नाही म्हणण्याची ताकद त्यांच्यात निर्माण करायला हवी. अनेकदा भीतिपोटी मुले गप्प राहतात; अशा वेळी ''काहीही झाले तरी तुझे आई-बाबा तुझ्या पाठीशी आहेत'' हा विश्वास त्यांना सुरक्षित ठेवू शकतो. दुसरीकडे, तंत्रज्ञानाच्या युगात मुलांच्या इंटरनेट वापराकडे डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. सायबर जगातील धोके ओळखून पालकांनी मुलांशी संवाद वाढवला पाहिजे. लैंगिक शिक्षणाकडे एक गरज म्हणून पाहिले गेले, तर मुलांच्या मनात निर्माण होणारे चुकीचे कुतूहल शमवता येईल आणि त्यांना स्वतःचे संरक्षण करण्यास सक्षम करता येईल. मुले हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांचे बालपण ओरबाडणाऱ्या विकृतीला आळा घालण्यासाठी घर, शाळा आणि समाज या तिन्ही स्तरांवर एकजूट व्हावे लागेल.

**वीरेंद्र सोनवणे**/८८८८२४४८८३

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्ह्यात ४० हजार शेतकऱ्यांचे जलतारा योजनेचे उद्दिष्ट

## ३१ मे पर्यंत उद्दिष्टपूर्ती करणार : जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

पाणी संवर्धनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यात जलतारा शेतखड्डा प्रात्यक्षिक हा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरवणे व भूजल पातळी वाढवणे हा आहे. दरम्यान, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी 'जलतारा' प्रभावी ठरणार असल्याचा आत्मविश्वास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि.६) व्यक्त केला. दरम्यान, यासाठी जिल्ह्यात ४० हजार शेतकऱ्यांचे उद्दिष्ट असून, यातील ३ हजारापर्यंत उद्दिष्टपूर्ती झाली आहे. दरम्यान, मे महिनाखेर या योजनेच्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यात येणार असल्याचेही भोसले यांनी सांगितले.

चालू वर्षात एल-निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील शेतीवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पावसाचे उशिरा आगमन, पावसातील खंड, तसेच एकूण पर्जन्यमानात घट यामुळे खरीप हंगामातील पेरणी उशिरा होण्याची किंवा पुन्हा पेरणी (पुनर्लागवड) करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात पाणी संवर्धनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोलापूर जिल्ह्यात जलतारा शेतखड्डा प्रात्यक्षिक हा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच चिबड युक्त जमिनीमध्ये जलताराचे काम केल्यास पाण्याचा निचरा होऊन जमिन चिबडयुक्त होण्याचे प्रमाण कमी होऊन पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्याकरीता जलतारा हा अत्यंत महत्वपुर्ण व परिणामकारक उपाय आहे. शेतकऱ्यांनी संबंधित सहाय्यक कृषि अधिकारी, उपकृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच ग्रामपंचायत स्तरावर अर्ज पेटी उपलब्ध नसल्यास संबंधित तालुका कृषि अधिकारी किंवा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना कळवावे असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

### काय आहे जलतारा योजना?

पावसाळ्यात शेतातून वाहून जाणारे पाणी योग्य ठिकाणी अडवण्यासाठी शेतात साधारण ५५ फूट रुंद व ६ फूट खोल शोषखड्डे तयार करून त्यामध्ये दगड, खडी व वाळू भरून नैसर्गिक फिल्टर तयार केला जातो. त्यामुळे पाणी जमिनीत मुरून भूजल पुनर्भरणास मोठी मदत होते. तसेच चिबडयुक्त जमिनीत पाण्याचा निचरा सुधारतो. परिणामी विहिरी, बोअरवेल व पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते.

# बोरामणी तिहेरी हत्याकांड प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक

## शंकर ऊर्फ पप्पू मस्के पश्चिम बंगालमधून जेरबंद

### आज कोर्टात हजर करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**



बोरामणी येथील गाजलेल्या तिहेरी हत्याकांडातील मुख्य आरोपी शंकर ऊर्फ पप्पू मस्के याला ग्रामीण पोलिसांनी पश्चिम बंगालमधून अटक केली आहे. अटक केल्यानंतर आरोपीला आज बुधवारी सोलापुरात आणण्यात आले आहे. त्याला उद्या गुरुवारी (दि. ७) येथील न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावात उसने दिलेल्या पैशासाठी तसेच वडिलोपार्जित जमिनीचे वाटप करा अशी मागणी केल्याने संतापून भावजय व दोन मुलांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेत गायत्री सुधाकर मस्के (वय ४५), त्यांची मुलगी प्रिया मस्के (वय १८) आणि मुलगा शिवराज मस्के (वय १६) यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात पप्पू ऊर्फ शंकर दत्तात्रय मस्के (वय ४८), राणी शंकर मस्के (वय ४२), दीक्षा शंकर मस्के, धीरज शंकर मस्के, सूरज माधव मोरे व सचिन शिवाजी वाघमारे (सर्व रा. बोरामणी, दक्षिण सोलापूर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. शंकर मस्के वगळता इतर सर्व आरोपींना पोलिसांनी अटक करून आठ मे पर्यंत पोलीस कोठडी घेतली आहे.

घटना घडल्यापासून शंकर मस्के हा फरारच होता. ग्रामीण पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत त्यांच्या विशेष पथकाने त्याला पश्चिम बंगालमधून अटक केली. प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे हे करीत आहेत.

# अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार

## नराधमावर गुन्हा दाखल

**सोलापूर :** घरासमोर खेळणाऱ्या अकरा वर्षाच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात एका नराधमाविरुद्ध कलम ३५२, ३५१(२) आणि पोक्सो कायद्याच्या कलम ४, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हा धक्कादायक प्रकार ४ मे रोजी दुपारच्या सुमारास घडला.




सिद्धराम उर्फ सिध्दय्या देवप्रभू सलगर (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याबाबत मुलाच्या आईने फिर्याद दिली आहे. यातील पीडित मुलगा हा ४ मे रोजी घरासमोर खेळत होता. तेव्हा आरोपीने त्याला जबरदस्तीने आपल्या घरात नेऊन त्याच्यावर अत्याचार केला. ही घटना एका शेजारील महिलेने पीडित मुलाच्या आईला सांगितली. त्यानंतर आईने मुलाला विश्वासात घेऊन विचारणा केली असता,त्याने रडत रडत सर्व आपबिती सांगितली. त्यानंतर पीडित मुलाच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

# चेक बाऊन्स प्रकरणी आरोपीस ६ महिन्यांच्या शिक्षेसह १ लाख ६० हजाराचा दंड


**सोलापूर, दि. ६ मे -**

चेक बाऊन्स प्रकरणी विठ्ठल शरणप्पा खडाखडे (रा. सोरेगाव ता. उत्तर सोलापूर) याला सहा महिन्यांच्या कारावासासह १ लाख ६० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी संदीप नवले यांनी आज सुनावली.विठ्ठल खडाखडेने फिर्यादी गोविंद घोडके यांच्याकडून १० जानेवारी २०२० रोजी एक लाख २० हजार रुपये उसने घेतले होते. या रकमेच्या परतफेडीसाठी आरोपीने बँक ऑफ इंडियाचा धनादेश दिला होता. फिर्यादीने तो धनादेश बँकेत वटविण्यासाठी सादर केला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश न वटता परत आला.यानंतर फिर्यादी गोविंद घोडके यांनी ॲड. जयप्रकाश भंडारे यांच्यामार्फत सोलापूर न्यायालयात दावा दाखल केला होता या खटल्याची सुनावणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी संदीप नवले यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीदरम्यान फिर्यादीने सादर केलेले पुरावे आणि फिर्यादी पक्षाच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपी विठ्ठल खडाखडे शिक्षा सुनावली. या खटल्यात फिर्यादीच्या वतीने ॲड. जयप्रकाश भंडारे, ॲड. निलेश भंडारे व ॲड.पूनम क्षीरसागर यांनी काम पाहिले.

# रड्डे येथे रागाच्या भरात तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ६ मे-**

रड्डे येथील सुशांत शिवाजी वाघमोडे (वय २२) या तरुणाने घरगुती वादातून रागाच्या भरात आंधळगाव शिवारातील माळवाडी जंगलात झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.सुशांत वाघमोडे हा काही दिवसापुर्वी रड्डे येथील घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार मंगळवेढा पोलीसात दाखल होती. दरम्यान दि.५ मे रोजी रात्री ८.४५ वाजता अंकुश वाघमोडे यांनी फोनवरुन मंगळवेढा पोलीस ठाण्याचे हवालदार धनंजय आवताडे यांना आंधळगाव हद्दीतील माळवाडी फॉरेस्टमध्ये एका पुरुषाने झाडाला रस्सीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे सांगितले. ही खबर मिळताच खबर देणारे व मयताचे वडील यांनी घटनास्थळी जावून खात्री केली असता मयताच्या जवळ एक बिगर नंबरची मोटर सायकल व मयताच्या अंगावरील कपडे व खिशातील मोबाईल यावरुन मयत हा सुशांत वाघमोडे हाच असल्याचे स्पष्ट झाले. त्याने घरगुती वादातून रागाच्या भरात निघून जावून गळफास घेवून आत्महत्या केल्याचे दिलेल्या जबाबात म्हटले आहे. प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार हाके हे करीत आहेत.




## भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर

**ICAR - National Research Centre On Pomegrante**

(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on **08/06/2026 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Number of Post |
|---|---|---|---|
| 1. | Testing of Cyclobutrifluram 38.4% w/w SC (Vaniva) against Root Knot Nematode & Fungal (Cretocystis/Fusarium) wilt in Pomegranate" sponsored by Syngenta India Ltd. | Young Professional - 1 | 01 |
| 2 | Horticulture Crop Pest Surveillance and Advisory Project (HORTSAP), Govt. of Maharashtra | Young Professional - 1 | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.icar.gov.in.

Sd/-
**DIRECTOR**



## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३०/२०२६
नि.५

### बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात

१) **चि. ओम संदिप शहा,** वय - १५ वर्षे, धंदा - शिक्षण
२) **चि. जय संदिप शहा,** वय - १३ वर्षे, धंदा - शिक्षण
३) **श्रीमती संजना संदिप शहा,** वय - ४८ वर्षे, धंदा - घरकाम,
सर्व रा. जगदाळे कुंभार वस्ती, भोसरे, ता. माढा, जिल्हा सोलापूर ४१३२०८
(स्वतः व अर्जदार क्र. १ व २ यांचे अ.पा.क. म्हणून) — **अर्जदार**

विरूद्ध

**महाराष्ट्र शासन** - **सा.वाला**

**(सा.वालाचे समन्स मा. जिल्हाधिकारी साहेब सोलापूर यांचेवर बजावणेत याचे)**

ज्याअर्थी, अर्जदार क्र. १ व २ हे अज्ञान असलेने त्यांचे हिताचा विचार करून खाली नमुद मिळकतीमध्ये त्यांना येणारे २/३ हिश्याची मिळकत विक्री करणेसाठी मा. न्यायालयाची परवानगी मिळणेकरीता अर्जदार क्र. ३ यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

१अ) डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे भोसरे ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर ६८/४/३३ (गट नंबर ६८/४ पैकी प्लॉट नंबर ३३) याचे क्षेत्रफळ १२९.७९ चौ.मी. असून याचे मोजमाप पूर्वपश्चिम लांबी २१.५६ मोटर व दक्षिण - उत्तर :- रूंदी ६.०२ मीटर यापैकी दक्षिण बाजुची जागा. याचा ग्रामपंचायत घर नंबर १७२१ आहे. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - गट नंबर ५२, दक्षिणेस - प्लॉट नंबर ३४, पश्चिमेस - अंतर्गत रस्ता व उत्तरेस - प्लॉट नंबर ३३ पैकी उर्वरीत क्षेत्र असून याची पाणी व वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

१ब) डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे भोसरे ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर ६८/४/३३ (गट नंबर ६८/४ पैकी प्लॉट नंबर ३३) याचे क्षेत्रफळ १२९.७९ चौ.मी. असून याचे मोजमाप पूर्वपश्चिम लांबी २१.५६ मीटर व दक्षिण - उत्तर - रूंदी ६.०२ मीटर यापैकी उत्तर बाजुची जागा. याचा ग्रामपंचायत घर नंबर १७२० आहे. यासी चतु:सिमा :- पुर्वेस - गट नंबर ५२, दक्षिणेस :- प्लॉट नंबर ३३ पैकी उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेसः- अंतर्गत रस्ता व उत्तरेस :- प्लॉट नंबर ३२ याची पाणी व वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

कलम १ अ व १ब मधील संपुर्ण घरजागा मिळकतीचे गट नंबर ६८/४/३३ याचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे एकूण क्षेत्र २५९.५८ आर (२५९.५८ चौ.मी.) आकार ५ रू. ४० पैसे असून त्यामध्ये आर.सी.सी. पद्धतीचे बांधकाम केलेले इमारतीचे एकूण क्षेत्र ११९.८९ चौ.मी. आहे. येणेप्रमाणे वर्णनाची संपुर्ण मिळकत आतील सर्व वस्तुहक्कासह.

त्याअर्थी, वर नमुद मिळकतीचे मालकी हक्काबाबत अगर हस्तांतरण करणेबाबत कोणाची हरकत असल्यास संबंधीतांनी सदर प्रसिद्धीकरण तारखेपासून ३० दिवसांचे आत किंवा सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख १०/०६/२०२६ रोजी सदर अर्जाचे कामी मा. न्यायालयात सकाळी ११ वाजता स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होऊन आपल्या लेखी हरकती दाखल कराव्यात. सदर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कोणाची काहीही हरकत नाही असे समजुन सदर अर्जातील मागणीप्रमाणे अर्ज मंजुर करणेत येईल.

कळावे. हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. दिनांक ०४/०५/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.**



## जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री. सुभाष पिरप्पा चाबूकस्वार यांनी पत्नी सौ. कविता सुभाष चाबूकस्वार याचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतर करून ती मिळकत तारण (Mortgage) ठेवण्याचा प्रस्ताव जना स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर, यांचेकडे दिला असून, आमचे अशिल बँकेने सदर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सदर मिळकत निर्बंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या सद्य मालकांनी दिलेला आहे.

तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका - अक्कलकोट, पैकी मौजे धारसंग, येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.४१, यासी क्षेत्र ११२५ चौ.फू., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. ०६/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिध्देश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००११**



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी हद्दीतील जमीन याचा गट नं १४८९/२ याचे क्षेत्र १ हे. ६२ आर, आकार ६ रु. ०० पैसे यासी चतु:सिमा :- पुर्वेस - अनिल मारुती शिंदे व मधुबाला सुनिल शिंदे यांची शेतजमीन, दक्षिणेस - गट नं. १४८७/१ मोहन येडप्पा शिंदे यांची शेतजमीन, पश्चिमेस - गट नं. १५१४ अशोक बाबुराव शिंदे व प्रकाश बाबुराव शिंदे यांची शेतजमीन व गट नं. १५३२ दत्तात्रय बंडु शिंदे यांची शेतजमीन, व उत्तरेस - प्रकाश गोपाळ शिंदे यांची शेतजमीन व दिपक दिगंबर शिंदे व श्रीकांत दिगंबर शिंदे यांची शेतजमीन येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक वर्णनाची जमीन आतील सर्व दगड, माती, ताल, झाडे, झुडूपे वगैरे तदगंभूत वस्तुसह.

सदर नमूद शेतजमीन मिळकत ही नंदकुमार हनुमानदास तापडे व गोविंद हनुमानदास तापडे यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे. तसेच मिळकतीच्या हक्कपत्रकी त्यांच्या नावांची नोंद आहे. सदर शेतजमीन मिळकत त्यांनी त्यांचे कौटुंबिक व इतर कायदेशीर अडचणीचे निवारण करण्यासाठी विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर शेतजमीन मिळकतीबाबत आमचे अशिलासोबत नंदकुमार हनुमानदास तापडे व गोविंद हनुमानदास तापडे यांनी व्यवहार केलेला आहे व सदर व्यवहारापोटी त्यांनी आमचे अशिलाकडून काही इसारा दाखल रक्कमही स्विकारलेली आहे.

तरी सदर शेतजमीन मिळकतीबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क, म्हणजे इसारपावती, साठे करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास त्याने ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात ७ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. सबळ कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे, दिनांक ०६/०५/२०२६

**सही/-**
**ॲड शंकर पांडुरंग ननवरे**
**ऑफिस पत्ता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर, गाळा नं. ५०, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ८१४९०६०००८**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदारांच्या आणि सहकर्जदारांच्या कर्जासाठी त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षितता देण्यात आली आहे. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि कर्जाचे हप्ते अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम संबंधित नोटिशीनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केली आहे. तसेच सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 147188839 | मालमत्तेवर कर्ज | 1. अमिर इमामसाब सय्यद<br>2. दाईहलीमा अमीर सय्यद | 02/04/2026 | INR 4,20,726.55/- |

**मालमत्तेचा पत्ता :** विभाग सोलापूर, उपविभाग अक्कलकोट येथील मालमत्तेचा संपूर्ण हिस्सा आणि भाग, जो ग्रामपंचायत आंदेवाडी खुर्दच्या हद्दीत आहे, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ८१, एकूण मोजमाप क्षेत्र १२०० चौरस फूट, आणि सदर मालमत्तेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. उत्तर - शिवाजी रामा कामाठी, दक्षिण - रस्ता पूर्व - बाबुलाल सिकंदर शेख, पश्चिम - मल्लिकार्जुन विठ्ठल कामाठी.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 97993846 | मालमत्तेवर कर्ज | 1. बालाजी पोपट शिंदे<br>2. ज्योती बालाजी शिंदे | 02/04/2026 | INR 6,24,334.92/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५०९ चा संपूर्ण हिस्सा आणि भाग, ज्याचे एकूण मोजमाप क्षेत्र ८३.६४ चौरस मीटर किंवा ९०० चौरस फूट आहे. ही मालमत्ता गाव कवठे, ग्रामपंचायत कवठेच्या हद्दीत, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३००२ येथे स्थित असून तिच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. पूर्व - खैरुल शेख यांचे क्षेत्र, पश्चिम - रस्ता, उत्तर - बालाजी शिंदे यांचे क्षेत्र, दक्षिण - बंडगर यांची जमीन क्षेत्र

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 160066545 | मालमत्तेवर कर्ज | 1. मिराबाई शहाजी मस्के<br>2. शहाजी बब्रुवान मस्के | 08/04/2026 | INR 5,37,569.17/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २०६ चा संपूर्ण हिस्सा आणि भाग, ज्याचे एकूण मोजमाप क्षेत्र ९८० चौरस फूट आहे. ही मालमत्ता गाव नांदगाव, ग्रामपंचायत नांदगावच्या हद्दीत, तालुका मोहोळ, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१३ येथे स्थित असून तिच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. पूर्व - रस्ता, पश्चिम - श्रीपती मस्के, उत्तर - मनोहर मस्के, दक्षिण - सौदागर मस्के.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 143198354 | मालमत्तेवर कर्ज | 1. विक्रांत उध्दव भोसले<br>2. उध्दव बबन भोसले<br>3. शरद उध्दव भोसले | 23/01/2026 | INR 9,35,461.15/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १५५ चा संपूर्ण हिस्सा आणि भाग. याचे एकूण मोजमाप क्षेत्र ९५६ चौरस फूट म्हणजेच ८८.८४ चौरस मीटर असून यामध्ये बांधकाम क्षेत्राचा समावेश आहे. ही मालमत्ता कोंढेज येथे, जिल्हा परिषद सोलापूरच्या हद्दीत, तालुका करमाळा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३२०२ येथे स्थित असून तिच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. पूर्व - रस्ता, उत्तर - गजेंद्र माने यांच्या मालकीची मिळकत, पश्चिम - रस्ता, दक्षिण - सदाशिव भोसले यांच्या मालकीची मिळकत

तुम्हाला याद्वारे कळविण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम, संबंधित तारखांपासून लागणारे करारानुसार व्याज आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावी. असे करण्यात अयशस्वी ठरल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देय रक्कम वसूल करण्यासाठी, निम्न स्वाक्षरीकार सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये वरील नमूद गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही करण्यास बांधील असतील. पुढे, तुम्हाला उक्त कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये सदर सुरक्षित मालमत्तांची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

दिनांक : **07/05/2026**
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळवण्यात येते की तुकडी जिल्हा सोलापूर, पोट तुकडी तालुका माळशिरस, गाव - महाळुंग येथील गट नंबर ११८६ यांची एकूण क्षेत्र १ हे. ९१ आर त्यापैकी १६२० स्क्वेअर मीटर एवढी जमीन, जिला इथून पुढे 'सदर मिळकत' असे संबोधलेले आहे. सदर मिळकत ही श्री. दत्तात्रय शंकर मुंडफले यांचे मालकीची असून, त्यांनी ती श्वेता सुरेश खोत यांना दिनांक १६/१०/२०२३ रोजीच्या भाडेपट्ट्याने भाड्याने दिलेली आहे.

सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या आमच्या अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्दोष, निर्जाखमी व बोजारहीत असल्याची, तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून त्यावर जप्ती अथवा मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरवसा आमच्या अशिलांना म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिला आहे तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लोन, बक्षीस, ताबा, पोटगी, दाया, कुळ, खंड, साठेखत, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास, त्यानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत आमच्याकडे समक्ष येऊन, मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत मूळ कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास, सदर मिळकतीवर, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. सबब जाहीर नोटीस दिली असे.

सोलापूर, दिनांक ०६/०५/२०२६.

**सही/-**
**ॲड. श्री. आनंद रामचंद्र देशपांडे,**
**बी.ए., एल.एल.बी., एम.ए. (इतिहास).**
**पत्ता : ९१/अ, मुरारजी पेठ,**
**सोलापूर ४१३००१.**
**मोबाईल : ९८२३२९१६४३**



## मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर यांचे समोर लवाद न्यायाधिकरण कार्यालय

श्री. भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. बार्शी, के. टी. ट्रॅक्टर्स शोरूम, (कुबाटा), दुसरा मजला, लातुर रोड, बार्शी ता बार्शी जि. सोलापूर
**(मल्टीस्टेट को ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)**

### जाहीर नोटीस/समन्स

**अर्जदार : श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**
**विरूद्ध : गैरअर्जदार**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता |
|---|---|---|
| १. | ०१/२०२६ | **१) संदिप हनुमंत बस्के**<br>**२) हनुमंत बाबासाहेब बस्के**<br>दोघे रा. आकुलगाव ता. माढा जि. सोलापूर<br>**३) भरत विष्णु साळुंखे**<br>रा. दत्त नगर, अकलुज टेंभुर्णी रोड, माळी नगर, ता. अकलुज जि. सोलापूर<br>**४) संतोष विलास गायकवाड**<br>रा. तुकाराम नगर, कुर्डूवाडी ता. माढा जि. सोलापूर<br>**५) सागर दत्तात्रय गुळवे**<br>रा. भोसरे ता. माढा जि. सोलापूर |
| २. | ०२/२०२६ | **१) विजय महादेव जाधव**<br>रा. संगम पार्क, परांडा ता. परांडा जि. धाराशिव<br>**२) तानाजी श्रीमंत फरतडे**<br>रा. साकत (बु) ता. परांडा जि. धाराशिव<br>**३) जोतिबा शिवशंकर शिंदे**<br>रा. चिंचगाव टेकडी ता. माढा जि. सोलापूर |
| ३. | ०३/२०२६ | **१) हनुमंत रामचंद्र यादव**<br>**२) धनजय परमेश्वर इतापे**<br>दोघे रा. आसु ता. परांडा जि. धाराशिव<br>**३) अशोक साहेबराव कोकणे**<br>रा. कोकणे वस्ती, देवगाव ता. परांडा जि, धाराशिव |
| ४. | ०५/२०२६ | **१) बिरमल विष्णु बोबडे**<br>**२) दिलीप शंकर पवार**<br>**३) संतोष सुधाकर पाटील**<br>सर्व रा. सिरसाव ता. परांडा जि. धाराशिव |
| ५. | ०६/२०२६ | **१) स्वाती बालाजी देशमुख**<br>**२) अजय महादेव जमदाडे**<br>दोघे रा. खासापूरी ता. परांडा जि, धाराशिव<br>**३) वसंत रंगनाथ राऊत**<br>रा. खळवट लिमगाव ता. वडवणी जि. बीड<br>दुसरा पत्ताः रा.गे. शिंदे कॉलेज,<br>परांडा ता. परांडा जि. धाराशिव |
| ६. | ०८/२०२६ | **१) बाळासाहेब मोतीराम भोजने**<br>**२) योगेश राजेंद्र दास**<br>**३) महादेव भिमराव कुंभार**<br>सर्व रा. रोपळे ता. माढा जि. सोलापूर |
| ७. | १०/२०२६ | **१) राजेंद्र भिमराव मेहेर**<br>**२) शरद अशोक बनकर**<br>**३) मुलाणी आसिफ रज्जाक**<br>सर्व रा. रोपळे (क) ता. माढा जि. सोलापूर |
| ८. | ११/२०२६ | **१) सुरेखा धनाजी गोडगे**<br>**२) दास श्रीकांत दत्तात्रय**<br>**३) पांडुरंग बबन वाघमारे**<br>सर्व रा. रोपळे ता. माढा जि. सोलापूर |
| ९. | १२/२०२६ | **१) मनियार नासीम मोहमद**<br>**२) मनियार मोहसीन आयुब**<br>दोघे रा. पठ्ठा गल्ली, परांडा ता. परांडा जि. धाराशिव<br>**३) हन्नुरे हाजी जमील**<br>रा. मोमीन गल्ली, परांडा ता. परांडा जि, धाराशिव |
| १०. | १५/२०२६ | **१) वाघमारे पांडुरंग बबन**<br>**२) दास श्रीकांत दत्तात्रय**<br>**३) नवले विजयकुमार भारत**<br>सर्व रा. रोपळे ता. माढा जि. सोलापूर |
| ११. | १७/२०२६ | **१) गुंजाळ अमरदिप अंकुश**<br>**२) जाधव संतोष महादेव**<br>**३) गुंजाळ रोहिदास देवराव**<br>सर्व रा. बारलोणी ता. माढा जि. सोलापूर |
| १२. | १८/२०२६ | **१) ताकमोगे शशिकांत कल्याण**<br>**२) चोपडे गजानन भानुदास**<br>**३) ढेरे विश्वनाथ भानुदास**<br>रा. कव्हे ता. माढा जि. सोलापूर |
| १३. | १९/२०२६ | **१) सूर्यवंशी जनकराज पांडुरंग**<br>रा. डोंजा ता. परांडा जि. धाराशिव<br>**२) सुर्यवंशी लक्ष्मण गणपत**<br>रा. विद्या नगर, परांडा ता. परांडा जि. धाराशिव<br>**३) पाटील सुनिल पांडुरंग**<br>रा. डोंजा ता. परांडा जि. धाराशिव |
| १४. | २०/२०२६ | **१) गायकवाड ऋषीकेश तानाजी**<br>**२) गायकवाड समाधान राजाराम**<br>**३) गायकवाड शिवलिंग दिलीप**<br>सर्व रा. मंगळवार पेठ, गोसावी गल्ली,<br>परांडा ता. परांडा जि. धाराशिव |

**(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. १ हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)**

सदर नोटीसद्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवन गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. १२/०५/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, या बाबतीत तुमचे काहीही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, सबब, ही नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे. दि. २३/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. अजित एम. देशमुख**
**लवाद अधिकारी, बार्शी**



## महत्त्वाचे

### भारतीय बॉक्सर्सची २७ पदके निश्चित

**ताश्कंद** : येथे बुधवारी पार पडलेल्या आशियाई मुष्टियुद्ध १५ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय बॉक्सर्सनी २७ पदके निश्चित केली. १५ वर्षांखालील मुलींच्या संघाने संभाव्य १५ पैकी १४ पदके मिळवली, तर १५ वर्षांखालील मुलांच्या संघानेही या कामगिरीची जवळपास बरोबरी करत १५ पैकी १३ पदके निश्चित केली. यामुळे देशासाठी एका ऐतिहासिक कामगिरीची पायाभरणी झाली आहे. शस्ता वसंत अशोक कुमार (३७ किलो) आणि प्रशांतने (४९ किलो) या आक्रमक मोहिमेचे नेतृत्व केले. या दोघांनीही आपल्या युएईच्या मोहम्मद अलबन्नाई आणि मायेद अल्यम्माहीला पहिल्याच फेरीत द्वारे पराभूत केले. नितीन (४० किलो) आणि हर्षवर्धन जीनानेही (५५ किलो) भारताची आक्रमक ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली. त्यांनी अनुक्रमे कझाकस्तानच्या सायात मेंगदिबाय आणि ताजिकिस्तानच्या मुहम्मद फोजिलोव्ह यांच्यावर दुसऱ्या फेरीतच द्वारे विजय मिळवला. अत्यंत चुरशीच्या लढतींमध्ये, यश कुमार (३३ किलो) आणि रोहित पोथीनाने (३५ किलो) आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविला.

### जागतिक टेबल टेनिस स्पर्धेत भारताचे आव्हान संपुष्टात

**नवी दिल्ली** : जागतिक टेबल टेनिस सांघिक अजिंक्यपद स्पर्धेतील भारताची निराशाजनक कामगिरीची मोहीम, महिला संघाला ३२ च्या फेरीत अमेरिकेकडून १-३ ने पराभव पत्करावा लागल्याने येथे संपुष्टात आली. पुरुष संघालाही मंगळवारी ३२ च्या फेरीत ऑस्ट्रियाविरुद्धच्या लढतीत पराभवाचा सामना करावा लागला. या लढतीत प्रभाव पाडणारी एकमेव खेळाडू मनिका बत्रा होती; तिने आपल्या एकेरीच्या सामन्यात रेयेस जेसिकाचा ११-२, ११-८, ८-११, ११-४ अशा गुणांनी पराभव केला, मात्र इतर भारतीय खेळाडूंना संघर्ष करावा लागला.

# यंदाही आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबामध्ये रंगणार

**पहिला क्वालिफायर धर्मशाळा येथे तर दुसरा क्वालिफायर व एलिमिनेटर सामना न्यू चंदीगडच्या मुल्लानपूर येथे खेळविला जाईल**





३१ मे साठी नरेंद्र मोदी स्टेडियम सज्ज

**नवी दिल्ली, ६ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सध्या साखळी सामने खेळले जात आहेत. बीसीसीआयने जाहीर केलेल्या वेळापत्रकात पुढील लीग सामन्यांच्या तारखा आणि स्थळे नमूद केलेली नव्हती. आता क्वलिफायर आणि एलिमिनेटर सामन्यांच्या ठिकाणांसोबतच अंतिम सामना कुठे होईल, तेही उघड झाले आहे.

सध्या स्पर्धेत सहभागी झालेले दहा संघ आपापले सामने जिंकून अव्वल चारमध्ये आपले स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आयपीएलच्या या हंगामातील साखळी फेरीचा शेवटचा सामना २४ मे रोजी खेळला जाईल. हा दिवस रविवार असून, दोन सामने नियोजित आहेत. पहिला सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स व राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला जाईल. दुसरा सामना कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर केकेआर आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला जाईल. या सामन्याने साखळी फेरीचा शेवट होईल. १० पैकी सहा संघ स्पर्धेतून बाहेर पडतील, त्यामुळे विजेतेपदाच्या शर्यतीत केवळ चार संघ शिल्लक राहतील.

यानंतर दोन क्वालिफायर, एक एलिमिनेटर आणि मग अंतिम सामना खेळवला जाईल. तारखा जाहीर झाल्या आहेत. आयपीएलचा अंतिम सामना रविवार, ३१ मे रोजी होईल असे आधीच मानले जात होते आणि आता त्याला दुजोरा मिळाला आहे. त्या दिवशी चॅम्पियन संघही जाहीर होईल.

दरम्यान, आयपीएलचा अंतिम सामना बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार नाही, अशी बातमी समोर आली आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमला यजमानपदाचे हक्क देण्यात आले आहेत.

आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये होणार आहे, पण यावर्षीचा पहिला क्वालिफायर धर्मशाळा येथे खेळविला जाईल. याशिवाय दुसरा क्वालिफायर व एलिमिनेटर सामना न्यू चंदीगडच्या मुल्लानपूर येथे खेळविला जाईल. राजकीय कारणांमुळे बंगळुरूला प्लेऑफच्या कोणत्याही सामन्याचे आयोजन करण्याची संधी देण्यात आलेली नाही, असे समजते.

(वृत्तसंस्था)



### हार्दिक एकापेक्षा अधिक सामन्यांना मुकण्याची शक्यता

**मुंबई** : मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या दुखापती मुळे, सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग २०२६ मधील एकापेक्षा अधिक सामन्यांना मुकण्याची शक्यता आहे. पाठीच्या स्नायूंच्या आकुंचनामुळे हार्दिक रविवारी लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध झालेला मुंबईचा मागील सामना खेळू शकला नाही. सुरुवातीला ही दुखापत त्याला फार काळ सामन्यांपासून दूर ठेवेल असे वाटत नव्हते, विशेषतः रायपूरमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध होणाऱ्या आगामी सामन्यासाठीमात्र आता त्याच्या उपलब्धतेबाबत पुन्हा एकदा नवीन चिंता निर्माण झाल्या आहेत. संघाचे पुढील सामन्यासाठी प्रस्थान झाले तेव्हा हार्दिक तिथे उपस्थित नव्हता.

# सुवर्णमहोत्सवी सामना आज

**लखनौ, ६ मे**

भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर गुरुवारी १९ व्या इंडियन प्रीमियर लीग २०२६ हंगामातील ५० वा सामना यजमान लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यादरम्यान हंगामातील खेळला जाणार आहे.



रजत पाटीदार ऋषभ पंत

एकीकडे एका कठीण हंगामाचा सामना केल्यानंतर आपल्या प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी लखनौ संघाला विजयाची नितांत गरज आहे; तर दुसरीकडे,रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील बंगळुरू आपल्या अलीकडील पिछाडीतून सावरत, गुणतालिकेत अव्वल स्थानाच्या नजीक असलेली आपली भक्कम स्थिती कायम राखण्याचे ध्येय बाळगून आहे.

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ सुपर जायंट्स संघ एकाना मैदानावर परतत, या हंगामाच्या सुरुवातीला आरसीबीकडून पत्करावा लागलेल्या पराभवाचा वचपा काढण्याचा प्रयत्न करेल. सध्या, लखनौ ४ गुणांसह दहा संघांच्या गुणतालिकेत तळाच्या स्थानावर आहे; त्यांनी आतापर्यंत खेळलेल्या नऊ सामन्यांपैकी केवळ दोन सामन्यांतच विजय मिळविला आहे.

या हंगामाच्या सुरुवातीला लखनौ-बंगळुरू हे दोन्ही संघ आमने-सामने आले होते, तेव्हा दुर्दैवाने लखनौ संघाला पाच गडी राखून पराभव स्वीकारावा लागला होता.

प्ले-ऑफमध्ये पोहोचण्याच्या त्यांच्या आशा अत्यंत क्षीण झाल्या असताना, आता दमदार कामगिरी करीत या हंगामातील आपला तिसरा विजय मिळविण्यासाठी ते अत्यंत उत्सुक आहेत. दोन्ही संघ महत्त्वपूर्ण गुणांसाठी चुरशीने लढत आहेत.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आपल्या नऊ सामन्यांपैकी सहा सामने जिंकून दुसऱ्या स्थानावर भक्कम स्थितीत आहे.

तथापि, गुजरात टायटन्सकडून चार गडी राखून झालेल्या निराशाजनक पराभवानंतर ते हा सामना खेळण्यासाठी येत आहेत. जोरदार पुनरागमन करण्याच्या निर्धाराने सज्ज असलेला आरसीबी आपला सातवा विजय मिळवून, आयपीएलमध्ये आपले स्थान अधिक बळकट करण्याच्या प्रयत्नात असेल.

(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायंट्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ** : भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकाना स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजता
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# कर्नाटक संघटनेच्या पदरी निराशा

### प्लेऑफ सामने, अंतिम सामनाही इतरत्र हलविले

**बंगळुरू, ६ मे**

बीसीसीआयने आयपीएल २०२६ चा अंतिम सामना बंगळुरूवरून अहमदाबादला हलवल्यानंतर कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने बुधवारी आपली नाराजी व्यक्त केली.

परंपरेनुसार, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे गतविजेते असल्याने अंतिम सामन्याचे यजमानपद बंगळुरूकडे असणे अपेक्षित होते; परंतु बीसीसीआयने नेमके कारण स्पष्ट न करता सामन्याचे ठिकाण अहमदाबादला हलवले.

तथापि, बीसीसीआयने असे स्पष्ट केले की, अंतिम सामन्याचे ठिकाण 'स्थानिक संघटना व प्रशासनाकडून करण्यात आलेल्या काही मागण्यांमुळे' बदलण्यात आले आहे; आणि या मागण्या बीसीसीआयच्या प्रस्थापित मार्गदर्शक तत्त्वे व नियमावलीच्या कक्षेबाहेर होत्या.

आयपीएल २०२६ च्या सुरुवातीला, कर्नाटक क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष व्यंकटेश प्रसाद यांनी अशी घोषणा केली होती की, बीसीसीआयने बंगळुरूला एकूण सात सामने देण्याचा निर्णय घेतला आहे, यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे पाच होम सामने, तसेच एक प्लेऑफ सामना आणि अंतिम सामन्याचा समावेश होता. परंतु आयपीएलचे प्लेऑफ सामने इतर केंद्रांना देण्यात आल्याबद्दल आपली नाराजी आहे. प्रतिष्ठित चिन्नास्वामी स्टेडियमवर आयपीएल प्लेऑफ सामन्यांचे यजमानपद स्वीकारण्यासाठी कर्नाटक संघटनेची तयारी, इच्छाशक्ती व तीव्र उत्सुकता होती, परंतु प्लेऑफ सामने इतर केंद्रांकडे हलवण्यामागील 'विशिष्ट कारणे' बीसीसीआयने अद्याप कळवलेली नाहीत, हे आम्हाला समजले आहे, असे कर्नाटक क्रिकेट संघटनेचे अधिकृत प्रवक्ते विनय मृत्युंजय यांनी सांगितले.

गत वर्षी या फ्रॅन्चायझीच्या विजयाच्या जल्लोषादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ११ चाहत्यांचा मृत्यू झाल्यानंतर, २०२६ च्या आधी कर्नाटक क्रिकेट संघटनेने आरसीबी व राज्य सरकारच्या इतर संबंधित विभागांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर नूतनीकरण आणि सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याची कामे हाती घेतली होती. या मैदानावर पुन्हा क्रिकेट सामने खेळवण्यास परवानगी देण्यापूर्वी, या कामांसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांबाबत राज्य सरकार आणि बीसीसीआय या दोन्ही संस्थांनी समाधान व्यक्त केले होते. शहरात आयोजित करण्यात आलेले आयपीएलचे पाचही सामने कोणत्याही अनुचित घटनेविना पार पडले; तसेच सुरक्षा व्यवस्था आणि गर्दीचे व्यवस्थापन यांमध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आली. तथापि, या वर्षाच्या अखेरीस चिन्नास्वामी मैदानावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे पुनरागमन होणार आहे; कारण १७ ऑक्टोबर रोजी भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील पाचवा २० आंतरराष्ट्रीय सामना याच मैदानावर खेळवला जाणार आहे.

(वृत्तसंस्था)

# स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी सोलापुरात

**सोलापूर, दि. ६ मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व सोलापुर चेस अकॅडमी व चॅम्प चेस स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने १९ वर्षांखालील गटाची जिल्हा खुली व मुलींच्या निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवार १० मे रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी प्रशाला येथील राजर्षी शाहू सभागृह येथे केले आहे.

प्रथम येणाऱ्या चार मुले व मुलींची निवड पुणे येथे होणाऱ्या राज्य बुद्धीबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. या स्पर्धेत १.१.२००७ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. या स्पर्धेत ४० बक्षिसे देण्यात येणार असून १४, ११ व ८ वर्षांखालील गटात प्रत्येकी पाच उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात असल्याचे अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड, समन्वयक डॉ अनिल घनवट तसेच आंतरराष्ट्रीय पंच व मार्गदर्शक प्रा सुमुख गायकवाड यांनी सांगितले आहे. इच्छुक खेळाडूंनी उदय वगरे (मो. ८८८८०४५३४४) अथवा प्रशांत पिसे मो (९१५६८१५९६३) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर व सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

# मॉडेल क्रिकेट अकॅडमीचा गॅरी कर्स्टन अकॅडमीवर विजय

**● विजय चषक क्रिकेट; संस्कार गवळीचे ५ बळी ●**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

विजय चषक क्रिकेट स्पर्धेत संस्कार गवळीच्या भेदक माऱ्यामुळे मॉडेल क्रिकेट अकॅडमीने गॅरी कर्स्टन क्रिकेट अकॅडमीचा १५२ धावांनी धुव्वा उडवत आपली पकड मजबूत केली.

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मॉडेल अकॅडमीने ३९.५ षटकांत सर्वबाद २४६ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य उभे केले होते, ज्यामध्ये ययाती देवकतेने ७४ चेंडूत ६४ धावांचे महत्वपूर्ण योगदान दिले. प्रत्युत्तरात गॅरी कर्स्टन अकॅडमीचा संघ मॉडेलच्या प्रभावी गोलंदाजीसमोर पूर्णपणे हतबल झाला. त्यांचा डाव अवघ्या १८.४ षटकांत ९४ धावांत आटोपला. गॅरी कर्स्टन संघाकडून मंदार वढवरावने ४२ चेंडूत ४१ धावांची झुंज दिली, मात्र इतर फलंदाजांनी निराशा केली.



संस्कार गवळी

मॉडेलच्या विजयाचा खरा नायक संस्कार गवळी ठरला. त्याने ४.४ षटकांत एक निर्धाव षटक टाकत केवळ ८ धावांच्या मोबदल्यात ५ बळी घेतले. या कामगिरीबद्दल संस्कारला सामनावीर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# सोलापूरच्या रणरागिणींचा रिक्रिएशनवर दिमाखदार विजय

### भक्ती पवारची फिरकी, आर्याची उमापची फटकेबाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महिला क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या महिला संघाने आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर रिक्रिएशन संघाचा १६ धावांनी पराभव करत शानदार विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सोलापूर संघाने निर्धारित २० षटकांत ५ बाद १२४ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य उभे केले. सोलापूरकडून आर्या उमाप हिने ३८ चेंडूत ५ चौकारांच्या मदतीने सर्वाधिक ३५ धावांची खेळी करत संघाला भक्कम धावसंख्या उभारून दिली. प्रत्युत्तरादाखल खेळताना रिक्रिएशन संघाला सोलापूरच्या अचूक गोलंदाजीसमोर २० षटकांत ४ बाद १०८ धावांपर्यंतच मजल मारता आली. रिक्रिएशनकडून संजना शिंदे (३५ धावा) आणि सयी वाळुंज (३० धावा) यांनी खिंड लढवण्याचा प्रयत्न केला, मात्र वाढत्या धावगतीमुळे त्यांना अपयश आले.



भक्ती पवार

सोलापूरच्या विजयात गोलंदाजांनी मोलाची भूमिका बजावली, ज्यामध्ये भक्ती पवार हिने ४ षटकांत केवळ १९ धावा देत २ महत्त्वपूर्ण बळी मिळवले. तिला साक्षी लामकाने हिने १ बळी घेत चांगली साथ दिली. उत्कृष्ट गोलंदाजीसाठी भक्ती पवार हिला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.



# खुल्या गटात कोल्हापूरचा हेमंत भोसले प्रथम

**श्रीपूरच्या प्रबुद्धची बुद्धिबळ स्पर्धा | अकलूजचा वैष्णव देशमुख १५ वर्षे गटात अजिंक्य**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ६ मे-**

येथील प्रबुद्ध बहुउद्देशीय सामाजीक संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटातून कोल्हापूरच्या हेमंत भोसले व १५ वर्षीय वयोगटातून अकलूजच्या वैष्णव देशमुखने अजिंक्यपद पटकाविले.

संस्थेचे अध्यक्ष संदीप लांडगे यांचे संकल्पनेतून साकारलेल्या या स्पर्धेत सुमारे १५० स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेचे उद्घाटन अकलुज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचे हस्ते झाले. बक्षिस वितरण महाळुंग-श्रीपूर नगरपंचातीचे उपनगराध्यक्ष भिम राव रेडे-पाटील, नगरसेवक राहुल रेडे-पाटील, प्रा. प्रकाश नवगिरे, माजी पं. स. सदस्य अनिल जाधव, विक्रमसिंह लाटे, मौला पठाण, चंद्र चंद्रशेखर विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकर यादव, राष्ट्रवादीचे संदीप सुरेश घाडगे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सतीश लांडगे, प्रा. नरेंद्र भोसले, डॉ. आंबेडकर स्मारक समितीचे संदीप घाडगे, सुधीर भोसले, राहुल बाबर, राजाभाऊ सुरवसे, समाधान लांडगे, सुर्यकांत बनसोडे, रशिद मुलाणी, जालिंदर खरात, रोहीत काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत वाभळे यांनी तर आभार प्रा. नरेंद्र भोसले यांनी मानले.

**गुणानुक्रमे अंतिम निकाल**

**खुला गट** : हेमंत भोसले (कोल्हापूर), अनिरुद्ध गुरव, रितेश चव्हाण , शौर्य चव्हाण, प्रतिक इंगळे (सर्व अकलूज )

**१५ वर्षांखालील** : वैष्णव देशमुख (अकलूज), आर्यन माने-देशमुख (वेळापूर), विनय रणसुभे, श्रीराम राऊत, सार्थक राऊत (अकलूज).

**१० वर्षांखालील** : कृष्णराज पताळे (म हाळूंग), द्वितीय राजवर्धन पताळे (अकलुज), अथर्व दणाने (बार्शी), तेजस्वीनी कांबळे (खुडूस), शिवम शिन्दे (अकलूज).



# सोलापूर जिल्हा संघाची ८० पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

दुसऱ्या राष्ट्रीय दांडपट्टा व लाठी स्पर्धेत महाराष्ट्र संघातील सोलापूर जिल्हा संघाने ८० पदकांची कमाई केली आहे.

ट्रेडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन व भारतीय लाठी महासंघ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेली ही स्पर्धा येथील राजीव गांधी इनडोर स्टेडियममध्ये झाली. या स्पर्धेचे उद्घाटन दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष शिवराम भोसले आणि उपाध्यक्ष अंजना कडलासकर यांच्या हस्ते झाले. यशस्वी खेळाडूंना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य संजय साळुंके, ॲड. अविनाश कडलासकर आणि पालक प्रतिनिधी सुजित हवळे यांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**दुसरी राष्ट्रीय दांडपट्टा व लाठी स्पर्धा**

सोलापूरच्या खेळाडूंना प्रशिक्षक आणि राज्य सचिव अश्विन कडलासकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय पंच म्हणून अर्पिता भोपळे, तन्वी पवार, अवितेज कडलासकर, राहुल भोसले आणि अमोल भोसले यांनी भूमिका बजावली.

**सोलापूरच्या खेळाडूंची कामगिरी (प्रथम तीन)**

**एकेरी लाठी** : १० वर्षांखालील मुले: राजवीर निकम, यशवर्धन रेब्बा, श्रवण माने, विश्वजीत जाधव. मुली: यशश्री यादव, शांभवी फडतरे. १२ वर्षांखालील मुले: साकेत हवळे, अझरुद्दीन शेख. मुली: श्रुती महाडिक, हिंदवी महाडिक. गट २ : माऊली निकम, सक्षम महाडिक. १४ वर्षांखालील मुले: सोहम निकम, श्लोक महाडिक, शिवम निकम, चैतन्य निकम, स्वराज महाडिक. मुली : प्रत्युषा ढोणे, पल्लवी माळी.

**लाठी प्रतिद्वंद्व** : १२ वर्षांखालील मुले : श्रेयश निकम, मयुरेश निकम, विराज निकम, संभव निकम. १६ वर्षांखालील मुले : दर्शन राजोबा, अर्णव निलगर. १४ वर्षांखालील मुली : अंकिता निकम, प्रणीती निकम, सृष्टी निकम, स्वरूपा यादव.

**दांडपट्टा** : आठवार पट्टा- १० वर्षे मुले: यशवर्धन रेखा, नागनाथ व्हटकर. मुली : शांभवी फडतरे, श्रुती महाडिक, यशश्री यादव. १२ वर्षे मुले : विराज निकम,माऊली निकम. १४ वर्षे मुले :श्रेयश निकम, सोहम निकम, शिवम निकम, संभव निकम, मयुरेश निकम. मुली : अंकिता निकम, सृष्टी निकम, हिंदवी महाडिक, प्रणीती निकम, अर्पिता जाधव. १६ वर्षे मुले : अझरुद्दीन शेख.

**पट्टा इतर प्रकार** : एकेरी पट्टा- १० वर्षे मुले : राजवीर निकम, सक्षम महाडिक, श्लोक महाडिक. १२ वर्षे मुली : शशी पाटणकर, आराध्या नंदी, स्वरूपा यादव. १६ वर्षे मुले: दर्शन राजोबा, सुयश हुच्चे. बारावार पट्टा- १६ वर्षे मुले : प्रतोश आळंद, आदिनाथ खंडेराव, अर्णव निलगर. अठरावार पट्टा- १६ वर्षे मुले: प्रथम - प्रतोश आळंद.

**लाठी प्रहार** : एकविशती प्रहार- १६ वर्षे मुले : प्रतोश आळंद, आदिनाथ खंडेराव. मुली: राशी पाटणकर.चतुर्विशती प्रहार- १६ वर्षे मुले : प्रतोश आळंद, अर्णव निलगर.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### स्वेरी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आधुनिक लॅबचे उद्‌घाटन

**पंढरपूर, दि. ६ मे-**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये क्लीनोव्हेट सॉफ्टवेअर प्रा. लि. या कंपनीचे आधुनिक सॉफ्टवेअर समाविष्ट असलेल्या लॅबचे उदघाटन अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मनियार यांच्या नेतृत्वाखाली ही अत्याधुनिक लॅब तयार केली आहे. विशेषतः अमेरिका-युके हेल्थकेअर सिस्टीममध्ये एआय इंटिग्रेशन आधारित आधुनिक सॉफ्टवेअर समाविष्ट करण्याच्या उद्देशाने या लॅबची निर्मिती केली आहे. लॅबसाठी सुमारे २२ लाख इतकी गुंतवणूक केली आहे. या लॅबच्या माध्यमातून फार्मसीमधील विद्यार्थ्यांना आधुनिक सॉफ्टवेअर प्रशिक्षण देण्यावर विशेष भर दिला आहे. कार्यक्रमास सुयशा काकोडकर, डॉ. जान्हवी गांगल, स्वेरी संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, विश्वस्त डॉ. सुरज रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे प्रा. कोमल परचंडे, तसेच श्री एन्क्युटी टेक्नोलॉजीज्‌चे प्रतिनिधी शार्दूल भोसले उपस्थित होते.



### विजेच्या लपंडावाविरोधात रिपाइंचे निवेदन

**अक्कलकोट, दि. ६ मे-**

सोलरचे प्रमाण वाढले आहे विजेचा सध्या तुटवडा नाही . तरीही अक्कलकोट शहरातील वीज पुरवठा अचानकपणे खंडीत होत आहे . त्याचा वयोवृद्ध व्यक्ती आणि नवजात शिशु बालक, लहान मुलांना त्याचा त्रास होत असल्याने त्याविरोधात बुधवारी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले च्या वतीने अक्कलकोट महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना अक्कलकोट नगरपरिषदेचे नगरसेवक आरोग्य सभापती तथा रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, सध्या मे महिन्यात तापमान ४४ ते ४५ अक्कलकोटचा तापमानाचा पारा असल्याने शासनाच्या वतीने सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत गरज असेल तर बाहेर पडा अन्यथा बाहेर पडू नये असे जनहितार्थ आवाहन केले आहे. मात्र सहा तास पेक्षा अधिक काळ बुधवारी वीज खंडीत केली. संध्याकाळी ६.३० वाजले तरी भिमनगर मैंदर्गी रस्ता भागात विज पुरवठा झाला नाही. महावितरणकडून व्यवस्थित वीज पुरवठा न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी नगरसेवक सद्दाम शेरीकर, माजी नगरसेवक आलम कोरबू, विनोद मदने, अंबादास गायकवाड, असिफ सुतार उपस्थित होते.



### पंढरपुरात तीन लाख रूपयांची देशी-विदेशी दारू व बियर केली नष्ट

**पंढरपूर, दि. ६ मे-**

पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या आवारामध्ये जेसीबीच्यासाह्याने ६ मे रोजी मोठा खड्डा करून पंचांच्या उपस्थितीमध्ये पंढरपूर उपविभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी एकूण तीन लाख रुपये किमतीची देशी-विदेशी बनावटीची दारू व बियर नष्ट केल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठपोलिस निरीक्षक टी. वाय.मुजावर यांनी दिली. या कारवाई संदर्भात माहिती देताना मुजावर यांनी सांगितले की, पंढरपूर तालुका पोलिसांनी वेगवेगळ्या एकूण १०७ गुन्ह्यातीलजप्त दारू बुधवारी (ता.६) जेसीबीच्या साह्याने खड्डा करून संपूर्ण जेसीबीच्या साह्याने बाटल्या फोडूननष्ट केली आहे. दरम्यान सदरची दारू पोलीस स्टेशनला अनेक दिवसा पासून जप्त होती. त्याबाबत पंढरपूर तालुका पोलिसांनी संबंधित विभागाला पाठपुरावा करून एकूण तीन लाख रुपयांची देशी-विदेशी दारू व बियर नष्ट केलेली आहे. एकूण १०७ दारूच्या गुन्ह्यातील मुद्देमाल नष्टकरून मुद्देमालाची निर्गती करण्यात आलेली आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्यामार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, विक्रम वडणे, ममनेरी, पोलीस कॉन्स्टेबल देशमुख, पोलीस पोलीस कॉन्स्टेबल संजय गुटाळ, कॉन्स्टेबल सुजित उबाळे, महिला पोलिस हवालदार कदम यांच्या पथकाने केली.

## निधन वृत्त...

### कविता निकते



**सोलापूर, दि. ६ मे-**

रंगराज नगर परिसरातील कविता राजेंद्र निकते (वय ५८) यांचे बुधवार, दि. ६ मे रोजी पहाटे ३.४५ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सून, दिर, जाऊ असा परिवार आहे.

# ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना; पशुधन उद्योजकतेतून उत्पन्नाची संधी

## ७५ टक्के अनुदानासह दुग्ध, शेळी-मेंढी व कुक्कुटपालन प्रकल्पांना बूस्ट; पाच दुधाळ गायी, म्हशींसाठी ११.३५ लाखांचा प्रकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

ग्रामीण भागातील अर्थचक्राला गती देण्यासाठी आणि युवकांना स्थिर उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' पुढे आणली आहे. या योजनेच्या माध्यमातून पशुपालन क्षेत्राला आधुनिक व्यवसायाचे स्वरूप देत, ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर दिला जात आहे.

विशेष म्हणजे, ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान आणि ३० लाख रुपयांपर्यंतचे प्रकल्प मंजुरीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने ही योजना ग्रामीण भागात परिवर्तन घडवणारी ठरण्याची चिन्हे आहेत.

पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमांतर्गत दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन आणि कुक्कुटपालन या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले आहे. पाच दुधाळ गायी किंवा म्हशींसाठी सुमारे ११.३५ लाख रुपयांचा प्रकल्प, शेळी-मेंढी पालनासाठी ११.३८ लाख आणि कुक्कुटपालनासाठी तब्बल ३० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना मंजुरी दिली जाणार आहे. या प्रकल्पांमुळे पारंपरिक शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना पूरक उत्पन्नाचे भक्कम साधन उपलब्ध होणार आहे. योजनेची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे पशुपालनाकडे केवळ पूरक व्यवसाय म्हणून न पाहता, तो एक पूर्णवेळ उद्योग म्हणून



विकसित करण्यावर शासनाचा भर आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित जातींचा वापर, वैज्ञानिक पद्धती आणि बाजारपेठेशी थेट जोड यामुळे उत्पादनक्षमतेत वाढ होऊन उत्पन्नात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. योजना दोन स्तरांवर राबविण्यात येणार असून, जिल्हास्तरावर १५ तर राज्यस्तरावर १२ विविध योजना उपलब्ध असतील. यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार आणि क्षमतेनुसार पर्याय निवडता येणार आहेत. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती वाढवून स्थलांतराची समस्या कमी करण्यासही ही योजना मदत करेल, अशी अपेक्षा आहे. पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महाडीबीटी प्रणालीद्वारे अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी, रोजगारनिर्मिती वाढवणारी आणि युवकांना स्वावलंबनाकडे नेणारी महत्त्वाकांक्षी योजना ठरत असून, येत्या काळात गावागावांत उद्योजकतेची नवी लाट निर्माण होण्याची शक्यता आहे.

ग्रामीण भागातील युवकांनी या योजनेकडे केवळ अनुदान म्हणून न पाहता, दीर्घकालीन व्यवसाय संधी म्हणून पाहावे. योग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने पशुपालन क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवता येऊ शकते.

**- डॉ. अनिल तांबे,**
उपायुक्त पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर.

यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसून लाभार्थ्यांपर्यंत मदत थेट आणि वेगाने पोहोचणार आहे. सध्या या योजनेबाबत जनजागृतीसाठी सोशल मीडियासह विविध माध्यमांचा वापर केला जात आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि पशुसंवर्धन विभाग संयुक्तपणे माहिती प्रसारित करत आहेत. लवकरच योजनेची सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जाहीर होणार असून, अर्ज प्रक्रियेला सुरुवात होईल.

# वाढत्या उन्हामुळे बार्शीत पाणीटंचाईची भीती

## पाण्याचा टँकर अद्याप लाल फितीतच अडकला

## एक महिन्यापूर्वीच तालुका पातळीवर २३ गावांसाठी टंचाई आराखडा तयार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मे-**

बार्शी तालुक्यात एप्रिल महिन्याच्या शेवटी सातत्याने वाढत्या तापमानामुळे पाण्याची मागणी वाढत असली तरी ग्रामीण भागात सध्या मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, आगामी मे महिन्यात उन्हाची तीव्रता लक्षात घेता मागील महिन्यापूर्वीच प्रशासनाने २३ गावांसाठी टंचाई आराखडा तयार करुन जिल्हा परिषदेकडे पाठवला असूनही, अद्याप एकही पाणी टँकरची व्यवस्था झालेली नाही.



टंचाई आराखड्यात समाविष्ट असलेल्या भोयरे गावात गेल्या दीड महिन्यांपासून ग्रामपंचायत सदस्य दशरथ पप्पू टेकाळे हे स्वखर्चाने दिवसातून दोन वेळा टँकरने पाणीपुरवठा करत ग्रामस्थांची तहान मिटविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. एप्रिल अखेरपर्यंत वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणी वाढली तरी प्रशासनाकडून अद्याप कोणतीही हालचाल झालेली नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

टंचाई आराखड्यात बार्शी तालुक्यातील २३ गावांचा समावेश आहे. त्यापैकी ९ गावांत पाण्यासाठी विहीर आणि बोर अधिग्रहण करण्यात आले असून, तांबेवाडी येथे दोन ठिकाणी, तर रऊळगांव, खडकलगांव, शेलगांव (व्हळे), रस्तापूर, शेलगांव (मा), गोरमाळे-टोणेवाडी आणि काटेगांव येथे प्रत्येकी एक ठिकाणी अधिग्रहण झाले आहे. आवश्यकतेनुसार विहीर अधिग्रहण व लवकरच आवश्यक असलेल्या गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येईल.
**- मीनाक्षी रोंगे,** पंचायत समिती सभापती

जवळपास एक महिना पूर्वी तयार करून पाठवलेल्या टंचाई आराखड्यावर वरिष्ठ स्तरावरुन अद्याप कोणतीही प्रतिक्रिया किंवा टँकरची मंजुरी मिळाली नसल्याचे समजते. हे महिन्यात दिवसेंदिवस बिकट होत जाणाऱ्या पाण्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना जनतेत आहे. बार्शी तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांसाठी वरिष्ठ पातळीवरुन तात्काळ टँकर मंजुरी मिळावी अशी नागरिकांना अपेक्षा आहे. अन्यथा, वाढत्या उन्हामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने लालफितीत अडकलेला कारभार त्वरीत हाताळत प्रत्यक्ष कारवाईला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा आहे.

# खुपसंगीतील मोर मृत्यू प्रकरणी प्रशासनाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ६ मे-**

खुपसंगी (ता. मंगळवेढा) येथे राष्ट्रीय पक्षी मोराच्या संशयास्पद मृत्यूने परिसरात खळबळ उडाली आहे. मात्र प्रशासन मात्र अद्यापही गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे. घटना घडून बराच कालावधी लोटूनही ना ग्राम पंचायतीने अधिकृत नोंद घेतली, ना वनविभागाने घटनास्थळी भेट देऊन चौकशी सुरू केली. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

भीषण उष्णतेच्या लाटेमुळे आधीच हैराण झालेल्या वन्यजीवांना पाण्याचा व सावलीचा तीव्र अभाव भासत आहे. अशातच मोरासारख्या राष्ट्रीय पक्ष्याचा मृत्यू होणे ही केवळ नैसर्गिक घटना नाही. मानवी निष्काळजीपणाचे हे गंभीर उदाहरण असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. खुपसंगी परिसरात नैसर्गिक पाणवठे पूर्णतः आटले असून पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही ठोस व्यवस्था नाही. त्यातच वाढती वृक्षतोड आणि हरित आच्छादनात घट



यामुळे सावलीचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मोराचा मृत्यू होऊनही संबंधित यंत्रणांकडून कोणतीही तातडीची कारवाई केलेली नाही. घटनास्थळी पंचनामा नाही, वैद्यकीय तपासणी नाही, अगदी प्राथमिक अहवालही तयार केलेला नाही. त्यामुळे मृत्यूचे नेमके कारण अद्याप गूढच राहिले आहे. राष्ट्रीय पक्ष्याच्या मृत्यूबाबतही प्रशासन इतके उदासीन असेल, तर इतर वन्यजीवांचे काय होणार? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याअभावी पक्षी व प्राणी तडफडतात. वारंवार सूचना देऊनही कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जात नाहीत, अशी संतप्त भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त करत प्रशासनाच्या हलगर्जीपणावर टीका केली आहे.

**ग्रामस्थांच्या ठोस मागण्या**

मोराच्या मृत्यूची तात्काळ व सखोल चौकशी, जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई, गावात कायमस्वरूपी पाणवठ्यांची उभारणी, टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व संवर्धन मोहीम राबवावी आदी मागण्या ग्रामस्थांनी केल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, वाढते तापमान, पाण्याची तीव्र कमतरता आणि पर्यावरणीय असंतुलन यांचा एकत्रित परिणाम वन्यजीवांवर होत असून अशा घटना भविष्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, असा इशारा देण्यात येत आहे.

# ज्येष्ठ कवी, गीतकार माधव पवार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

ज्येष्ठ कवी आणि गीतकार माधव रामचंद्र पवार (वय ७१) यांचे बुधवारी, ६ मे २०२६ रोजी पहाटे ४ वाजता त्यांच्या राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या १२-१३ वर्षांपासून ते किडनीच्या आजाराने त्रस्त होते.

या अत्यंत कठीण काळात त्यांनी तब्बल १ हजार ६५० डायलिसिसचा टप्पा पूर्ण करून जीवनाशी झुंज दिली होती. त्यांच्या निधनाने सोलापूरच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी मोदी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. माधव पवार यांनी सोलापूरच्या डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात वरिष्ठ लिपिक म्हणून ३५ वर्षे सेवा बजावली. आपल्या कार्यकाळात त्यांनी भांडारपाल, कोषागार, ओपीडी, स्त्री व प्रसुती शास्त्र आणि नाटोमी अशा विविध विभागांमध्ये कार्यक्षमतेने काम पाहिले होते. ते ज्येष्ठ कवी आणि गीतकार रा. ना. पवार यांचे चिरंजीव होत.साहित्याची ओढ असलेल्या माधव पवार यांचे हे शुभशकुनांचे पक्षी आणि गरूडभरारी हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या काव्यप्रतिभेची दखल घेत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्यासह राज्यस्तरावरील २१ मानाच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. सोलापुरात संपन्न झालेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे 'स्वागत गीत' लिहिण्याचा बहुमान त्यांना मिळाला होता. अनेक विभागीय आणि अखिल भारतीय साहित्य संमेलनांमधील कवी संमेलने त्यांनी आपल्या कवितांनी गाजवली होती.



कवी माधव पवार यांनी लिहिलेली गीते महाराष्ट्रातील नामवंत गायकांनी गायली आहेत. त्यांच्या गीतांच्या अनेक ऑडिओ कॅसेट आणि सीडी प्रकाशित झाल्या आहेत. सुरेश वाडकर, स्वप्निल बांदोडकर, प्रल्हाद शिंदे, आनंद शिंदे, आदर्श शिंदे, शकुंतला जाधव, जगदीश गोरसे, सुरेखा पुणेकर, बेला सुलाखे यांसारख्या दिग्गज गायकांनी त्यांच्या शब्दांना स्वरसाज चढवला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनानंतर सोलापूरच्या साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

## सकारात्मक विचारांचा आणि ऊर्जेचा स्त्रोत गमावला

दैवजात प्रतिभेची शब्दसिद्धी लाभलेले कवीवर्य माधव पवार हे वैद्यकीय क्षेत्रासाठी जीवनजिद्दीचा चमत्कार होते.. सहसा ५० डायलिसिसच्यावर माणूस टिकत नाही. परंतु या देवमाणसाच्या ३००० पुढे डायलिसिस प्रक्रिया झाल्या होत्या. शब्दांइतकंच मृत्यूवरही जिवापाड प्रेम करणाऱ्या या अवलिया कवीला मृत्यूनेही खूप काळ जिवंत ठेवलं. साक्षात मृत्यूही यांना रोज म्हणत असावा, माधवा रे! अजून मला तुझ्या कविता ऐकायच्या आहेत. तू स्वांतसुखाय रहा. वेळ आली कि मी तुला सांगेन हो ! गेय कविता आणि मुक्तछंद या दोन्ही प्रकारांवर त्यांची हुकूमत होती.. सोलापूरचा एक तेजस्वी काव्यतारा निखळला, याचे दुःख होत असतानाच त्यांची कमालीची जिद्द कवितेइतकीच चिरंतन यादगार राहील.

**- दीपक कलढोणे**

शेवटी नियतीने जे करायचे तेच केले...विक्रमी डायलिसिस करावे लागूनही, त्यातच कोविड सारख्या जीवघेण्या आजाराशी तगडी लढत देऊन आपण इच्छाशक्तीच्या बळावर आजवर झुंज दिली. पण.... एक सकारात्मक विचारांचा आणि ऊर्जेचा स्रोत...समस्त कालारसिकांनी गमावला.

**-विवेक शिखापुरे**

साहित्याची कोणतीही मक्तेदारी न बाळगता माणसे जोडली आणि शब्दांची शेती केली. माधव पवार यांच्या कवितांमध्ये साधेपणा होता, कारण त्यांचा असा विश्वास होता की कविता ही ऐकणाऱ्याला सहज समजली पाहिजे. साहित्याची कोणतीही मक्तेदारी न बाळगता त्यांनी आयुष्यभर माणसे जोडली आणि शब्दांची शेती केली. शब्दांच्या मैफिलीत रंगणारा, मैतरांच्या गर्दीत रमणारा आणि वयाचे बंधने तोडून प्रत्येकाशी दिलखुलास मैत्री जपणारा आमचा लाडका 'अवलिया' कवी माधव पवार आज अनंतात विलीन झाला.

**- प्रथमेश बनसोडे**

## १६५० डायलिसिसचा टप्पा पूर्ण करणारा साहित्यिक हरपला

कवी माधव पवार यांच्या निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाले. गेल्या दहा वर्षापासून किडनीच्या आजाराने त्रस्त असलेले सोळाशे पन्नास वेळा डायलिसिस करून घेऊन साक्षात मृत्यूला थांबवलेला योद्धा कवी माधव पवार एक चांगला मित्र आमच्यातून हरपल्यामुळे सोलापूरचीच नव्हे संपूर्ण महाराष्ट्राची हानी झालेली आहे. त्यांनी त्यांचे वडील रा.ना पवार यांचा कवितेचा संपन्न वारसा पुढे नेला. कविता साधी असावी आणि सोपी असावी, हे त्यांचे ब्रीद वाक्य असायचे. सदा हसतमुख. प्रचंड ऊर्जा. सदैव आनंदी असणारे कवी. आज आपणास सोडून गेले ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- सुशीलकुमार शिंदे, माजी केंद्रीय मंत्री**

कविवर्य माधवजी...शेवटी नियतीने जे करायचे तेच केले... विक्रमी डायलिसिस करावे लागूनही, त्यातच कोविड सारख्या जीवघेण्या आजाराशी तगडी लढत देऊन आपण इच्छाशक्तीच्या बळावर आजवर झुंज दिली...पण.... एक सकारात्मक विचारांचा आणि ऊर्जेचा स्रोत...समस्त कालारसिकांनी गमावला...!

**उन्मेष शहाणे, शिवरंजनी परिवार, सोलापूर**

आज मन अत्यंत विदीर्ण झाले आहे. माझा जवळचा स्नेही, सोलापूरच्या साहित्य विश्वातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व आणि शब्दांचा जादूगार, कवी माधव पवार आज आपल्यातून निघून गेले. ही केवळ एका व्यक्तीची एक्झिट नाही, तर सोलापूरच्या सांस्कृतिक आकाशातील एक लखलखता तारा निखळला आहे. ही गरुडभरारी माझी, कोणी रोखू नका हो आता या त्यांच्याच ओळी आज सत्यात उतरल्या आहेत. त्यांच्या 'हे शुभशकुनांचे पक्षी' आणि 'गरूडभरारी' या संग्रहांनी मराठी साहित्यात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

**- पद्माकर मा. कुलकर्णी,**
अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर

सोलापूरचे ज्येष्ठ कवी माधव पवार यांचे आज बुधवार दिनांक ६ मे २०२६ रोजी पहाटे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि त्यांच्या कुटुंबियांना यावेळी धीर मिळो ही ईश चरणी प्रार्थना !

**-गिरीश दुनाखे, परिवार**
**आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा.**

आज मन अगदी पोकळ झालं आहे. शब्द असूनही शब्द सापडत नाहीत. सोलापूरच्या मातीतला एक जिंदादिल स्वर, एक जिवंत कविता कवी माधव पवार आज अनंतात विलीन झाले. काही माणसं फक्त भेटत नाहीत, ती आयुष्याचा भाग बनतात माधव तसेच होते. साकव कट्टावर त्यांची घेतलेली मुलाखत आजही डोळ्यांसमोर ताजी आहे. त्यांच्या बोलण्यातली सहजता, शब्दांमधली उब, आणि माणसांशी जोडणारी एक अद्भुत ताकद त्या एका भेटीतच मन जिंकलं होतं. नंतर माझ्या घरी झालेल्या कविसंमेलनाला त्यांनी अध्यक्ष म्हणून येऊन जेव्हा सगळ्या कवीमित्रांना आपलेसं केलं, तेव्हा कळलं हा माणूस फक्त कवी नाही, तो एक अनुभव आहे. आणि अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी त्यांच्या प्रकृतीची बातमी कळताच कवी जावेद शेख सोबत त्यांच्या घरी गेलो. त्या भेटीतल्या त्या तासभराच्या गप्पा आज आयुष्यभराची शिदोरी बनून राहिल्या आहेत. शरीराने ते खूप थकले होते पण शब्द मात्र अजूनही तितकेच जिवंत होते. त्यांनी त्यांच्या अनेक रचना ऐकवल्या प्रत्येक ओळीतून जीवनाशी चाललेली त्यांची झुंज जाणवत होती. पण त्या दिवशी एक वेगळीच गोष्ट मनाला भिडली. त्यांनी आग्रहाने एक गाणं लावायला सांगितलं पं. हृदयनाथ मंगेशकरांचं. गेले ते दिन गेले त्या गाण्याच्या स्वरांमध्ये ते हरवून गेले होते आणि आम्ही त्यांच्याकडे पाहत राहिलो. कदाचित ते शब्द नव्हते, ती त्यांची मनस्थिती होती एक कवी आपल्या अंतर्मनाशी बोलत होता. माधव पवार म्हणजे फक्त कविता नव्हती तो एक जिवंतपणा होता, एक जिद्द होती, एक माणुसकीची शाळा होती.

**- जगदीश पाटील**

## महत्वाचे...

### जाधव, पिता पुत्रांच्या सुंद्री वादनातून जगभर गुंजणार वंदे मातरम

**सोलापूर, दि. ६ मे-**

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय व आकाशवाणी अर्काईव्हच्या माध्यमातून वंदे मातरम राष्ट्रगीतास १५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे जाधव पिता-पुत्रांच्या सुंद्री वादनातून वंदे मातरमची धून वाजविण्यात येणार आहे. सोलापुरच्या दोन कलाकारांच्या माध्यमातून वंदे मातरम जगभर गुंजणार आहे. सोलापूरसाठी ही मोठी अभिम ानाची बाब ठरणार आहे. जाधव घराण्यातील पंडित भिमण्णा जाधव यांनी सुंद्रीवादनात जगभर कीर्ती मिळवली आहे. त्यांच्या पावलावर पाउल ठेवून त्यांचे चिरंजीव घराण्याचे ५ व्या पिढीचे प्रसारक मास्टर व्यंकटेशकुमार जाधव, कलाश्री जाधव हे देखील वडीलांकडून सुंद्री वादनाचे प्रशिक्षण घेत आहेत. सुंद्रीसम्राट सिद्राम जाधव परतडू तर पंडित चिदानंद जाधव यांचे ते नातू आहेत. दुर्मिळ कलाकार व आकाशवाणी केंद्राचे टॉपर्स यांना आमंत्रित करुन त्याच्या माध्यमातून वंदे मातरमची धुन सादर करण्यास भारत सरकार, प्रसार भारती आकाशवाणीतर्फे सांगितले आहे. पंडीत भिमण्णा जाधव व मास्टर व्यंकटेशकुमार यांचे सुंद्रीवादन आकाशवाणीच्या माध्यमातून देश तसेच जगभर गाजणार आहे. सुंद्री वाद्य वादनाचे ध्वनीमुद्रण करण्यासाठी पुणे आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी गौरव शिप्पी यांनी आमंत्रित केले आहे. वंदे मातरम धुनसाठी तबल्यावर प्रशांत पाठक यांनी साथ दिली आहे.





### पुण्यतिथी निमित्त छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. ६ मे-**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त डाळिंबी आड मैदान, शिंदे चौक येथे श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पद्माकर नाना काळे, राजन जाधव, बजरंग जाधव, अंबादास शेळके, प्रकाश ननवरे, अंबादास सपकाळ, सदाशिव पवार, कल्याण गव्हाणे, विजय पुकाळे, नागेश वडणे, सचिन स्वामी, देविदास बनसोडे, देविदास घुले, नामदेव पवार यांची उपस्थिती होती.

### राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ उत्सवाध्यक्षपदी मनीषा माने

**सोलापूर, दि. ६ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळाचा कारभार महिलांच्या हाती देत एक प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. महामंडळाच्या बैठकीत उत्सवाध्यक्षपदी मनीषा माने तर कार्याध्यक्षपदी किरण माशाळ यांची एकमताने निवड झाली. सातपुते व शशिकला कस्पटे यांची उपाध्यक्षपदी, नीता बघेल यांची सचिवपदी, बंडगर यांची सहसचिवपदी, निमिषा वाघमोडे यांची खजिनदारपदी निवड झाली. सुमन मुदलियार व रेवती मुदलियार यांची मार्गदर्शिका म्हणून निवड केली आहे. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१व्या जयंतीनिमित्त शहरात भव्य उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी शिवसेना नेते अर्जुन सलगर, महापालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे शेखर बंगाळे, प्रा. देवेंद्र मदने, उमेश कोळेकर, राज बंडगर, राम वाकसे, उमेश काळे, मनोज सलगर, डी. डी. पांढरे, केदार पुजारी, विनोद मोठे, अमर दुधाळ यांच्यासह अहिल्या भक्त उपस्थित होते.



मनीषा माने किरण माशाळ

# आरटीई प्रवेशात बोगस पत्त्यांचा पर्दाफाश

## ●७४ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द; आणखी कारवाईची शक्यता●

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मे -**

शासनाच्या शिक्षण विभागाकडून आरटीई २५ टक्के अंतर्गत २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेत घरापासून शाळेच्या अंतराचा नियम आहे. त्यामुळे निश्चित शाळेत आपल्या पाल्याला आर टी अंतर्गत प्रवेश मिळावा यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पालकांनी सोयीचे खोटे पत्ते नोंदवून प्रवेश मिळविल्याचे बाब उघड झाली आहे.

या अंतर्गत खोटे कागदपत्र सादर करून प्रवेश मिळवलेल्या ७४ विद्यार्थ्यांचे प्रवेश तालुकास्तरीय समितीकडून रद्द ठरविण्यात आले आहेत. जिल्ह्यातील २८५ शाळांत २ हजार ६७३ विद्यार्थ्यांना मिळणार ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती ही प्रक्रिया पूर्ण झाली असून आता अंतिम प्रवेशासाठी ८ मे अंतिम तारीख आहे. प्रवेश प्रक्रियेस अवघे अवघ्या दोन दिवसाचा कालावधी उरला असताना बोगस पत्त्याचे




प्रकरण पुढे आल्याने खोटी कागदपत्रे दाखल करून मिळवलेले प्रवेश रद्द करण्यात आले आहेत. याप्रकरणी तक्रारी प्राप्त होतच असल्याने अनेक प्रवेश रद्द होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**कंदलगाव येथे १५ पैकी १२ प्रवेश बोगस**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आरटीई अंतर्गत झालेले १५ पैकी १२ विद्यार्थ्यांचे प्रवेश खोटे पत्ते दाखवून झाल्याचे समोर आले आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवडण्यात आलेली २० जणांची समिती कागदपत्राची व स्थळाची पडताळणी करत आहे. त्यातून हे प्रवेश रद्द केले जात आहेत. या संदर्भात अंतिम अपिलीय अधिकारी हे प्राथमिक शिक्षणाधिकारी असून आज गुरुवार दि.७ मे रोजी आठ प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

**नियमानुसार कार्यवाही : शिक्षण अधिकारी शेख**

आरटीई अंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान पालकांनी प्रवेश मिळावा यासाठी आपल्या पाल्यांना संबंधित सोयीच्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी ज्या ठिकाणी राहत नाही अशा ठिकाणी राहत असल्याचे खोटे भाडे करार प्रमाणपत्र सादर केले आहेत. या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर समितीने त्या ठिकाणी प्रतेक्षात भेट दिली. त्या ठिकाणी ते राहत नसल्याचे उघड झाले आहे. असे प्रवेश तालुकास्तरीय समितीकडून रद्द पातळ ठरविण्यात आल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

# घरगुती बियाणांनाही ३ वर्षे पडतो चांगला उतारा : भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

घरच्या बियाणांची उगवण क्षमता विकतच्या बियाणांपेक्षा चांगली आढळली आहे, त्यासाठी कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बियाणांची उगवण क्षमताही तपासणी केली आहे. यामुळे आता शेतकरी बांधवांनी घरगुती बियाणांचा खरिपाच्या पेरणीसाठी सलग ३ वर्षे वापर केला तरी त्याचा चांगला उतारा पडतो, अशी माहिती जिल्हा अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

दरम्यान, आगामी खरिपाच्या पेरणीत गतवर्षीचे घरगुती सोयाबीन, मुग, उडीद व इतर कडधान्याचा वापर करावा, असेही त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे. प्रतिवर्षी खरिपाच्या पेरणीचे क्षेत्र वाढल्यास काही भागात दर्जे



दार बियाणांचा तुटवडा जाणवतो. आपल्या जिल्ह्यात असा बियाणांचा तुटवडा नाही मात्र घरगुती बियाणेही चांगले असताना शेतकरी विनाकारण महागडे बियाणे खरेदी करतात. शेतकरी बांधवांना विश्वास पटावा म्हणून आम्ही कृषी विभागाकडून घरगुती बियाणांची उगवण क्षमता तपासणी मोहीम जिल्हाभरात राबविली आहे आणि राबवित आहोत.

सर्वेक्षणानुसार, स्वतःच्या शेतातील सोयाबीन बियाणे जास्त उगवण क्षमता दर्शवतात. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी आपल्या शेतात आपल्याच घरातील सोयाबीन, मुग, उडीद ही बियाणे पेरणी करावीत, असा सल्ला भोसले यांनी दिला.

# पेट्रोल-डिझेल तुटवडा अफवांचे जिल्ह्यात फुटतेय पेव!

- **जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी घेतला आढावा**
- **अफवांवर विश्वास न ठेवण्याचे केले आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. ६) रोजी जिल्हयातील HPCL, BPCL, IOCL या तेल कंपन्यांच्या डेपो मॅनेजर व विक्री अधिकारी यांची आढावा बैठक घेवून सोलापूर जिल्हयामध्ये पेट्रोल/ डिझेल पुरवठा सुरळीत करणेकामी जिल्ह्यातील पेट्रोल/ डिझेल वितरणाबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. या बैठकीस सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी निलेश देठे व HPCL, BPCL, IOCL या तेल कंपन्यांचे डेपो मॅनेजर व विक्री अधिकारी उपस्थित होते.

सदर आढावा बैठकीमध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी सोलापूर जिल्हयामध्ये पेट्रोल/डिझेल पुरवठा सुरळीत करणेकामी उपस्थित या तेल कंपन्यांच्या डेपो मॅनेजर व विक्री अधिकारी यांना सविस्तर सूचना दिल्या. जिल्हयातील सर्व पेट्रोल/डिझेल पंपावर इंधन पुरवठा सुरळीतणे करणेकामी सर्व संबंधितांनी ग्रामीण पातळीवर आढावा घेवून इंधन पुरवठ्याबाबत सुक्ष्म नियोजन करून कोठेही इंधन तुटवडा




भासणार नाही तसेच कृत्रिम इंधन तुटवडा निर्माण होणार नाही याबाबत योग्य ती कार्यवाही करणेकामी सुचित केले. या तेल कंपन्यांच्या डेपो मॅनेजर व विक्री अधिकारी यांनी सोलापूर जिल्हयाकरीता पुरेसा पेट्रोल/डिझेल इंधन साठा उपलब्ध असलेबाबत तसेच कोठेही इंधन पुरवठा कमी पडणार नाही याकरीता आवश्यक ती कार्यवाही करीत असलेबाबत बैठकीमध्ये माहिती दिली.

तरी सोलापूर जिल्हयातील नागरीकांनी अफवावर विश्वास न ठेवता प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन संतोष सरडे जिल्हा पुरवठा अधिकारी सोलापूर यांनी केले.

### उत्तर तालुक्यात उद्यापासून महाराजस्व अभियान सुरू

**सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये एकूण ९ महसूल मंडळे असून, यामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज म हाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.0१ चे आयोजन केले आहे. हे अभियान शुक्रवार दि. ८ मे रोजी मजरेवाडी व सोलापूर येथे शुक्रवार, दि.१५ मे रोजी होणार आहे. यामुळे सर्व नागरिक, शेतकरी, विद्यार्थ्यांना श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात विविध प्रकारचे महसूली दाखले, पुरवठा कार्यालयाशी संबंधित दाखले, इतर विभागाशी संबंधित योजना व दाखले यांच्या सुविधेबाबत माहिती देणार आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता संबंधित विभागात करावी, असे आवहन तालुका प्रशासनाकडून केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित विभाग व तहसिल कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन तहसिलदार निलेश पाटील यांनी केले.

# एसटीच्या एनसीएमसी कार्डची जादा दराने विक्री केल्यास परवाना रद्द

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०६ मे-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने सवलतधारक प्रवाशांना एनसीएमसी (National Common Mobility Card) स्मार्ट कार्डचे वितरण सुरू करण्यात आले आहे. यासाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्येक आगार व प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



नवीन एनसीएमसी कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. यानुसार, काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. दरम्यान, एसटी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने देण्यासाठी एनसीएमसी कार्ड कार्यप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून, टप्प्याटप्प्याने इतर सवलतधारक प्रवाशांचाही या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. महामंडळाच्या सूचनेनुसार, लवकरच सर्व सवलतधारक प्रवाशांसाठी एसटी प्रवासादरम्यान छउचउ कार्ड वापरणे अनिवार्य केले जाणार आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुलभ होण्याबरोबरच सवलतींचा लाभ अचूक आणि डिजिटल पद्धतीने देणे शक्य होणार आहे. तसेच, NCMC कार्डद्वारे तिकीट वितरण, कार्ड टॉप-अप आणि इतर व्यवहारांसाठी एकसंध मानक कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. सर्व आगार व्यवस्थापकांना ही कार्यपद्धती काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

# कासेगावचे १५० भाविक अयोध्या वारीसाठी रवाना

## 'जय श्रीराम'च्या जयघोषाने सोलापूर रेल्वे स्थानक दुमदुमले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील सुमारे १५० भाविकांचा जत्था आज अयोध्येत आयोजित नाम सप्ताह आणि रामकथेसाठी सोलापूर रेल्वे स्थानकावरून उत्साहात रवाना झाला. यावेळी भाविकांनी केलेल्या 'जय श्रीराम'च्या जयघोषाने संपूर्ण रेल्वे स्थानक परिसर भक्तीमय झाला होता.

जगद्गुरु श्रीसंत तुकारामांचे वंशज श्रीगुरु सोपानकाका देहुकर, तुकारामबुवा चौगुले व हभप मधुकर महाराज जोशी यांच्या कृपाशीर्वादाने, श्रीसंत तुकारामांचे विद्यमान वंशज श्रीगुरु बापूसाहेब आण्णा



देहूकर व श्रीगुरु कान्होबा नाना देहूकर यांच्या मार्गदर्शनाखाली कासेगाव व उळे येथील भाविकांच्या उपस्थितीत अयोध्या येथे ९ ते १२ मे दरम्यान रामकथा व नामसंकीर्तन महोत्सव आहे.

कासेगावचे आत्माराम चौगुले, आप्पाराव व सुनिल चौगुले यांनी या संकीर्तन सोहळ्याचे आयोजन केले आहे. जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे माजी संचालक शंकर येणगुरे, एसबीआयचे निवृत्त मंडल अधिकारी रामदास वाडकर, कारसेवक श्याम जोशी, ग्रामपंचायत सदस्या सोनाली वाडकर, सुरेखा चौगुले, आप्पा चौगुले, सुनील चौगुले, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष रामहरी चौगुले, कर्देहळ्ळीचे ग्रामपंचायत सदस्य विलास पवार, डॉ.समाधान अंबुरे, सुधाकर शिंदे, हभप सागर महाराज सुतार, हभप धनंजय महाराज गुंड, मल्लिनाथ येणगुरे, हणमंत काळे, कारसेवक अंकुश म्हेत्रे, पांडूरंग माळी, तानाजी हेडे, विठ्ठल येणगुरे, लक्ष्मण वाडकर, हरिदास वाडकर, गणपत गुंड, संग्राम जाधव, श्रीशैल येणगुरे, ओंकार येणगुरे, राम चौगुले, भरत पवार, कारसेवक ज्ञानेश्वर महाराज चव्हाण आदी उपस्थित होते.

प्रभू रामाच्या जयघोषामुळे वातावरणात एक वेगळीच चैतन्यशक्ती संचारली होती.

# जिल्ह्यात १५९० रुग्णांना १२.८६ कोटींची मदत

## ●मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती; पात्र व गरजू रुग्णांना मिळाला लाभ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांम धून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. सोलापूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील म दत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींचे सहकार्य लाभत आहे.

> “संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांमुळे सोलापूर जिल्ह्यातील अनेक गरजू व पात्र रुग्णांना वेळेत वैद्यकीय आर्थिक सहाय्य मिळत आहे. गरजू रुग्णांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
>
> **- रामेश्वर नाईक**
> कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी आर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**गत आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख ६ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली.



# श्री बृहन्मठ होटगी मठात ज्योतिष, रुद्र व पौरोहित्य शिबिरास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

श्री बृहन्मठ होटगी संचलित श्रीमद् वीरशैव गुरुकुलच्या वतीने जंगम बटूंसाठी रुद्र अध्ययन, पौरोहित्य, ज्योतिष शिबिरास काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून उत्साहात व भक्तीभावाने प्रारंभ करण्यात आला.

यावेळी नागणसूर मठाचे श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. काशी जगद्गुरु म्हणाले, या शिबिरामुळे जंगम बटूंच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या माध्यमातून पारंपारिक ज्ञान व संस्कृती जपण्याचे कार्य प्रभावीपणे पुढे जाणार असल्याचे सांगून जगद्गुरु नी विविध कला व ज्ञान आत्मसात करण्याचे आव्हान केले.

नागणसूर महास्वामीजी म्हणाले, सम ाज उभारणीसाठी विद्या आवश्यक असून जंगम बटूंनी या शिबिराचा लाभ घेण्याचे सांगून या विद्येचे महत्त्व स्पष्ट केले. आपल्या प्रास्ताविकेतून संस्थेचे सचिव शांतया स्वामी यांनी शिबिराचे महत्त्व व जंगम बटूंचे जडणघडण याची भूमिका स्पष्ट केली. महिनाभर चालणाऱ्या या शिबिराम ध्ये जंगम भटूंना रुद्र अध्ययन, पौरोहित्य विधी, ज्योतिषशास्त्र, प्रवचन कौशल्य, संबळ वादन, योग अभ्यास यासारख्या विविध कलांचे प्रशिक्षण दिले जाते. या शिबिरात महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेश येथील जंगम बटू मोठ्या संख्येने सहभागी झालेले आहेत.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री, सिद्धया हल्लाळी स्वामी,प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी, सागर स्वामी, पंडित स्वामी, संदीप स्वामी, जगन्नाथ शास्त्री, महांतेश शास्त्री, यमनप्पा होटगोंड, ओंकार मुंडे, भुवनेश्वर म्हेत्री आदि परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमास जंगम बटू व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांतू स्वामी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केल. संदीप स्वामी यांनी आभार मानले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



## महत्वाचे...

### कचरा डेपोतील आग कुलिंग ऑपरेशनद्वारे आटोक्यात

**सोलापूर, दि.६ मे-**

तुळजापूर रोडवरील कचरा डेपोतील दोन मोठ्या ढिगाऱ्यांना लागलेली आग दुसऱ्या दिवशी आटोक्यात आली आहे. ही आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाने कुलिंग ऑपरेशन करण्यात आले. दरम्यान, आणखी दोन दिवस हे ऑपरेशन सुरू ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका अग्निशमन विभागाचे अधीक्षक राकेश साळुंखे यांनी दिली. सोमवार, दि. ४ मे रोजी दुपारी ४.२२ वाजता ही आग लागली होती. वाढत्या तापमानामुळे आणि अतिउष्णतेमुळे ही आग लागल्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली. अग्निशमन दलाच्या ५ गाड्याच्या साह्याने आग विझवण्यासाठी जवानांनी प्रयत्न केले. मंगळवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ६० गाड्या पाणी मारून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले.

### गाई व वासरू नेताना अपघात; जनावरांसह तिघे जखमी

**सोलापूर, दि. ६ मे-**

जनावरे भरून घेऊन जाताना वाहनाला अपघात करून जनावरांसह तिघेजण जखमी झाले. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तिघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बालाजी अष्ठुल, मौला अरमान कुरेशी आणि सोहेल करीम शेख (सर्व रा. सोलापूर )असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाणेचे पोलीस शिपाई कर्चे यांनी फिर्याद दिली आहे. वरील आरोपीं हे चारचाकी वाहन (क्रं. एम एच २४ ए एफ ९७९८) मधून दोन खीलार जातीचे गायी व एक वासरु घेवून जात असताना ५ में रोजी पहाटे पावणे एकच्या सुमारास जुना पुना नाका येथे सदरचे वाहन बोगदया पुढील माती व दगडाच्या चढावर जावून धडकला. यात आरोपी स्वतः व जनावरास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार वाघमारे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### माहेरून ३ लाख रुपये घेवून ये म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ६ मे-**

लग्नामध्ये मानपान केला नाही, सोने-पैसे दिले नाही तसेच चारित्र्यावर संशय घेऊन माहेरून घर दुरुस्तीसाठी तीन लाख रुपये आण म्हणून विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह तिघांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमृत-पती, सुनंदा सासु, शशिकांत सासरे (रा. ई ४३, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत गोदावरी अमृत बेनगिरी (रा. ३२ ए, श्रीराम नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी गोदावरी या दि.१ ऑगस्ट २०१७ ते दि. २२ मे २०२४ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी फिर्यादीस संसारउपयोगी सामान दिले नाही, सोने, पैसे दिले नाही, योग्य मानपान केला नाही, तसेच घरातील किरकोळ कारणावरुन घालुन पाडुन बोलून अपमानीत करुन शिवीगाळ केली आहे व चारित्र्यावर संशय घेवून घर दुरुस्तीसाठी माहेरून ३ लाख रुपये घेवून ये म्हणून मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देवून शारीरीक, मानसिक छळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार डोके हे करीत आहेत.



### पैसे आणण्यावरून विवाहितेस माहेरी हाकलून दिले

**सोलापूर, दि. ६ मे-**

घर घेण्यासाठी आजीचे शेत विक्री केल्याचे चार लाख रुपये आन म्हणून सासरी छळ करून विवाहितेस माहेरी हाकलून दिल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बाजार पोलिसा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिशान पती, मुमताज सासु, जस्मीन ननंद, मेहजबीन-ननंद, हिना- ननंद, नेहा इम्रान शेख, (सर्व रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत परविन जिशान शेख (रा. ११२, कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) हिने फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी परविन शेख ही २ में २०२० रोजी पासुन ते २१ जानेवारी २०२६ सासरी नांदत असताना वरील आरोपींनी फिर्यादीस वेळोवेळी अपमानित करून, आजीच्या शेतीच्या पैशातून घर घेण्यासाठी चार लाख घेवून ये म्हणून मानसिक, शारीरीक, त्रास देवून मारहाण करुन माहेरी हाकलून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार ईनामदार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# डॉक्टरच्या निष्काळजीपणामुळे रुग्णाचा मृत्यू

## उपळाईत २० वर्षे 'डॉक्टर' बनून फसवणूक करणाऱ्या शंकर पाठकवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/बार्शी, दि. ६ मे-**

बार्शी तालुक्यातील उपळाई (ठोंगे) येथे विनापरवाना व अप्रमाणित वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या शंकर मनोहर पाठक यांच्याकडून झालेल्या अयोग्य उपचारांमुळे तानाजी नरहरी सुतार (वय ५८) यांचा मृत्यू झाला आहे. संबंधित बोगस डॉक्टरने केलेल्या चुकीच्या उपचारांमुळे तानाजी सुतार यांची प्रकृती अधिकच खालावली होती. योग्य व प्रमाणित वैद्यकीय उपचार न मिळाल्याने अखेर त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी संबंधितावर तातडीने व कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

उपळाई (ठोंगे) येथे तब्बल दोन दशकांपासून बोगस डॉक्टर बनून रुग्णांवर उपचार करणाऱ्या शंकर पाठक याचा अखेर भांडाफोड झाला असून आरोग्य विभागाच्या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. कोणतीही वैद्यकीय पदवी नसतानाही ॲलोपॅथी उपचार करून रुग्णांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, पानगाव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश पाटील यांच्या फिर्यादीनुसार, बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी शंकर पाठक यांच्यावर वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ व औषधिद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम १९४० अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस उप निरीक्षक दिलीप ढेरे हे करत आहे.

एआय ईमेज




**विना परवाना डॉक्टरांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर :** या घटनेमुळे ग्रामीण भागात बिनपरवाना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा बोगस डॉक्टरांमुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ होत असल्याचे चित्र समोर येत असून प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवण्याची मागणी जोर धरत आहे. बोगस डॉक्टरवरील कारवाईमुळे जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांविरोधात मोठी मोहीम सुरू होण्याचे संकेत मिळत असून प्रशासनाने अशा प्रकारांविरुद्ध कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांनीही उपचारासाठी अधिकृत व नोंदणीकृत डॉक्टरांचीच निवड करावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

**पदवी नसतानाही ॲलोपॅथी उपचार; मोठ्या प्रमाणावर औषधसाठा जप्त**

तालुका आरोग्य अधिकारी यांच्या आदेशानुसार ५ मे रोजी उपळाई (ठोंगे) येथे छापेमार कारवाई करण्यात आली. यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, पंच व पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणाची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान शंकर पाठक यांच्याकडे वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक कोणतीही अधिकृत पदवी किंवा परवाना नसल्याचे त्यांनी स्वतः पंचासमक्ष कबूल केले. तरीही ते 'डॉ. एस. एम. पाठक (बी.ए.एम.एस.)' या नावाने लेटरपॅड वापरत रुग्णांवर उपचार करत असल्याचे उघड झाले. यामुळे हा प्रकार बोगस वैद्यकीय व्यवसाय नसून नागरिकांची फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले आहे.



मृत तानाजी सुतार

सदर ठिकाणी दोन खोल्यांमध्ये रुग्णांना ठेवण्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती. तपासणीदरम्यान स्टेथोस्कोप, बीपी मशीन, थर्मामीटर, बेड, सिरींज, इंजेक्शन तसेच विविध प्रकारच्या औषधांचा मोठा साठा आढळून आला. यामध्ये विविध प्रकारच्या ॲलोपॅथी इंजेक्शनचा समावेश होता. तसेच सलाईन बाटल्या, गोळ्या, आयड्रॉप्स आणि वापरलेल्या वैद्यकीय साहित्याचाही मोठा साठा जप्त करण्यात आला.

या सर्व साहित्याचा पंचनामा करून ते जप्त करण्यात आले असून संबंधित ठिकाण सील करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, शंकर पाठक हे सुमारे २० वर्षांपासून या ठिकाणी वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे समोर आले आहे. यामुळे इतक्या दीर्घ काळ हा प्रकार कसा सुरू राहिला, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांविरोधात मोठी मोहीम सुरू होण्याचे संकेत मिळत असून, येत्या काळात अशा प्रकारांवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


> **आरोग्याशी तडजोड नाहीच**
>
> जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपरवाड व संबंधित यंत्रणेसोबत तातडीची बैठक बोलावून परिस्थितीचा आढावा घेतला असून जिल्ह्यात विनापरवाना व बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध व्यापक आणि समन्वित मोहीम राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. अशा प्रकारच्या अनधिकृत वैद्यकीय व्यवसायामुळे निष्पाप लोकांचे जीव धोक्यात येत आहेत. त्यामुळे संबंधितांवर तात्काळ व कठोर कारवाई करून अशा प्रवृत्तीला आळा घालणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी 'शून्य सहनशीलता' धोरण अवलंबण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
>
> **- दीपक वैद्य**
> जिल्हा परिषद अध्यक्ष

## आभाळी वातावरणामुळे तापमानात २ अंशांनी घट

**दुपारच्या उन्हाचा तडाखा मात्र कायम**

**सोलापूर, दि. ६ मे-**

सोलापूरमध्ये उष्णतेचा तडाखा जाणवत असून, दुपारनंतर आभाळी वातावरण निर्माण झाल्याने तापमानात मात्र २ अंशांनी बदल झाला आहे. आजचे कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअस इतके होते. गेल्या ८ दिवसांत ४० ते ४२ पर्यंतच तापमानाचा पारा दिसून येत आहे. एप्रिलमध्ये मात्र ४३ अंशाच्या पुढे तापमानाचा पारा चढला होता. यामुळे मे महिन्यात ४४ च्या घरात तापमाण जाण्याची भीती हवामान विभागाकडून व्यक्त केली होती.




आज दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र आणि सूर्यप्रकाशित होते. दुपारच्या सत्रात उन्हाचा तडाखा असल्याने अनेकांनी घराबाहेर न पडणेच पसंद केले. दुपारनंतर आभाळी वातावरण तयार झाले आणि उन्हाचा पाराही कमी-कमी होत गेला. १ मे ते आजतागायत ४० अंश ते ४२ अंशापर्यंत तापमान होते. उन्हाच्या तीव्र झळा जाणवत असल्याने काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. जिल्ह्याभरात आज आभाळी वातावरण होते.

दरम्यान, येत्या ७ ते ८ मे दरम्यान काही अंशी ढगाळ वातावरण किंवा हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गतवर्षीही १५ मेपासून मुसळधार पाऊस सोलापूर जिल्ह्यासह अवघ्या राज्यात झाला होता. यामुळे यंदाही मे महिन्यात पाऊस सुरू होतो की काय? असा प्रश्न शेतकरी बांधवांना पडला आहे. गतवर्षी पावसाने सर्वांचेच अंदाज फोल ठरवित अतिवृष्टी, महापुराचा दणका दिला होता.



## वाढत्या गॅस दरवाढीविरोधात उद्धव सेनेचे चूलपेटो आंदोलन; महागाईविरोधात संताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे -**

घरगुती तसेच व्यावसायिक एलपीजी गॅसच्या दरवाढीविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोख्या पद्धतीने 'चूलपेटो' आंदोलन करण्यात आले. वाढत्या गॅस दरामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक ताण वाढत असून महागाईचा फटका बसत असल्याचा आरोप करत या आंदोलनातून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी प्रतीकात्मक चूल पेटवून भाकरी थापत सरकारच्या धोरणांवर नाराजी व्यक्त केली. थापलेल्या भाकऱ्या केंद्र सरकारला सुपूर्द करण्यात येणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. यावेळी उद्धव सेनेचे जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण यांनीही सरकारवर निशाणा साधत म्हटले, निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला जातो आणि तोच पैसा महागाईच्या माध्यमातून जनतेकडून वसूल केला जात आहे.

**भाकरी थापून नोंदवला निषेध**

जिल्हा प्रमुख शरणराज केंगनाळकर यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका करत, सध्याचे सरकार सर्वसामान्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असून त्यांचे राजकारण फक्त सत्तेसाठी आहे, असे म्हटले. महानगरप्रमुख महेश धाराशिवकर म्हणाले सरकारकडून केवळ दिखाऊ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे.

या आंदोलनात महिला पदाधिकारी स्वाती रूपनर, प्रभावती यलगुंडे, उपजिल्हाप्रमुख दत्ता गणेशकर, जिल्हा संघटक मंगल थोरात, लोकसभा प्रमुख संजय पोळ, राजा कुसेकर, दत्ता माने, कृष्णा सुरवसे, शिवा माळी, सुशील उपलप, तुषार खंदारे, विद्या घोडके सहभागी झाले होते.

### उन्हाळी सुट्ट्यासाठी पुण्याहून सोलापूरला आलेल्या

## मुलीचा विनयभंग; आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

शाळेला सुट्ट्या पडल्याने पुण्याहून सोलापूरला नातेवाईकाकडे आलेल्या एका १४ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना शहरात सोमवारी संध्याकाळी साडेसात वाजता घडली.

फुलचंद घाटांगळे (रा.सोलापूर) असे त्या आरोपीचे नाव असून याबाबत जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित मुलीच्या चुलत बहिणीने फिर्याद दाखल केली आहे. ४ मे रोजी रात्री पीडित मुलगी ही घरासमोरील अंगणात खेळत होती. तेव्हा दारूच्या नशेत आलेला फुलचंद तिच्याशी अश्लील कृत्य करीत होता. मुलगी जोरजोरात ओरडत असताना आजूबाजूचे लोक जमा झाले. त्यानंतर त्याला पकडून ठेवले. जोडभावी पेठ पोलिसांना घटनेची खबर देण्यात आली. घटनास्थळी पोलिस येताच नागरिकांनी पकडून ठेवलेल्या त्या आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिले. गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.



## नरेंद्र काळे मित्र परिवारातर्फे आज सामुदायिक विवाह सोहळा; १० जोडप्यांच्या रेशीमगाठी बांधणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त नरेंद्र काळे मित्र परिवारातर्फे आज (गुरुवारी) सायंकाळी ६.३० वाजता गोरज मुहूर्तावर जुळे सोलापुरातील टाकळीकर मंगल कार्यालयात सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सोलापूर महापालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात १० जोडप्यांचे विवाह होणार आहेत. गुरुवारी टाकळीकर मंगल कार्यालयात दिवसभर विवाहाचे विधी होणार आहेत. तर सायंकाळी ६.३० वाजता गोरज मुहूर्तावर अक्षता सोहळा होणार आहे. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, आ. समाधान आवताडे, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.




या सामुदायिक विवाह सोहळ्यातील जोडप्यांना सफारी, शालू, मणी मंगळसूत्र, जोडवे, चप्पल, बूट, संसारोपयोगी भांडी, पुस्तके देण्यात येणार आहेत. सायंकाळी नवविवाहित जोडप्यांची जुळे सोलापूर परिसरातून वरातही काढण्यात येणार आहे.

तसेच सोबत येणाऱ्या वऱ्हाडी मंडळीकरिता सुग्रास भोजनाची सोय करण्यात आली आहे, असेही सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी सांगितले. या विवाह सोहळ्यात वधू वरांना आशीर्वाद देण्यासाठी सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन यावेळी सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी केले.



सोलापूर : अक्कलकोट रोडवरील इस्कॉन मंदिरात श्री राधा दामोदर मंदिरात बुधवारी सकाळी चंदन उटी लावून १५०० आंब्यांची आरास करण्यात आली होती. (छायाचित्र : केवल तिवारी)

## भाजपा प्रदेश सहसंयोजकपदी सोलापूरचे विक्रम देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश पक्षसंघटन कार्यविस्तारासाठी विभागस्तरावर समन्वयक, संयोजक आणि सहसंयोजक यांची नियुक्ती करण्यात येत आहे. येत्या काळात पक्ष समन्वय तसेच सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पदाधिकारी यांच्यावर राहणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली. यामध्ये प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्यावर भाजपा मुंबई समन्वयक, प्रदेश कार्यालय समन्वयकही जबाबदारी दिली आहे.



तर ठाणे-कोकणसाठी प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर यांच्यावर समन्वयक, आ. प्रमोद जठार-संयोजक, संजय वाघुले-सहसंयोजन, प्रदेश पश्चिम महाराष्ट्रासाठी प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे-समन्वयक, विक्रम पावसकर-संयोजक, विक्रम देशमुख-सहसंयोजक. उत्तर महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आ. माधवी नाईक-समन्वयक, विजय चौधरी-सयोजक, प्रदेश सरचिटणीस आ. मंगेश चव्हाण-सहसंयोजक. मराठवाडा-प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे-समन्वयक, ॲड. नितीन काळे-संयोजक, राहूल लोणीकर-सहसंयोजक. विदर्भ-प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे-समन्वयक, प्रा. दिनेश सुर्यवंशी-संयोजक तर आ.प्रविण दटके यांच्यावर सहसंयोजक पदाची जबाबदारी दिली आहे. दरम्यान, ही नियुक्ती तत्काळ लागू करण्यात येत असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली. भाजप महाराष्ट्र प्रदेश संघटनेत मोठे फेरबदल करत विभागीय स्तरावर नवीन समन्वयक, संयोजक आणि सहसंयोजकांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष बळकट करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या नियुक्त्या केल्या आहेत. विभागीय फेरबदल केल्याचेही यातून दिसून येत आहे. संघटनात्मक बळकटीकरण, निवडणुकांसाठी बूथ पातळीपर्यंत समन्वय आणि पक्षाच्या विविध कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा या नियुक्तीचा मुख्य उद्देश आहे. यापूर्वी फेब्रुवारी २०२६ मध्ये जाहीर झालेल्या नवीन कार्यकारिणीनुसार, नवनाथ बन यांना मुख्य प्रवक्ते, तर केशव उपाध्ये आणि चित्रा वाघ यांना उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती.

भाजप २०२६ च्या अखेरीस महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये स्वतःची कार्यालये स्थापन करण्याचे लक्ष ठेवून आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले होते. त्या अनुषंगाने संघटनात्मक नियुक्त्या करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत


https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४३३

**सेना म्हणे करणी तैसेचि भोगावे । तेथे केशव दूर राहे ।।**

जे पेरले तेच उगवणार किंवा एका हाताने करावे आणि दुस-या हाताने भरावे, हा निसर्गाचा नियम आहे. या नियमाला कोणीही अपवाद असत नाही. अर्थात, चांगले वागले तर त्याचे परीणामही चांगले होतात आणि वाईट वागले तर विपरीत परीणामाला सामोरे जावे लागते. माणसाला वाटते की, माझी चूक झाकून राहिली तर त्या चुकीचा विपरीत परीणाम भोगण्याचे कारण असणार नाही. पण असे होत नाही. अयोग्य कृती किंवा चुका हया झाकून गेल्या तरी त्याचा विपरीत परीणाम हा होणारच असतो. विपरीत परीणामाला वेळ लागेल; पण कालांतराने का होईना त्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. माणूस बहुतांश चुका हया तारुण्यात करतो. इंदियांना ताब्यात न ठेवता मनाधिन होऊन इंदियांचे लळे पुरवतो. तारुण्य संपू लागले की तारुण्यातील भोगाचे विपरीत परीणाम सुरू होतात. विपरीत परीणामाला तोंड देताना भय, चिंता, तणाव, अशांती, मनाची अस्थिरता वेगाने वाढू लागते. अशा विपरीत अवस्थेत जगणारा माणूस मन:पूर्वक केशवाची आठवण करणे शक्यच नसते. ज्याला केशवाची आठवण येत नाही, त्याची केशवही आठवण करीत नाही. अर्थात, सेना म्हणे करणी तैसेचि भोगावे । तेथे केशव दूर राहे ।।, या वचनांप्रमाणे केशव त्याच्यापासून दूर राहतो, असे सेना महाराज सांगतात.



सर्व संत महात्म्यांनी चांगले वागायला सांगीतले आहे. चुकीचे वागले तर परिणाम कसे भोगावे लागतात हेही सांगीतले आहे. बुध्दीजीवी माणूस फार अवघड आहे. तो माझे काहीच होत नाही किंवा मी भोगाला जुमानत नाही, अशा अविर्भावात वागत राहतो. माणसाने दुष्कृत्याला आणि त्याच्या परिणामाला घाबरले पाहीजे. भोग हे ज्याचे त्यालाच भोगावे लागतात. वाल्याचा महर्षि वाल्मिक होऊ शकतो तर आपण चांगले होणार नाही का? आपण वाईटच असले पाहीजे मग चांगले व्हावे असे नाही तर चांगले असणा-यांनी चांगुलपण टिकून राहण्यासाठी आपल्या वर्तनाकडे लक्ष दिले पाहीजे. कारण कर्माचे भोग कोणालाही चुकत नाही. श्री ज्ञानेश्वर माऊली या अनुषंगाने, केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसे । न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना ।।, असे म्हणतात. कर्ज फेडल्याशिवाय फिटत नाही तसे भोग भोगल्याशिवाय संपत नाहीत. वाईट व चुकीचे वागणा-यांनी संतांच्या म्हणण्याप्रमाणे भगवंतानी मदत करावी अशी अपेक्षा करण्यात काय अर्थ? आपण चांगले वागत असू तर भगवंताच्या कृपेची वेगळयाने अपेक्षा करण्याची गरज पडत नाही. आपले चांगले वर्तन, आपली कर्तव्यपूर्ती तसेच आपले चांगले कर्म हाच भगवंत असतो. चांगले वागणे हाच आनंदाचा तसेच भक्तीचा आधारस्तंभ होय, यांत शंका नसावी. जय जय राम कृष्ण हरी ।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार,
दि. ७ मे २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख, कृ. चतुर्थी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पूर्वषाढा (१८.४४)
योग - साध्य (२५.५८)
करण - गरज (२३.१९)
राहू काल : गुरुवार
१.३० ते ३.००

दिनविशेष :
१८४९: जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कोलकाता येथे कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.
१८६१: पहिले भारतीय नोबेल पुरस्कार विजेते रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म झाला.
मुंबईत विजेवर चालणारी पहिली ट्रॅम सुरू झाली.
पहिल्या महायुद्धादरम्यान, अमेरिकेने ऑस्ट्रिया-हंगेरीविरुद्ध युद्ध घोषित केले.

## डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कार साहित्यिक डॉ. रणधीर शिंदे यांना जाहीर

### शनिवारी होणार पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा सोलापूर व शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कार २०२६ यंदा समीक्षक-साहित्यिक डॉ. रणधीर शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली हे सोलापूरातील बहुआयामी साहित्यिक म्हणून ओळखले जात होते. त्यांनी मराठी भाषेत कथा, कविता, नाटक, कादंबरी, आत्मकथन तसेच अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दरवर्षी प्रदान केला जातो. यंदाचा पुरस्कार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे मराठी विभाग प्रमुख तथा साहित्यिक डॉ. रणधीर शिंदे यांना देण्यात येणार आहे. रोख रक्कम ११ हजार रुपये, सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा कार्यक्रम शनिवार दि. ९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हिराचंद वाचनालय, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रुती वडगबाळकर राहणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, मसाज पुण्याचे कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून शेठ लोणकरजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टचे विश्वस्त किशोर चंडक, उपाध्यक्ष दत्ता सुरवसे, मसाप मुख्य कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यावर निवड झालेल्या तीन जणांचा सत्कार करण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातून निवड झालेल्या पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे आणि डॉ. श्रुती वडगबाळकर यांचाही सन्मान होणार आहे. सर्व साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस कार्याध्यक्ष किशोर चंडक, फैय्याज शेख आदी उपस्थित होते.

# ‘समृध्द पंचायत राज’अभियानाला वेग

### ‘लातूर’चे सोलापुरात तर ‘सोलापूर’च्या पथकाकडून बीड जिल्ह्यात मूल्यांकन

### १५ मेपर्यंत करणार २१० गावांचे मूल्यांकन

**उत्कृष्ट कामगिरीसाठी चुरस वाढली**

‘समृध्द पंचायत राज’ अभियानामुळे ग्रामीण विकासाच्या कामांना गती मिळत असून, पारदर्शक आणि स्पर्धात्मक वातावरणात गावांच्या प्रगतीला नवा आयाम मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यभरात एकूण १९०२ पुरस्कार वितरित केले जाणार आहेत. त्यासाठी २४५.२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या ग्रामपंचायतीस ५ कोटी, पंचायत समितीस २ कोटी आणि जिल्हा परिषदेस ५ कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींमध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी चुरस वाढली आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान’ अंतर्गत राज्यभरात ग्रामविकासाच्या कामांचे मूल्यमापन आता युद्धपातळीवर सुरू झाले असून, सोलापूर आणि लातूर जिल्ह्यांतील पथके गावागावांत फिरून पाहणी करत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील पथके बीड जिल्ह्यात पोहोचली असून, तेथील सुमारे २० टक्के गावांचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून ग्रामीण भागात शाश्वत विकास साधणे हा उद्देश आहे. लातूर जिल्ह्यातील अधिकारी सोलापूरमध्ये दाखल होऊन ग्रामपंचायतींच्या कामांची तपासणी करत आहेत. प्रत्यक्ष पाहणीद्वारे कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. तालुका, जिल्हा, विभागीय, राज्य स्तरावर ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पार पडणार आहे. मे अखेरपर्यंत अंतिम निवड होणार आहे. सोलापूर जिल्ह्यात एकूण २१० ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग नोंदवून स्वमूल्यांकन पूर्ण केले आहे.

आता विभागीय पथकाद्वारे या सर्व गावांचे प्रत्यक्ष मूल्यांकन १५ मे पर्यंत पूर्ण केले जाणार आहे. या पथकात प्रत्येकी पाच सदस्यांचा समावेश असून, त्यात गटविकास अधिकारी, दोन विस्तार अधिकारी, तालुका व्यवस्थापक आणि पत्रकाराचा समावेश आहे.

## २४५ कोटींच्या बक्षिसांसाठी स्पर्धा रंगात

**सोलापूर जिल्ह्यात चांगला प्रतिसाद**

सोलापूर जिल्ह्यात अभियानाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. जास्तीत जास्त ग्राम पंचायतींना पुरस्कार मिळावा, यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू असल्याचे सोलापूर जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.



## समर्थ करिअर ॲकॅडमीतर्फे नूतन पोलिसांचा सत्कार


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

नेहरूनगर येथील समर्थ करिअर ॲकॅडमीचे प्रशिक्षणार्थी विशाल राठोड यांची ठाणे शहर व वीरभद्र कलबुर्गी यांची सिंधुदुर्ग येथे पोलीस शिपाई पदी निवड झाल्याबद्दल व तसेच ॲकॅडमीच्या माजी प्रशिक्षणार्थी शिवानी देशमुख यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाचे मुख्य कार्यकारी क्रीडा अधिकारी दत्ता वरकड, जॉगर्स असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप कदम व सोलापूर शहर जॉगर्सचे अध्यक्ष हेमंत जाधव, ज्येष्ठ क्रीडा पत्रकार अजितकुमार संगवे यांच्या हस्ते नूतन भरती झालेल्या पोलीस शिपाई व पोलीस उपनिरीक्षकांचे सत्कार करण्यात आला

नूतन पोलीस उपनिरीक्षक शिवानी देशमुख यांनी आपल्या मनोगतात उपस्थित भरतीपूर्व प्रशिक्षणार्थ्यांना अथक परिश्रम व जिद्द बाळगून ध्येय साध्य करण्याविषयी मार्गदर्शन केले.

प्रारंभी समर्थ करिअर अॅकॅडमीचे संचालक व मुख्य प्रशिक्षक रवी राठोड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी रेल्वेचे अधिकारी निलेश वरवडकर, विराट स्पोर्ट्स अॅकॅडमीचे प्रशिक्षक सूर्याजी लिंगडे, जॉगर्सचे माजी अध्यक्ष संतोष कदम आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन कबड्डी राज्य पंच सुभाष माने यांनी केले. श्री. स्वामी यांनी आभार मानले.


## सुयश गुरुकुल कॉलेजचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि.६ मे-**

बारावी स्टेट बोर्ड परीक्षेत सुयश गुरूकल ज्युनिअर कॉलेजचा १०० टक्के निकाल लागला. सुयश गुरूकल ज्युनिअर कॉलेजमधील एकूण १४ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ०३ विद्यार्थी हे ८० टक्केच्या पुढे आहेत. झउच् मध्ये गड्डी वैष्णवी (८५.३३%), अंकुशराव रोहिणी (८५.००%), सावंत सान्वी (८१.६७%) या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावले.सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव केशव शिंदे, मुख्याध्यापिका विद्या शिंदे आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

### फवारणीचे औषध पिलेल्या शेतकऱ्याचा अखेर मृत्यू

**सोलापूर :** शेतामध्ये अज्ञात कारणावरून फवारणीचे औषध पिलेल्या शेळगावच्या शेतकऱ्याचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज बुधवारी दुपारी एक वाजता मृत्यू झाला. धर्मा गजेंद्र गोडगे (वय ५२ वर्ष राहणार शेळगाव ता.बार्शी) असे त्या मयत शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी ४ मे रोजी सकाळी ११ वाजता शेतातील घरामध्ये अज्ञात कारणावरून पिकावर फवारणी करण्याचे औषध पिले होते . याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना एका खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगा रामकृष्ण याने मंगळवारी संध्याकाळी दाखल केले असता त्यांचा आज दुपारी मृत्यू झाला.

## २२ गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार अटकेत

### सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने जबरी चोरी, घरफोडी असे विविध गंभीर २२ गुन्हे दाखल असलेल्या एका सराईत गुन्हेगाराला अटक करून सव्वा २ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गोपी विजय चव्हाण (वय २४ वर्ष, रा. सवतगव्हण, माळशिरस) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून २२ गुन्ह्यांशिवाय इतर १० नवीन गुन्हे ही उघडकीस आले आहेत. मोटारसायकल चोरीतील आरोपी गोपी चव्हाण हा अकलूज शहरातील वासरू चौकात थांबल्याची माहिती गुन्हे शाखा पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक भिमगोंडा पाटील, सहाय्यक फौजदार प्रकाश कारटकर यांना मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी तात्काळ तेथे जाऊन आरोपीला पकडले. त्याच्याकडे गुन्ह्यांची विचारणा केल्यानंतर सुरूवातीला उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यानंतर त्याने आपण साथीदार सोमनाथ दत्तू पवार व करण महादेव चव्हाण (रा. सवतगव्हाण, माळशिरस) यांच्या मदतीने वेळापूर, मोडनिंब, पिराची कुरोली, पंढरपूर, खडकी, बावडा येथून हॅन्डल लॉक केलेल्या दुचाकी चोरून नेल्याचे सांगितले. शिवाय त्याने एक घरफोडी व जबरी चोरी केल्याचे सांगितले.

याप्रकरणी पोलिसांनी आठ गुन्ह्यातील २ लाख २७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विजय शिंदे, भिमगोंडा पाटील, ज्ञानेश्वर वाघ, फौजदार कुलदीप सोनटक्के आणि फौजदार ख्वाजा मुजावर, सायक फौजदार प्रकाश कारटकर, नारायण गोलेकर, धनाजी गाडे, सलीम बागवान, मोहन मनसावाले, विजयकुमार भरले, धनराज गायकवाड, रवि माने, अश्विनी गोटे, प्रमोद शिंपाळे, सागर ढोरे पाटील, समर्थ गाजरे, योगेश जाधव, यश देवकते, मनोज राठोड, अक्षय डोंगरे, अनवर अत्तार, सतीश बुरकूल, आशुतोष जाधव, आदीं पोलीस अमलदारांनी पार पाडली.



## ‘एसव्हीसीएस’चा निकाल ९५.५० टक्के

**सोलापूर, दि. ६ मे-**

एस.व्ही.सी.एस. ज्युनिअर कॉलेज एमआयडीसी येथील विज्ञान शाखेचा निकाल ९९.१५ टक्के लागला. कॉलेजमधील अनम बागवान हिने ७७.५० टक्के गुण मिळवून प्रथम, विघ्नेश गडम ७१.८३ टक्के द्वितीय व प्रीती जाधव हिने ६५.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेचा निकाल ९७.९३ टक्के लागला आहे. नेहा शिंदे ८३.८३ टक्के प्रथम, प्रवलिका गडगी ७९.५० टक्के द्वितीय व रोहिणी वैरागेने ७९.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. कला शाखेचा निकाल ८४.०५ टक्के लागला. धनराज भोसले या विद्यार्थ्याने ७५.६७ टक्के प्रथम, श्रुती पवार ७१.६७ टक्के द्वितीय व प्रसाद हिटनळ्ळी हा ६७.३३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे काशी जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी, कॉलेजचे प्राचार्य संगप्पा म्हमाणे, उपप्राचार्य धनंजय नकाते, पर्यवेक्षक केदार पटणे व सर्व प्राध्यापक- प्राध्यापिका यांनी अभिनंदन केले. दरम्यान, यशस्वी विद्यार्थी व पालकांचा प्रशालेतर्फे सत्कार करण्यात आला.

## पोलिस उपनिरीक्षक विकास मेटकरी यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ मे-**

विठ्ठलवाडी, महूद (ता. सांगोला) येथील पोलिस खात्यात कार्यरत असणारे विकास नानासो मेटकरी यांनी खाते अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. याबद्दल महूद ग्रामस्थ आणि हनुमान कट्टा अभ्यासिका मित्र मंडळाच्या वतीने नागरिक सत्कार करण्यात आला.



यावेळी जि. प. सदस्य दादासाहेब लवटे, उमेश पाटील, बापू कदम, जीवन खांडेकर, विलास पाटील, सूर्यकांत घाडगे, विजय खबाले, अभिजीत कांबळे, शंकर पाटील, संतोष खडतरे, संतोष पवार, धनाजी कांबळे, नितीन वडे, विकास पाटील उपस्थित होते.

यावेळी मित्र परिवाराच्यावतीने विकास मेटकरी यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यावेळी वैभव बाजारे, प्रभाकर कांबळे, नवनाथ पवार, शहाजी दिघे, गणेश कांबळे, सोमनाथ दुर्वे, राजू जाधव, शशिकांत मेटकरी, इरफान मुलाणी, गणेश बिडवे, विजय पवार, प्रमेय वडे उपस्थित होते.

## लाच प्रकरणी मंडलाधिकाऱ्यांची जामीनावर मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

यातील तक्रारदाराच्या शेतजमिनीवर वारसदार म्हणून त्यांच्या आईचे नाव लावण्याकामी व बंद असलेला सातबारा पुन्हा चालू करण्यासाठी उपळे दुमाला ता. बार्शी येथील मंडल अधिकारी हेमंत चंद्रकांत फुलारी यांनी तक्रारदाराकडे रक्कम रु. ३५००/- लाचेची मागणी केलेली होती.

त्यामुळे तक्रारदाराने सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आरोपी हेमंत फुलारी यांच्याविरुद्ध रितसर तक्रार नोंदवलेली. त्यानुसार लाचेबाबतची सरकारी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली असता, आरोपी हेमंत फुलारी यांनी तक्रारदारांकडे रक्कम रु. ३५००/- ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती रक्कम रु. ३०००/- स्वीकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यानंतर पुढील लाचेसंदर्भातील सापळा रचण्यात आला. सदरची रक्कम स्वीकारताना मंडल अधिकारी हेमंत फुलारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी रंगेहात पकडले होते. आरोपींविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलमानुसार वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यांना बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

त्यावेळी आरोपी हेमंत फुलारी यांच्यावतीने अॅड. निलेश जोशी यांनी जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. सदर जामिनाच्यावेळी अॅड. निलेश जोशी यांच्यावतीने करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरून सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश व्हि. के. मांडे यांनी आरोपींची जामीनावर मुक्तता केली.

प्रकरणामध्ये आरोपींच्यावतीने अॅड. निलेश जोशी, अॅड. यशश्री जोशी, अॅड. अर्जुन देडे यांनी काम पाहिले.

# हायड्रोजन हा भविष्यातील महत्त्वाचा पर्याय : पद्मश्री यादव

### सोलापुरात रसायनशास्त्र प्राध्यापकांसाठी आठवडाभराचा प्रशिक्षण उपक्रम सुरू




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी यांच्या पुढाकारातून आयोजित एक आठवड्याचा प्राध्यापक विकास कार्यक्रम सध्या सोलापूरातील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात उत्साहात सुरू असून राज्यभरातील प्राध्यापकांचा त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

क्षमता उजागर करणे, रसायनशास्त्र शिक्षणतज्ज्ञांना सशक्त बनविणे या विषयावर आधारित हा उपक्रम दि. ४ ते ८ मे दरम्यान एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे होत आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री प्रो. गणपती यादव यांच्या हस्ते झाले. यावेळेस डॉ. प्रकाश महानवार (कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) डॉ. ए. ए. घनवट (संचालक, रासायनिक विज्ञान शाळा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर), सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शंकर नवले, सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस एच पवार यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी त्यांनी ग्रीन एनर्जीबाबत मार्गदर्शन करताना वाढत्या कार्बन उत्सर्जनावर चिंता व्यक्त केली. ऊर्जेच्या वाढत्या गरजा लक्षात घेता हायड्रोजन हा भविष्यातील महत्त्वाचा पर्याय ठरणार आहे. पारंपरिक ऊर्जा स्रोत तात्काळ बंद करणे शक्य नसले तरी पर्यावरणपूरक पर्याय शोधणे आणि त्यांचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.

प्लास्टिकच्या वापराबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, आजच्या जीवनशैलीत प्लास्टिक पूर्णपणे टाळणे शक्य नाही; मात्र त्याचा पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती यावर भर दिला पाहिजे. कार्बन उत्सर्जन कमी करून ग्रीन एनर्जीचा स्वीकार केल्याशिवाय पर्यावरणाचे संतुलन राखता येणार नाही. कार्यक्रमाचे समन्वयक सिंहगड महाविद्यालयाचे डॉ. किरण पाटील यांनी केले. यात डॉ. दिनेश आमलेरकर, डॉ. संजय चराटी, डॉ. प्रकाश वाडगांवकर, डॉ. एस. एच. पवार, डॉ. जी. एस. ग्रोव्हर, डॉ. सुनिता बर्वे यांच्यासह सीएसआयआर-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे येथील अनेक वरिष्ठ वैज्ञानिकांचा समावेश आहे. तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध विद्यापीठांतील प्राध्यापकही मार्गदर्शन मिळत आहे. हा कार्यक्रम सध्या सुरू असून पुढील काही दिवसांत विविध तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे पार पडणार आहेत. या माध्यमातून सोलापूरच्या शैक्षणिक वातावरणाला नवी चालना मिळत असून राज्यभरातील प्राध्यापकांना दर्जेदार प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष भेट

**टेंभुर्णी, दि. ६ मे-**

नाना-भैय्या युवा मंचच्या वतीने आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अकलूज येथील शिवरत्न बंगल्यावर त्यांची भेट घेऊन अभिष्टचिंतन केले. यावेळी त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विविध वनस्पती व वृक्ष भेट देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख म्हणाले यांनी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मोठे बंधू रावसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन वाढदिवसानिमित्त त्यांना वृक्ष भेट दिल्याचे सांगितले.



### दादाई समाज सेवी संस्थेतर्फे पाणी बॉटल वाटप उपक्रम

**अक्कलकोट , दि. ६ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील श्री रेणूका यलम्मा देवी यात्रेत येणाऱ्या भाविक भक्तांसाठी दादाई बहुउद्देशीय समाज सेवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव यांच्या वतीने ५ हजार पाणी बाटल्यांचे वाटप करण्यात आले. संस्थेकडून कोन्हाळी येथे पाणीवाटप उपक्रम २०१० पासून सुरूवात करण्यात आली. यावेळी कोन्हाळी ग्रामपंचायतचे सरपंच सदानंद उन्नद, सदस्य मल्लिनाथ ढेभे, रमेश बनसोडे, श्रीशैल पाटील, आकाश हुडगी, केदार बिराजदार, सचिन बनसोडे, सचिन हसापुरे आदी उपस्थित होते. यासाठी अर्यराज जाधव, श्रेयश गायकवाड, अवधूत जाधव, प्रथमेश जाधव, अलोक गायकवाड, गंगाराम गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.



### अल्लाउद्दीन बाबा उरुसाची जय्यत तयारी

**सोलापूर, दि. ६ मे-**

मोहोळ तालुक्यातील कामती बु. येथे अल्लाउद्दीन बाबा उरुस ७ व ८ मे रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. गावात सध्या तयारी सुरु आहे. बुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या गुरुवार-शुक्रवारी हा उरुस भरविण्याची परंपरा आहे. यंदाही भाविकांच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. अल्लाउद्दीन बाबा हे हिंदू व मुस्लीम बांधवांचे समान श्रद्धास्थान मानले जात असल्याने या उरुसाला विशेष महत्त्व आहे. सर्वधर्मीय ऐक्याचे प्रतीक ठरलेला हा उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडतो. पहिल्या दिवशी, ७ मे रोजी गावातून संदल मिरवणूक आहे. मिरवणुकीत परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. ८ मे रोजी कामती गावची यात्रा भरविण्यात येणार असून विविध धार्मिक व पारंपरिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. यावेळी गावात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. उरुसानिमित्त १० मे रोजी जंगी कुस्ती स्पर्धांचे आयोजन केले आहे. दुपारी २ ते ४ या वेळेत कुस्त्यांचे सामने रंगणार आहेत. या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा समितीचे अध्यक्ष अफसर मुजावर, सचिव समीर मुजावर आणि नाम देव खराडे वस्ताद यांनी केले आहे.



### रोपळे येथे शासकीय दाखले शिबीर; भटके विमुक्त परिषदेचा उपक्रम

**सोलापूर, दि. ६ मे-**

तालुक्यातील भटके विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने रोपळे (ता.पंढरपूर) येथे रामोशी समाजासाठी विविध शासकीय दाखले देण्यासाठी विशेषशिबिराचे आयोजन मंगळवारी (दि.५ मे) करण्यात आले होते. यावेळी १०४ लाभार्थ्यांना विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले. भटके विमुक्त विकास परिषदचे संघटन मंत्रीराहुल चव्हाण व प्रदेशाध्यक्ष उद्धव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर राबविण्यातआले. यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेय, निवासी जिल्हाधिकारी अभिजीत पाटील, इतर म ागास बहुजन कल्याण विभागाचे गणेश सोनटक्के, पंढरपूरचेतहसीलदार सचिन लंगोटे यांचे सहकार्य लाभले. दरम्यान या शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी भटके विमुक्त विकास परिषदचे जिल्हा अशासकीय सदस्य व अभियान प्रमुख सुनील पवार, पंढरपूरतालुका संयोजक प्रशांत सापनेकर, सहसहसंयोजक सुवर्णा पवार, मंडल अधिकारी बाळासाहेब कदम,तालुका पुरवठा अधिकारी बादल उपस्थित होते. यावेळी जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष अंकुश जाधव, दादा जाधव, ओंकार जाधव, परमेश्वर जाधव, विवेक जाधव आदींचे सहकार्य लाभले. शिबिरामध्ये १०४ लाभार्थ्यांना प्रकारचे दाखले काढून देण्यात आले.

# अनुसूचित जातीच्या जागा खुल्या गटास देऊ नये

**केंद्रीय मंत्री रामदास आठवले; कोणावरही अन्याय होणार नसल्याची खात्री**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ मे-**

उपवर्गीकरणामुळे कोणाही समाजावर अन्याय होणार नसला तरी अनुसूचित जातीच्या जागा जनरलला देऊ नये अशीच आपली भूमिका राहणार असल्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उपवर्गीकरणाबाबत राज्याने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही. मात्र लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वच जाती-धर्माच्या लोकांना आरक्षण देण्यात येणार असल्याने कोणावरही अन्याय होणार नाही. राज्यात एससीमध्ये ५९ जाती असून आता होणाऱ्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात इतर जातींनाही आरक्षण मिळणार आहे. कोणत्याही जाती-धर्मांवर अन्याय होऊ नये अशीच आपली ठाम भूमिका आहे. मात्र अनुसूचित जातीच्या जागा जनरलला देऊ नये यावर आपण ठाम आहोत. येथील बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृहाच्या प्रश्नातही नक्की लक्ष घालण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपला चांगले यश मिळाले आहे, मात्र विजय मिळाला की ईव्हीएमचे नाव घेणे बरोबर नाही. ममता बॅनर्जीच्या राज्यात राजकीय हिंसाचार व महिलांवर अत्याचार वाढले होते. गत निवडणुकीत त्यांनी भावनिक साद घालून सत्ता मिळवली, मात्र यावेळेस भाजपला यश मिळाले. आपल्या पक्षाचाही भाजपला चांगला फायदा होत आहे,त्यामुळेच आपल्याला तिसऱ्यांदा राज्यसभा मिळाली. आपला पक्षही अनेक राज्यात वाढला आहे.

मणिपूर व नागालँड येथे पक्षाला मान्यता मिळाली आहे, शिवाय रिपाइंला राष्ट्रीय म्हणून मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे, असेही केंद्रीय मंत्री आठवले म्हणाले. यावेळी अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, सुनील सर्वगोड, नंदकुमार केंगार, किरण धाईंजे, दया धाईंजे आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेनंतर त्यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची शिवरत्न बंगला येथे भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील उपस्थित होते.

## अक्कलकोटमधील सात अनधिकृत इमारती पत्राशेड जमीनदोस्त

**● नगरपालिकेच्या बाजूने न्यायालयाचा निकाल ●**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**

अक्कलकोट शहरात नगरपालिकेच्या बाजूने निकाल लागलेल्या ७ अनधिकृत घरांचे पत्राशेड सोमवारी उद्ध्वस्त करण्यात आले.

न्याय प्रविष्ठ अनधिकृत बांधकाम अतिक्रमणाबाबत निर्णय येतील त्याप्रमाणे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण विरोधात कारवाई चालूच राहील, असे नगरपालिका अक्कलकोटचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी सांगितले. अतिक्रमण विरोधात कारवाई चालूच होती. बांधकाम मलबा हटविण्याचे काम युद्ध पातळी वर चालू आहे. पाडकाम मोहिमेत नगरपालिकेचे मुख्याधिकारी डाके स्थळावर हजर होते. मोहिमेत पोलीस निरीक्षक दिपक भिताडे, पोलीस कर्मचारी, नगरपालिका अधिकारी, कर्मचारी, १० ट्रॅक्टर, ५ जेसीबी, पोकलेन चार, पोलीस -१५०, नगरपालिक कर्मचारी ३० हजर होते.





## कल्याणशेट्टी विद्यालयाचा बारावी विज्ञान विभागाचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे -**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान विभागाचा निकाल १०० टक्के लागला. महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

तज्ञ प्राध्यापकाकडून वेळोवेळी विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन व सातत्याने अभ्यासाचा सराव आदींमुळे दरवर्षी विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागत असल्याचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रोख पारितोषिक, शाल व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते.

विज्ञान शाखेतील यश बागलकोटी हा विद्यार्थी ७४.६७ टक्के घेऊन प्रथम आला. शंकर नीळ व राजनंदिनी ताकमोगे या दोघांनी ७३.३३ घेऊन द्वितीय तर सिद्धाराम कोरे हा विद्यार्थी ७२ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.कला विद्या शाखेचा निकाल ६८.५७ टक्के लागला. सपना चेंडके ७८.८३ टक्के घेऊन प्रथम आली. विजयालक्ष्मी चेंडके ६६.६७ टक्के घेऊन दुसरी तर महेक कारंजे ६४.६७ टक्के घेऊन तिसरी आली आहे. वाणिज्य शाखेचा ७९.०६ टक्के निकाल लागला. आदिती कटारे ही ७५ टक्के गुणांसह प्रथम आली. समीक्षा मोरे ७३.८३ टक्के मिळवून दुसरी तर स्नेहा भिकम ळी ७१.५० टक्क्यांसह तिसरी आली आहे. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग व बहुसंख्य पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शिवकुमार मठदेवरू यांनी केले. आभार मधुबाला लोणारी यांनी मानले.

## मंगळवेढ्यात आवर्तन क्रमांक दोनला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. ६ मे-**

मंगळवेढा तालुक्यातील उजनी जलसिंचन विभागाने आवर्तन क्रम ांक दोनची घोषणा केली आहे. हे आवर्तन काही दिवसांत सुरू झाले आहे. विभागाने या आवर्तनाचे व्यवस्थित संचालन करण्यासाठी शेतकरी व लाभधारकांना ९ सूचना जारी केल्या आहेत. त्यांचे पालन करून शेतकऱ्यांनी वाद टाळून पाण्याचा काटेकोर वापर करण्याचे आवाहन कालवा निरिक्षक मेजर दशरथ सलगर यांनी केले आहे.

सध्या मराठवाडा व विदर्भात पाण्याची टंचाई जाणवत असली तरी मंगळवेढ्यातील कॅनल सिस्टममधील पाण्याचे वितरण शिस्तीने होईल. आवर्तन क्रमांक एक संपुष्टात आल्यानंतर लगेच क्रमांक दोन सुरू होत असल्याने शेतकऱ्यांनी तयारी पूर्ण करावी. जलसिंचन विभागाचे अभियंता म्हणाले, या सूचनांचे काटेकोरपणे पालन केल्यास लाभधारकांना न्यायानेच पाणी मिळेल.

सध्या तापमान वाढलेले असल्याने पाण्याची गरज सर्वांनाच आहे. परंतु एकमेकांमध्ये वादविवाद करू नये. शांततेने पाणी वाटप प्रक्रियेला सहकार्य करावे. पाणी जाणारे मार्ग जसे मेन कॅनल, वितरिका, लघुवीतिका, दंड, चर इत्यादी सुस्थितीत ठेवावेत. या मार्गांवर झाडे, कचरा किंवा अडथळे नसावेत. शेतकऱ्यांनी स्वतः पाहणी करून आवश्यक स्वच्छता करावी. पाणी मागणी अर्ज भरलेला असावा. अर्ज नसताना वाद घालणे निरर्थक आहे. विभागाकडे अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत संपली तरी उशिरा अर्ज स्वीकारले जातील. थकित सिंचन पाणीपट्टी वेळेत भरलेली असावी. विभागाने २० पेक्षा जास्त पथक रवाना केली आहेत. पाणीपट्टी जमा न केल्यास वितरण थांबेल. पाणी बचतीसाठी ड्रिप इरिगेशनचा अवलंब करावा, असेही विभागाने म्हटले आहे.

**वाद टाळण्याची मागणी**

विभागाच्या सुचनांबाबत बोलताना शेतकरी नेत्यांनी सूचना चांगल्या आहेत, असे म्हटले आहे. मात्र पाण्याचे वितरण पारदर्शक व्हावे. तापमान ४५ डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहोचले असून, पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पाणी गरजेचे आहे. मागील आवर्तनात वाद झाले होते; यावेळी शिस्त राखावी, अशी मागणीही केली आहे.




## शिवदारे मिलसमोर ऑटो रिक्षा उलटली

**▸▸ चार प्रवासी जखमी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे-**

भर वेगातील ऑटो रिक्षा पलटी झाल्याने झालेल्या अपघातात पुण्याचे चार प्रवासी जखमी झाल्याची घटना सोलापूर - अक्कलकोट रस्त्यावर शिवदारे सूतमिल समोर आज बुधवारी सकाळी आठ वाजता घडली.

संगीता हनुमंत हिरोळी (वय ४५ वर्ष ), नेहल उमेश आळगी (वय ३०), निंगप्पा कलप्पा हिरोळी (वय ३५) आणि श्रेयश उमेश आळगी (वय ३ वर्षे, सर्व रा. गावडे वस्ती, पुणे) असे त्या जखमी प्रवाशांचे नाव असून ते सर्व आज बुधवारी सकाळी सोलापूर कडून अक्कलकोट कडे रिक्षामध्ये बसून जात असताना वळसंग च्या पुढे शिवदारे सूत मिल समोर रिक्षा पलटी झाली. यात वरील चौघेजण मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात रुग्णवाहिकेतून सकाळी दाखल करण्यात आले.



## डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी पंतप्रधानांकडे पाठपुरावा करणार

**● गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचे आश्वासन ●**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ६ मे -**

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. संघटनेला राजमान्यता मिळवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठपुरावा करु, असे आश्वासन दिले.

गोवा येथील कला अकादमीमध्ये अखिल भारतीय डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन करताना सावंत बोलत होते.

गोवा राज्यात पत्रकारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवित आहे. यामध्ये अधिस्वीकृती पेन्शन योजना, गृहनिर्माण योजना, पत्रकारांच्या कुटुंबासाठी वैद्यकीय विमा आदी सुविधांचा समावेश आहे. तसेच डिजिटल मीडिया क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकारांनाही शासनाच्या चौकटीत राहून न्याय मिळवून देण्यासाठी ठोस प्रयत्न केले जातील, असेही सावंत यांनी सांगितले. अधिवेशनास स्वागताध्यक्ष सुभाष फळदेसाई, गोवा प्रदेशाध्यक्ष अनिल पाटील, महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार सदानंद तानवडे, भाजप किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राम कृष्ण वेताळ, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजा माने, डॉ. ओमप्रकाश शेटे, अमोल पाटील, महेश कुगावकर, तेजस राऊत, मुरलीधर चव्हाण, सतीश सावंत, विकास भोसले, भाऊसाहेब फास्के, शशिकांत देशमुख, सागर चव्हाण, सूर्यकांत वाईकर, धीरज शेळके, भरत केसरकर यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन झाले.

सचिन कुलकर्णी, दिनेश मडके, नरेंद्र सिंह ठाकुर, संजय साखरे, सूर्यकांत होनप, तुषार जाधव, रवींद्र विघ्ने, आनंद माळी, अंगद देवकते, अमोल भोसले आदी डिजिटल पत्रकार उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा मुख्यमंत्री सावंत यांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तसेच उद्योगमंत्री उदय सामंत यांची प्रकट मुलाखत राजा माने यांनी घेतली.

## सांगोला कृषी विभागाच्या जलतारा शोषखड्डे अभियानाला वेग

### मनरेगा योजनेतून अनुदान; शेतात शोषखड्डे तयार करण्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.६ मे -**

भविष्यातील पाणीटंचाई व एल-निनोच्या संभाव्य परिणामांवर मात करण्यासाठी सांगोला तालुक्यात कृषी विभागाच्या वतीने जलतारा शोषखड्डे अभियानाला वेग आला आहे. लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे जलसंधारणाच्या कामांना चालना मिळत आहे. शेतकऱ्यांच्या शेतात शोषखड्डे तयार करण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत या शोषखड्ड्यांसाठी अनुदान दिले जात आहे. एका एकरासाठी एक शोषखड्डा ही अट लागू आहे. सांगोला तालुक्यातील राजुरी येथील शेतकरी पांडुरंग खुळे यांच्या शेतात प्रत्यक्ष शोषखड्ड्याचे प्रात्यक्षिक करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शोषखड्डा तयार करण्याची पद्धत, तांत्रिक निकष व त्याचे फायदे याबाबत माहिती देण्यात आली. केवळ खड्डा खणणे नव्हे तर वैज्ञानिक पद्धतीने जलपुनर्भरण केल्यास भूजल पातळी वाढते, असे स्पष्ट केले. जलतारा शोषखड्ड्यांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरून विहीर व बोअरवेलची पाण्याची पातळी वाढते. परिणामी पाणीटंचाईवर मात होऊन शेती उत्पादनात वाढ होते.

हवामानातील अनिश्चितता लक्षात घेता जलसंधारणाचे उपायही शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत उप कृषी अधिकारी श्रीधर शेजवळ यांनी व्यक्त केले. प्रात्यक्षिकावेळी संतोष यजगर, पांडुरंग खुळे, सचिन खुळे, गणेश दबडेसह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.



> **‘जलतारा’ मुळे जलस्त्रोतांच्या पातळीत वाढ**
>
> साधारणतः ५ फूट लांब, ५ फूट रुंद व ६ फूट खोल अशा आकाराचे शोषखड्डे उताराच्या बाजूला किंवा पाणी साचणाऱ्या ठिकाणी केल्यास पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरते व आसपासच्या जलस्त्रोतांची पातळी वाढते. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी स्वखर्चाने व लोकसहभागातून जलतारा शोषखड्डे तयार करावेत.
>
> **- बाळासाहेब सावंत,**
> सहायक कृषी अधिकारी, सांगोला.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बाळेच्या चंडक प्रशालेचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि. ६ मे-**

बाळे येथील ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेचा ९८.२१ टक्के तर कला शाखेचा ८७.७१ टक्के इतका निकाल लागला. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ, प्राचार्य मोहनराव घोडके, आदींनी अभिनंदन केले. **विविध शाखेतील प्रथम तीन विद्यार्थी :**





विज्ञान- सौंदर्या सागर तिखंडे ७०.१७ टक्के, स्नेहा राजू पवार ६४.५० टक्के, मानसी शैलेश जाधव ६३ टक्के. वाणिज्य- वेदिका साधू सोनटक्के ७४ टक्के, स्नेहा प्रशांत चव्हाण ७२ टक्के, राजनंदिनी गोपाळ धननाईक ६९.८३ टक्के गुण कला- यशोदा शशिकांत शिंदे हिने ६४.५० टक्के, राहुल भोसले ६२.५० टक्के, हर्षद सुशील नवगिरे याने ६०.८३ टक्के.



## महत्त्वाचे...



### पेशवा युवा मंचतर्फे सामुदायिक व्रतबंध सोहळा

**पंढरपूर, दि. ६ मे-**

येथील पेशवा युवा मंचच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रविवारी (दि.३) सामुदायिक व्रतबंध सोहळा आयोजित केला होता. सोळा बटूंनी सोहळ्यात भाग घेतला. पद्मशाली धर्मशाळा येथे हा व्रतबंध सोहळा मोठ्या उत्साहात आणि शाही पध्दतीने पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसाद महाराज बडवे होते. याप्रसंगी श्रीमंत पेशवे यांचे वंशज पुष्कर पेशवा हे पत्नीसह, इंदापूर येथील उद्योजक उदय देशपांडे, यावली येथील वेदमूर्ती तोषश्री कुलकर्णी, पुणे येथील इंडिया इंडस्ट्रीजचे उद्योजक प्रसाद कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुंजीचे पौरोहित्य आकाश पारनेरकर व श्री विठ्ठलरुक्मिणी वेदपाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. बटूंना शुभाशीर्वाद देण्यासाठी प्रमोद देशपांडे सपत्नीक, वैभव बडवे, वीरेंद्रसिंह उत्पात, मानस कमलापूरकर, ॲड. इंद्रजीत परिचारक, वेदमुर्ती चेतन पाटील, स्वानंद कुलकर्णी व डॉ. श्रीराज काणे उपस्थित होते. सायंकाळी शहरातील प्रदक्षिणा मार्गावरून बटूंची वाजत गाजत भव्य मिरवणुक काढण्यात आली. कार्यक्रमासाठी अध्यक्ष निलेश कवडे व उपाध्यक्ष आदित्य काळे यांनी परिश्रम घेतले.

**प्रत्येक बटूस सोवळे, उपरणेसह संध्येचे साहित्य भेट**

विशेष म्हणजे या व्रतबंध सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक बटूस पेशवा युवा मंचतर्फे सोवळे, उपरणे, तांब्याचे पळी, पेला, ताम्हण तसेच संध्येची पोथी भेट देण्यात आली.

### काँग्रेस सोशल मीडिया मंगळवेढा तालुकाध्यक्षपदी संदीप पवार

**मंगळवेढा, दि. ६ मे-**

तालुका काँग्रेस सोशल मीडिया विभाग तालुकाध्यक्षपदी संदीप पवार यांची निवड केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नुकतेच संदीप पवार यांना नियुक्तीपत्र दिले आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीत सोशल मीडियाचे वाढते महत्त्व लक्षात घेता, काँग्रेस पक्षाने तालुका पातळीवर सोशल मीडिया संघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. या पार्श्वभूमीवर संदीप पवार यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. राज्यातील सत्ताधारी



पक्षाच्या धोरणांवर टीका करताना, सरकारची निष्क्रियता, तसेच जनतेविरोधात घेतल्या जाणाऱ्या निर्णयांविषयी सोशल मीडिया माध्यमातून जनजागृती करण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखालील टीम करणार आहे. निवडीबद्दल राज्य सचिव ॲड. रविकरण कोळेकर, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, शहराध्यक्ष ॲड. राहुल घुले, जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, तसेच मनोज ठेंगील, रवींद्र शिवशरण आणि ज्ञानेशर हर्डीकर यांनी संदीप पवार यांचा सत्कार केला.

### पुढील आठवड्यात शेतकरी व वाहतुकदारांच्या खात्यावर पैसे : ओमराजे बोत्रे पाटील

**पिलीव दि ६ मे-**

सोशल मिडीयाच्या माध्यमातून काही जण ओंकार परिवार व चेअरमन यांची जाणीवपूर्वक बदनामी करत आहेत. त्यांच्या अफवांना बळी पडू नये असे आवाहन ओंकार साखर कारखाना परिवाराचे संचालक ओमराजे बोत्रे पाटील यांनी केले आहे. तसेच पुढील आठवड्यात शेतकरी व वाहतुकदारांच्या खात्यावर पैसे जमा होतील, असे आश्वासन दिले आहे. बोत्रे यांनी याबाबत प्रसिद्धीपत्रक दिले आहे. ओंकार साखर कारखाना परिवाराने चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, कर्नाटक तेलंगणा,



झारखंड या राज्यातील बंद साखर कारखाने चालू करुन विकासाला गती दिली. गत वर्षी उच्चांकी दर देऊन दिपावलीसाठी मोफत साखर दिली. सर्वांची ऊस बिले वेळेत अदा केली आहेत. २०२५ व २०२६ या सिझनला ओंकार साखर कारखान्याने ७५ लाख टन ऊसाचे गाळप केले असुन उच्चांकी दराची परंपरा कायम ठेवली आहे. आजपर्यंत १८३० कोटी रूपये अदा केलेले आहेत. वाहतुकदरांचे ७१० कोटी रूपये दिले आहेत. या परिवारात १८हजार कामगारांची कुटुंबे या वर अवलंबून आहेत. ८ लाख शेतकऱ्यांना तारणहार हा ओंकार परिवार असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. मात्र काही मंडळींनी जाणीवपूर्वक सोशल मिडियाच्या माध्यमातून ओंकार परिवाराची व चेअरमन यांची जाणीवपूर्वक बादनामी मानहानी सुरु केली आहे ही केवळ स्टंट बाजीसाठी व दिशाभूल करण्यासाठी ही व्यक्तव केल्याने शेतकरी ,कर्मचारीवर्ग, वाहतूकदार यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत. अशया लोकांवर वेगवेळ्या ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत अशी माहिती जाहीर केलेल्या प्रसिदधी पत्रकात म्हटले आहे .

# पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक विशेष रेल्वे आता कायमस्वरूपी

- श्री विठ्ठल, श्री बालाजीच्या भक्तांची मोठी सोय
- चार राज्यांत वाढणार धार्मिक पर्यटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे -**

प्रवाशांच्या मागणीचा विचार करून, भारतीय रेल्वेने पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक विशेष गाड्यांच्या सेवेचे नियमित गाड्यांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. या सेवा आता नवीन गाडी क्रमांकांसह नियमित गाड्या म्हणून धावतील, ज्यामुळे प्रवाशांची सोय वाढेल आणि रेल्वेचे कामकाज अधिक सुरळीत होईल.

ही गाडी महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांमधील प्रवाशांच्या मोठ्या वर्गाला सेवा पुरवेल. यामुळे देशातील दोन अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्रे-पंढरपूर येथील भगवान विठ्ठल आणि तिरुपती येथील भगवान व्यंकटेश्वर- यांच्या दरम्यानची रेल्वे जोडणी वर्षभर अधिक मजबूत होईल. पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक गाडीमध्ये सध्याची विशेष गाडी सेवा (गाडी क्रमांक ०७०१२) 'तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक विशेष', दि. १६ मे पासून नियमित सेवेत (गाडी क्रमांक १७४३७) 'तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक' म्हणून रूपांतरित केली जाईल. गाडी क्रमांक ०७०३२ 'पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक विशेष', दि. १७ मे पासून नियमित सेवेत गाडी क्रमांक १७४३८ 'पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक' म्हणून रूपांतरित केली जाईल. गाडी क्रमांक १७४३७ 'तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक' ही गाडी दर शनिवारी १६:०० वाजता तिरुपतीहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १९:०० वाजता पंढरपूरला पोहोचेल. गाडी क्रमांक १७४३८ 'पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक' ही गाडी दर रविवारी २०:०० वाजता पंढरपूरहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २३:३० वाजता तिरुपतीला पोहोचेल.




**गाडीला २४ डबे, २६ थांबे**

मोडनिंब, कुर्डुवाडी, बार्शी टाउन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, उदगीर, बीदर, जहिराबाद, विकाराबाद, लिंगमपल्ली, बेगमपेठ, सिकंदराबाद, काचीगुडा, शादनगर, महबूबनगर, वनपर्ती रोड, गडवाल, कर्नूल सिटी, धोणे, गुटी, ताडीपत्री, येर्रगुंटला, कडप्पा, राजमपेठ आणि रेणीगुंटा. असे या गाडीला थांबे असतील. १ वातानुकूलित (२-श्रेणी), ३ वातानुकूलित (३-श्रेणी), १४ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ गार्ड-कम-ब्रेक व्हॅन्स असे एकुण २४ डबे गाडीला असतील.



## खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांची सांगोल्यात आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.६ मे -**

खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगोला तालुक्यातील पाणी टंचाई संदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. बैठकीस सांगोला तहसीलदार बाळु भागवत, पोलिस निरीक्षक विनोद घुगे, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत टेंभू-म्हैसाळचे पाणी वाटप नियोजन, निरा उजवा कालव्याच्या पाण्याचे नियोजन, जलजीवन मिशनमधील रखडलेली कामे, दुष्काळग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा, विविध जलपुरवठा योजना तसेच वीजेच्या समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. उद्भवलेल्या अडचणींवर तात्काळ तोडगा काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी तालुक्यातील पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.



## सेवा सन्मान पुरस्कार प्रित्यर्थ पराणे यांचा सत्कार

**अक्कलकोट दि ६ मे-**

कर्नाटक येथील शिवलिंगेश्वर विरक्त मठ मादन हिप्परगा यांच्या वतीने संतोष पराणे यांना चालू सालातील सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यानिमित्त श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्याहस्ते स्विमिंग ग्रुपच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवूनपराणे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मठाधीश म.नि.प्र. अभिनव शिवलिंग स्वामी व अक्कलकोट विरक्त मठाचे म.नि.प्र.बसवलिंग स्वामी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले. यावेळी महेश इंगळे यांनी पराणे यांच्या अंगी असनलेल्या सेवाभावाची प्रशंसा केली.

यावेळी स्विमिंग ग्रुपचे प्रथमेश इंगळे, ओंकार उटगे, खाजप्पा झंपले, संतोष जवळगे, अंकुश केत, चंद्रकांत सोनटक्के, रमेश शिंदे, विद्याधर गुरव, प्रथमेश इंगळे, मल्लिनाथ माळी, अशोक कलशेट्टी सर, कुमार हत्तुरे, रमेश कणमुसे, सचिन किरनळ्ळी, शशिकांत पराणे, हनुमंत माळी, अरविंद पाटील, बाबा सुरवसे, सिद्धाराम बिडवे, शैलेश राठोर, सुनील पवार, अमर पाटील, मनोज जगताप, सुरेश पाटील, प्रसन्न हत्ते, प्रसाद पाटील, विश्वनाथ देवरमनी, अमर पाटील, शैलेश राठौर, शिवशरण अचलेर, रफिक पठाण, दत्ता कटारे, समर्थ पराणे, हर्षल माळी, तन्मय इचगे, श्रीकांत झिपरे, रमेश शिंदे आदी उपस्थित होते.

## पोलिस बंदोबस्तात १०० दुकाने, ३४ घरे जमीनदोस्त

**अक्कलाकोटमध्ये मंदिर, अन्नछत्र परिसरातील अतिक्रमणे उद्ध्वस्त**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ६ मे-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्र श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर परिसर अन्नछत्र मंडळ परिसरात बुधवार व गुरुवार २२ व २३ एप्रिल रोजी सर्वात मोठी अतिक्रमण विरोधी मोहिम राबवली होती. सोमवार ४ मे रोजी पुन्हा वटवृक्ष स्वामी मंदिर, अन्नछत्र मंडळ परिसरात अतिक्रमण काढण्याची माहीम तीव्र केल्याने खळबळ माजली आहे.

२२ एप्रिल व २३ एप्रिल रोजी १०० पेक्षा अधिक अतिक्रमण दुकाने बाह्य वळण रस्त्यावरील ३४ अनधिकृत रहिवाशी घरे जेसीबीने जमीनदोस्त केली होती. सोमवार ४ मे रोजी पुन्हा मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही मोहीम तीव्र करण्यात आली. या भागात नागरिक घरगुती सर्व साहित्य काढण्याचे काम युद्ध पातळीवर करत होते.

पोलीस निरिक्षक दिपक भिताडे, मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या नेतृत्वाखाली पोलिस, नगरपालिकेचे कर्मचारी, अधिकारी, सफाई कर्मचारी, विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी व शासकीय इतर अधिकाऱ्यांनी मोठ्या फौज फाट्यासह सर्वात मोठी कारवाई केली. मंदिर परिसरात पोलीस व साहित्याची वाहतुक करणारी छोटी वाहने, स्क्रॅप, ढिगारा, पत्रे, रॅक आदीचा खच पडला होता दुकानदाराची धांदल उडाली होती.

या मोहिमेत जेसीबी पोकलेन ट्रॅक्टर हायवा या फौज फाट्यासह पोलीस.सहाय्यक रचनाकार, नगर पालिका अककलकोटचे शुभम मागुरे, नगर अभियंता अभिषेक काकडे, रचना सहाय्यक उत्कर्ष उकरंडे, पो नि भिताडे मुख्याधिकारी रमाकांत डाके सहभागी झाले होते. नागरिकांनी विना परवाना बांधकाम अतिक्रमण स्वतःहुन काढावे असे आवाहन नगरपालिकेच्या वतीने केले आहे.

**३० मीटर रस्ता मार्गातील अतिक्रमणांवर हातोडा**

अन्नछत्र मंडळ ते बाह्य वळण रस्ता मंगरुळे चौकापर्यत तीस मीटर रस्ता विकास काम प्रगती पथावर आहे. अन्नछत्र मंडळापासून या ३० मीटर रस्ता मार्गात असणारी सर्व रहिवाशी घरे, अतिक्रमण घरे, विना परवाना बांधकाम घरे, दुकाने जेसीबीच्या सहाय्याने रिकामी करून ढिगारा उचलण्याचे काम अनेक ट्रॅक्टरद्वारे चालू होते.

## शॉर्ट सर्किटने किराणा दुकानाला आग; वृद्ध महिला जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**



शॉर्टसर्किटने आग लागून किराणा मालाचे दुकान भस्म सात झाले. आग विझवताना दुकानदार वृद्ध महिला भाजून जखमी झाल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील मरवडे गावात आज बुधवारी सकाळी साडेआठ वाजता घडली.

अनारकली रहेमान मणेरी (वय ६३ वर्ष, राहणार मरवडे) असे त्या भाजलेल्या महिलेचे नाव आहे. आज बुधवारी सकाळी त्या स्वतःच्या किराणा दुकानात बसल्या असताना अचानक लाईट मीटरला लागली. ही आग कापड टाकून विझवताना सदर महिला हात-पाय भाजून जखमी झाली. त्यामुळे त्यांना मंगळवेढा येथील एका खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगी काजल हिने दुपारी दोन वाजता दाखल केले.

## श्री काशी जगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठातर्फे वीरशैव सिद्धान्त परीक्षांचे आयोजन

**परीक्षेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : मनगिरे**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मे-**

श्री काशी जगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्यावतीने श्री काशीजगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी आणि श्री काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मंगलमय आशीर्वादाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वीरशैव सिद्धान्त परीक्षांचे आयोजन केले आहे. या विद्यापीठाद्वारे वीरशैव सिद्धान्त प्रबोध, वीरशैव सिद्धान्त प्रवीण आणि वीरशैव सिद्धान्त पंडित अशा तीन स्तरांवरील परीक्षांचे आयोजन केले जाते. या परीक्षांमध्ये गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रीकाशी जगद्गुरुंच्या अमृत हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात येते.

या परीक्षामध्ये वीरशैव सिद्धान्त प्रबोध परीक्षा व वीरशैव सिद्धान्त प्रवीण परीक्षा असून, प्रबोध व प्रवीण या दोन्ही परीक्षा १०० गुणांच्या असून एकाच दिवशी घेतल्या जातात. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका एकत्रच असते. या परीक्षांमध्ये किमान ३५ गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाते आणि त्यानंतरच पंडित परीक्षा देता येते. वीरशैव सिद्धान्त पंडित परीक्षेत प्रथम वर्ष वीरशैव तत्वदर्शन, द्वितीय वर्ष वीरशैव अष्टावरण विज्ञान आणि तृतीय वर्ष श्री सिद्धान्तशिखामणी समीक्षापंडित परीक्षेच्या तिन्ही वर्षांच्या परीक्षांमध्ये किमान ३५ गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यानंतर श्रीकाशी जगद्गुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्याकडून पंडित प्रमाणपत्र प्रदान केले जाते. फॉर्म भरण्याची अंतिम मुदत १० मे असून, परीक्षा २८ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे. नोंदणीसाठी संतोष खुडे (मो. ९७६३३४५७०३), प्रविण महाराज (मो. ८३०८६९४८२४), योगेश घंटे मो.(९८०४५४१००८) व अधिक माहितीसाठी डॉ. अनंत बिडवे (परीक्षा समिती सदस्य, मो. ९४०३१५१००८) यांच्याशी संपर्क साधावा.

# पद्मश्री पं.उल्हास कशाळकर यांच्या गायनाने पंढरपूरकर रसिक मंत्रमुग्ध

**विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सहृदय सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ मे -**

शास्त्रीय संगीताचे संशोधन केंद्र पंढरपूर येथे होण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करु, असे आश्वासन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिले. अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रसारासाठी आणि प्रचारासाठी सदैव कार्यरत असणाऱ्या पं.विकास कशाळकर फाऊंडेशन पंढरपूरच्या वतीने गुरुवर्य पं.विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सत्कार आयोजित केला होता. त्यावेळी प्रशांत परिचारक बोलत होते.




प्रारंभी डॉ.प्रसाद कुलकर्णी यांच्या गंधार क्लासेसच्या शिष्यवृंदांनी चतुरंग गायन सादर केले. प्रशांत परिचारक, पं.विकास कशाळकर, पद्मश्री उल्हास कशाळकर, पद्मश्री तालयोगी सुरेश तळवलकर गुरुजी, पं.अरूण कशाळकर, अध्यक्ष डॉ.प्रसाद कुलकर्णी, उपाध्यक्ष उदय उत्पात, सचिव ज्ञानेश्वर दुधाणे, एस.पी.कुलकर्णी, आण्णासाहेब सुरवसे, माधूरी जोशी, शुभांगी मनमाडकर, स्वानंदी काणे, प्रज्ञा कुलकर्णी, पारुल पारमार यांचे हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करुन पं.विकास कशाळकर यांचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ दिव्यांचे औक्षण करून परिचारक यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी तालयोगी सुरेश तळवलकर, पं.विकास कशाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मनोगत व्यक्त केले.

कशाळकर परिवार संपूर्ण अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताला वाहून घेतलेला परिवार आहे. अनंत विद्यार्थी-विद्यार्थिनी तयार करून संस्कारित आणि सुसंस्कृत पिढ्या तयार करण्याचे कष्ट घेत असल्याने भारतीय गुरु शिष्य परंपरा टिकवून ठेवल्याचे पं. विकास कशाळकर यांनी सांगितले. पंढरपूर येथे अभिजात शास्त्रीय संगीताचे संशोधन केंद्र बनवण्याची मागणी केली. त्यानंतर पद्मश्री उल्हास कशाळकर यांच्या गायनाला सुरुवात झाली. त्यांनी विलंबित तीनतालत राग केदार सादर करत पंढरपूरकरांना शास्त्रीय संगीताची अविस्मरणीय अनुभूती दिली. त्यानंतर बहार राग सादर करत विठोबाचे पायी मन धाव घेई, आणि दीपचंदीमध्ये विठूरायाची अभंगरचना सादर करत सांगता केली. यावेळी त्यांना तितकीच सुंदर आणि दमदार साथसंगत तबला पद्मश्री सुरेश तळवलकर, हार्मोनियम डॉ. प्रवीण कासलीकर, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ आण्णासाहेब सुरवसे आणि स्वरसाथ सौरभ नाईक, अद्वैत केसकर यांनी केली. कार्यक्रमास दिल्ली, नागपूर, मुंबई, सोलापूर, पुणे, सांगोला, कोल्हापूर, करकंब आदी गावांतून रसिक आणि शिष्य परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजेश खिस्ते यांनी केले. एस.पी.कुलकर्णी यांनी आभार मानले.

**शास्त्रीय संगीताचे संशोधन केंद्रासाठी प्रयत्न करु**

माजी आमदार परिचारक यांनी पंढरपूर शहराची सांगितिक परंपरा मोठी आहे. ती टिकवण्यासाठी प्रसाद कुलकर्णी, ज्ञानेश्वर दुधाणे सदैव प्रयत्नशील असल्याचे सांगत त्यांना निश्चितच पाठिंबा राहील असे आश्वासन दिले. लवकरच संत नामदेव अध्यात्मिक पीठ बनवण्यासाठीचा प्रस्ताव तयार होत आहे. त्यामध्ये लवकरच आपण० मागणी केल्याप्रमाणे शास्त्रीय संगीताचे संशोधन केंद्र बनवण्यासाठी प्रयत्न करुन प्रस्ताव देण्याचे आवाहन केले.